## जन सुराज पक्षाचा बिहारच्या राजकारणात प्रवेश

■ वृत्तसंस्था, पाटणा, दि. २:
प्रशांत किशोर यांच्या जन सुराज पक्षाने बिहारच्या राजकारणात प्रवेश केला आहे. प्रशांत किशोर यांनी बुधवारी पाटणा येथील पशुवैद्यकीय मैदानावर जन सुराजचा अधिकृतपणे शुभारंभ केला. एससी समुदायातून आलेल्या मनोज भारती यांना जन सुराजचे पहिले कार्यवाहक अध्यक्ष बनवण्यात आले आहे.

त्यांच्या नावाची घोषणा करताना पीके म्हणाले की, 'भारती यांची अध्यक्षपदी निवड दलित समाजातील असल्याने नव्हे, तर ते सक्षम आणि दलित समाजातून येत असल्याने त्यांची निवड करण्यात आली आहे. ४० देशांचे राजदूत राहिलेले मनोज भारती मूळचे मधुबनीचे आहेत.

Website : www.dainikmahasagar.in
Epaper : www.epaper.dainikmahasagar.in

मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

e-mail : nagpurpost@gmail.com • mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५४ * अंक १७७ * * नागपूर *

गुरुवार, दिनांक ३ ऑक्टोबर २०२४ | पुरवणीसह पाने ८ | किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.)



## आज घटस्थापना

आजपासून नवरात्रीला सुरुवात होत आहे. अष्टमी आणि महानवमीची पूजा ११ तारखेला होणार आहे. शनिवार १२ ऑक्टोबर रोजी दसरा साजरा होणार आहे. त्यामुळे देवपूजेसाठी पूर्ण नऊ दिवस मिळतील.

**शुभ मुहूर्त**
सकाळी १०.५० ते दु. १.३०
सायंकाळी ४.३० ते ६

अग्राग्रलेख **खरीखरी...**

## संघाने दिला नवा नेता

भारतीय जनता पक्षाची मातृसंस्था राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने भारतीय जनता पक्षाला नवा नेता दिल्याची विश्वसनीय बातमी आहे. भारतीय जनता पक्षाला संघाची गरज नाही. कारण भारतीय जनता पक्ष आता मोठा झाला आहे. असे विधान भारतीय जनता पक्षाचे अध्यक्ष जे पी नड्डा यांनी केल्यानंतर संघ ही काय चीज आहे. हे संघाने दाखवून दिले आहे. अनेक खटपटी लटपटी करूनही संघाच्या नाराजीमुळे 400 खासदार जिंकण्याचा दावा केलेल्या भाजपला अवघ्या 240 वर समाधान थांबावे लागले. भारतीय जनता पक्षाला दोन राज्यांच्या निवडणुकीत फारसे यश मिळेल असे वाटत नाही. हरियाणात तर भाजपचा पार फज्जा उडणार आहे, असे बोलले जाते. महत्त्वाची बाब ही की, गेल्या अनेक महिन्यांपासून भारतीय जनता पक्षाला अधिकृत अध्यक्ष नाही. जे पी नड्डा मागील पानावरून पुढे असे कामचलाऊ अध्यक्ष आहेत. पण ते मंत्री असल्याने त्यांना पक्षाकडे लक्ष द्यायला वेळ नाही. एक वर्षापूर्वीची परिस्थिती असती. तर पंतप्रधान मोदी आणि गृहमंत्री अमित शहा यांनी केव्हाच अध्यक्षाचे नाव जाहीर करून टाकले असते. पण आता संघाची मनधरणी करून नवा अध्यक्ष निवडण्याचे योग अजून पर्यंत तरी जुळलेले दिसत नव्हते. आता देशातील अनेक राज्यात भारतीय जनता पक्षात असंतोष उफाळून आलेला आहे. मोदी आणि शहा यांचा दबदबा कमी झाल्यामुळे अनेकांनी त्यांच्या दराऱ्याला झुगारून दिल्याचे वृत्त आहे. देशातील अनेक राज्यांचे प्रतिनिधी जे संघाचे कट्टर स्वयंसेवक आहेत. ते रोजच झुंडीच्या झुंडीने संघ कार्यालयात येऊन असंतोष व्यक्त करतात. हे आम्ही डोळ्याने पाहिले आहे. भारतीय जनता पक्षाला अध्यक्ष पदासाठी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने संजय जोशी यांचे नाव सुचवले होते. पण ते कोणत्याही परिस्थितीत मोदींना पसंत नाही. एखादेवेळी अमित शहा संजय जोशी यांचे नाव मान्य करू शकतात. पण नरेंद्रभाईंना संजय जोशी मुळीच पसंत नाहीत. त्याचा इतिहास सांगायची आता गरज नाही. अमित शहा यांना निवडणुकीसाठी पहिले तिकीट गुजरातचे कारभारी असताना संजय जोशी यांनीच दिले होते. हा उल्लेख इथे गरजेचा आहे. पण आता अनेक वेळा नागपुरात येऊनही पंतप्रधान मोदी यांनी संघ कार्यालयाला भेट दिली नाही. त्यामुळेच त्यांच्या या कृतीबद्दल संघ वर्तुळात जबरदस्त नाराजी आहे. परवा गृहमंत्री अमित शहा यांनी नागपुरात भाजपच्या नेत्यांसोबत बैठक घेतली. ती बैठक त्यांनी कोणत्या अधिकारात घेतली? असे संघ वर्तुळात विचारले जात आहे. संघाच्या कार्यालयाजवळ सुरेश भट सभागृहात बैठक घेतल्यावर बाजूलाच असलेल्या संघाच्या कार्यालयाकडे अमित शहा फिरकले नाहीत. याचाही संघाला मोठा रोष आहे. संघाने संजय जोशी यांच्याशिवाय आणखी एक नाव सुचवले होते. तत्पूर्वी भारतीय जनता पक्षाने संघप्रिय अशा शिवराज सिंग चौहान यांचे नाव सुचवले होते पण शिवराज सिंग ठाम भूमिका घेत नाहीत व ते सध्याचे जे दोन पक्षश्रेष्ठी सांगतात, त्याप्रमाणे ते वागतात. त्यामुळेच त्यांचेही नाव मागे पडले. अखेर संघाने आणखी एक नाव सुचवले आणि मग नाईलाजाने का होईना, त्या नावाला मोदी आणि शहा यांना मान्यता द्यावी लागली. ते नाव होते राजस्थानच्या माजी मुख्यमंत्री वसुंधरा राजे यांचे. वसुंधरा राजे यांच्या नावाची चर्चा बरेच दिवसापासून सुरू होती. पण आता त्याला मोदी आणि शहा यांनी मान्यता दिल्याने लवकरच त्यांच्या नावाची घोषणा होणार आहे. वसुंधरा राजे यांनी, आपण संघ जो आदेश देईल त्याप्रमाणे वागणार आहोत. असे जाहीर केल्यामुळे आता संघाकडून सुचवण्यात आलेल्या वसुंधराबाईंचे नाव स्वीकारल्यावर भारतीय जनता पक्षात किती आणि कसे बदल होतात. हे भविष्यकाळच ठरवणार आहे. एक गोष्ट मात्र नक्की की, केवळ राज्यातच नाही तर केंद्रातही अनेक बदल घडून येऊ शकतात. निवडून आलेल्या खासदारांपेक्षा मागील दाराने आलेल्या नवागतांना सध्या जे महत्त्व दिले जात आहे. त्यामुळे भारतीय जनता पक्षातील मूळचे निष्ठावंत, स्वयंसेवक अत्यंत नाराज आहेत. अशा परिस्थितीत संघाने भाजप श्रेष्ठींचे कोणतेही नाव न स्वीकारता आपण सांगू त्या नावाला भाजपने मंजुरी द्यावी. असा चक्क आदेशच दिल्यामुळे आता लवकरच नव्या अध्यक्षांची नवी कारकीर्द सुरू होणार आहे. कालपासून नागपुरातील हे नाट्य आणि त्याची परिणीती याचा अभ्यास केल्यावर असे दिसते की, आता संघाने संपूर्णपणे भाजपला शरण येण्यास भाग पाडले आहे. या नव्या घडामोडीचा भारताच्या राजकारणावर काय परिणाम होतो. हे आगामी काळात दिसणार आहे.

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

### पुरग्रस्त राज्यांना गृह मंत्रालयाकडून निधी

# महाराष्ट्राला १४९२ कोटी

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २:
गृह मंत्रालयाने राज्य आपत्ती प्रतिसाद निधी मधून केंद्राचा हिस्सा म्हणून आणि राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद निधी (एनडीआरएफ) मधून आगाऊ रक्कम म्हणून १४ पूरग्रस्त राज्यांना ५८५८.६० कोटी रुपये जारी केले आहेत. केंद्र सरकारने यात सर्वाधिक निधी महाराष्ट्राला १४९२ कोटी रुपये दिले आहेत. त्यामुळे राज्यातील पूरग्रस्त नागरिकांना दिलासा मिळणार आहे.

नैसर्गिक आपत्तीने बाधित झालेल्या राज्यांच्या अडचणी कमी करण्यासाठी, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली आणि केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शहा यांच्या मार्गदर्शनाखाली, मोदी सरकार त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असल्याचे सरकारने म्हटले आहे.

यावर्षी २१ राज्यांना १४,९५८ कोटी रुपयांहून अधिक निधी आधीच जारी करण्यात आला आहे. यामध्ये २१ राज्यांना एसडीआरएफ मधून ९०४४.८० कोटी रुपये, एनडीआरएफ मधून १५ राज्यांना ४५२८.६६ कोटी रुपये आणि राज्य आपत्ती निवारण निधी (एसडीएमएफ) मधून ११ राज्यांना १३८५.४५ कोटी रुपयांचा समावेश आहे.

केंद्र सरकारने सर्व पूरग्रस्त राज्यांना आवश्यक एनडीआरएफ पथके, लष्करी तुकड्या आणि हवाई दलाच्या मदतीसह सर्व लॉजिस्टिक सहाय्य देखील पुरवले असल्याचे केंद्र सरकारच्या वतीने स्पष्ट करण्यात आले आहे.

आंध्र प्रदेशला १०३६ कोटी रुपये, आसामला ७१६ कोटी रुपये, बिहारला ६५५.६० कोटी रुपये, गुजरातला ६०० कोटी रुपये, हिमाचल प्रदेशला १८९.२० कोटी रुपये, केरळला १४५.६० कोटी रुपये, मणिपूरला ५० कोटी रुपये, मिझोरामला २१.६० कोटी रुपये, नागालँडला १९.२० कोटी रुपये, सिक्कीमला २३.६० कोटी रुपये, तेलंगणाला ४१६.८० कोटी रुपये, त्रिपुराला २५ कोटी रुपये आणि पश्चिम बंगालला ४६८ कोटी रुपये निधी जारी केले आहेत. या वर्षी अतिवृष्टी, पूर आणि भूस्खलनामुळे ही राज्ये प्रभावित झाली आहेत.

# कुटुंबातील चौघांनी फाशी घेत संपविली जीवनयात्रा

### सेवानिवृत्त शिक्षकाने पत्नी, २ मुलांसह उचलले टोकाचे पाऊल





■ महासागर प्रतिनिधी
नरखेड, दि. २:
नागपुरात एकाच कुटुंबातील ४ जणांनी गळफास घेऊन आपली जीवनयात्रा संपवल्याची धक्कादायक घटना घडली आहे.

नरखेड तालुक्याच्या मोवाड गावात विजय पचोरी हे सेवानिवृत्त कुटुंब सहकुटुंब राहत होते. त्यांनी आपली पत्नी व २ मुलांसह गळफास घेऊन आत्महत्या केल्याची बाब बुधवारी सकाळी उजेडात आली. या कुटुंबाने हे टोकाचे पाऊल का उचलले? हे अद्याप स्पष्ट झाले नाही. पण या घटनेमुळे पंचक्रोशीत खळबळ माजली आहे.

या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन चारही मृतदेह ताब्यात घेतले. पोलिसांचे न्यायवैद्यक पथक घटनास्थळी पोहोचले आहे. सध्या ते या प्रकरणी विजय पचोरी यांच्या शेजाऱ्यांकडून माहिती मिळवण्याचा प्रयत्न केला जात आहे.

पोलिसांच्या माहितीनुसार, विजय पचोरी (६७), त्यांच्या पत्नी मालाबाई पचोरी (५५), मुलगा दीपक पचोरी (३८) व गणेश पचोरी (३६) अशी मृतांची नावे आहेत.

विजय पचोरी हे सेवानिवृत्त शिक्षक होते. वार्ड क्रमांक ५ मध्ये जानराव खोब्रागडे यांच्या घरी ते भाड्याने राहायचे. त्यांच्या पत्नी गृहिणी होत्या. यामधील ३ मृतदेह हे हातपाय बांधलेल्या स्थितीत आढळलेत. तर एक मृतदेह गळफास घेतलेल्या स्थितीत आढळून आला.

त्यामुळे तिघांचे हातपाय बांधून त्यांना फाशी दिल्यानंतर चौथ्या व्यक्तीने स्वतः गळफास घेतल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. या प्रकरणी घातपाताचाही संशय व्यक्त केला जात आहे.

# पुण्यात बावधन परिसरात हेलिकॉप्टर कोसळले



दोन पायलटसह अभियंत्याचा मृत्यू

■ वृत्तसंस्था, पुणे, दि. २:
पुणे जिल्ह्यातील बावधन येथे बुधवारी पहाटे हेलिकॉप्टर कोसळले. हेलिकॉप्टरमध्ये दोन पायलट आणि एक अभियंता होता. या अपघातात तिघांचाही मृत्यू झाला. बावधन येथील केके कन्स्ट्रक्शन हिलजवळ सकाळी ६.४५ च्या सुमारास ही घटना घडली. हे हेलिकॉप्टर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते खासदार सुनील तटकरे यांना घेण्यासाठी जात होते. त्या आधीच हा अपघात घडला.

सुनील तटकरे यांना हे हेलिकॉप्टर पुण्याहून मुंबईला घेऊन जाणार होते. तटकरे याच हेलिकॉप्टरमधून प्रवास करणार होते. पण, पुण्याहून उड्डाण घेतल्यानंतर ते कोसळले.

पिंपरी चिंचवड पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, हेलिकॉप्टरने ऑक्सफर्ड गोल्फ कोर्सच्या हेलिपॅडवरून उड्डाण केले होते. टेकऑफनंतर सुमारे १० मिनिटांनी हेलिकॉप्टर १.५ किमी अंतरावर कोसळले. डोंगराळ भागात हा अपघात झाला. सकाळी तिथे दाट धुके होते. अपघातानंतर हेलिकॉप्टरला आग लागली. हेलिकॉप्टर सरकारी की खासगी हे अद्याप समजू शकलेले नाही. मृतांचीही ओळख पटू शकली नाही.

हेलिकॉप्टर कोसळल्याची माहिती मिळताच पुणे पोलिस घटनास्थळी दाखल झालेत. हेलिकॉप्टर ज्या ठिकाणी कोसळले तो रहिवासी भाग नसल्याने मोठी दुर्घटना टळली. हेलिकॉप्टरमध्ये तिघे प्रवास करत असल्याची माहिती समोर आली आहे. हे हेलिकॉप्टर खासगी कंपनीचे असल्याची शक्यता वर्तवली जात आहे. मात्र हे प्रवासी कोणत्या दिशेने जात होते, याची माहिती देखील अद्याप समोर आलेली नाही.

## १० हजार फायलींवर ८ तासांत सह्या?

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २:



मी ८ तासांत १० हजार फायलींवर सह्या करतो, असा दावा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केला आहे. त्यांच्या अतिशयोक्तीपूर्ण विधानाची राजकीय वतुर्ळात खमंग चर्चा रंगली आहे.

शिंदे यांच्या उपस्थितीत सांगलीत शेतकरी मेळावा झाला. या मेळाव्यात बोलताना शिंदे यांनी हा दावा केला. या दाव्यानंतर राजकीय वर्तुळात हे कसे शक्य? असा प्रश्न उपस्थित केला आहे. अनेकांनी मुख्यमंत्र्यांचे हे विधान अतिशयोक्तीपूर्ण असल्याचाही आरोप केला आहे.

शिंदे म्हणाले की, मी गावाकडे हेलिकॉप्टरने शेती करण्यास जात असल्याचा आरोप करतात. मग आता गावाकडे कारने जाऊ का? तसे केल्यास पोहोचायला ८ ते १० तास लागतील. ८ तासांत मी १० हजार फायलींवर सह्या करतो. वेळ वाया घालवण्याची फुसरत नाही, असेही ते म्हणाले.

## भाजपच्या अध्यक्षपदी वसुंधरा राजे?

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २:



भारतीय जनता पक्षाच्या अध्यक्षपदी लवकरच वसुंधरा राजे यांची निवड होणार असल्याचे खात्रीलायक वृत्त आहे. केंद्रीय मंत्री जेपी नड्डा यांचा कार्यकाळ संपला आहे.

त्यानंतर भाजपचा पुढचा अध्यक्ष कोण असेल यावर बरेच चर्वीतचर्वण सुरू होते. अध्यक्षपदासाठी संजय जोशी, शिवराज सिंह चव्हाण, यांच्यासोबतच नितीन गडकरी यांच्या नावाचीही चर्चा होती. मात्र, त्यावर भाजपा आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघ यांचे एकमत होत नव्हते. त्यामुळेच नवीन अध्यक्ष मिळण्यात अडचणी येत होत्या. मात्र आता राजस्थानच्या पहिल्या महिला मुख्यमंत्री म्हणून मान मिळालेल्या वसुंधरा राजे यांच्या नावावर राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि भारतीय जनता पक्षाचे एकमत झाल्याची माहिती सूत्रांनी दिली. घटस्थापनेनंतर भाजपच्या अध्यक्षपदी वसुंधरा राजे यांच्या नावाची घोषणा होऊ शकते, असे बोलले जात आहे.

## अभिनेता गोविंदाची पोलिसांकडून चौकशी

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २:



मुंबई पोलिसांनी बुधवारी बॉलीवूड अभिनेता गोविंदा (६०) याची हॉस्पिटलमध्ये गोळीबार केल्याप्रकरणी चौकशी केली. १ ऑक्टोबर रोजी गोविंदाच्या पायात गोळी लागल्याने तो जखमी झाला होता.

गोळी झाडली तेव्हा रिव्हॉल्व्हर कपाटात ठेवल्याचे त्याने सांगितले होते. गोविंदाच्या पायावर शस्त्रक्रिया करून गोळी काढण्यात आली. त्याला मुंबईतील क्रिटी केअर हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले आहे.

जुहू पोलिसांनी त्याची चौकशी केली असता गोविंदाने गोळी चुकून सुटल्याचा पुनरुच्चार केला. रिव्हॉल्व्हर २० वर्षे जुने असल्याचे अभिनेत्याने पोलिसांना सांगितले.

## राष्ट्रवादीकडून १०% अल्पसंख्याकांना उमेदवारी

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २:



महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत राष्ट्रवादी पक्ष आपल्या कोट्यातून अल्पसंख्याक समाजाच्या उमेदवारांना १० टक्के जागा देणार आहे. अजित पवार यांनी ही माहिती दिली.

जन सन्मान यात्रे'ला संबोधित करताना अजित पवार म्हणाले की, मला अल्पसंख्याक समाजाला सांगायचे आहे की, विधानसभा निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसकडून लढवण्यात येणाऱ्या १० टक्के जागा अल्पसंख्याक उमेदवारांना देण्याचा निर्णय घेतला आहे.

विशेष म्हणजे, फडणवीस यांनी लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रातील ४८ पैकी १४ मतदारसंघात 'व्होट जिहाद' झाल्याचा दावा केल्यानंतर अल्पसंख्याक समाजाला निवडणुकीत प्रतिनिधित्व देण्याचे आश्वासन अजित पवार यांनी दिले आहे.

## लेबनॉनमध्ये २ किमीपर्यंत आत घुसले इस्त्रायली सैनिक

■ वृत्तसंस्था, तेल अविव, दि. २:
लेबनॉनच्या दक्षिणेकडील भागात इस्त्रायल आणि हिजबुल्लाह यांच्यात सुरू असलेल्या भू-युद्धात बुधवार २ ऑक्टोबर रोजी इस्त्रायली सैन्य मरून अल-रस गावाच्या २ किमीच्या आत पोहोचले. बीबीसीने दिलेल्या माहितीनुसार, इस्त्रायली सैनिकांची येथे हिजबुल्लाहच्या सैनिकांशी चकमकही झाली होती.

समोरासमोर झालेल्या या लढाईत आतापर्यंत 2 इस्त्रायली सैनिकांचा मृत्यू झाला आहे, तर 18 जण जखमी झाले आहेत. इस्त्रायलचा पेजर हल्ला, वॉकी-टॉकी हल्ला आणि हवाई हल्ल्यानंतर आता हिजबुल्लाहच्या विरोधात जमीनीवरील कारवाई आहे.



मंगळवारी रात्री इराणने इस्त्रायलवर १८० बॅलेस्टिक क्षेपणास्त्रे डागली. हा हल्ला मोसाद मुख्यालय, नेवाटीम एअर बेस आणि टेल नोफ एअर बेसला लक्ष्य करण्यात आला.

## सीआरपीएफच्या इतिहासात प्रथमच सफाई कामगार आणि स्वयंपाकी यांना पदोन्नती

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. २:
केंद्रीय राखीव पोलीस दलान ८५ वर्षांच्या इतिहासात प्रथमच सफाई कामगार आणि शिपाई यांना पदोन्नती दिली आहे. एका समारंभात २१७ कर्मचाऱ्यांना नवीन पदे देण्यात आली. आजवर त्यांना पदोन्नती मिळत नव्हती.

## आईचे अवयव शिजवून खाणाऱ्या मुलाची फाशीची शिक्षा कायम

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २:



आईची हत्या करणाऱ्या क्रूर मुलाची फाशीची शिक्षा मुंबई उच्च न्यायालयाने कायम ठेवली आहे. २०१७ मध्ये कोल्हापुरात घडलेल्या या खून प्रकरणात आरोपी मुलाने दारूसाठी पैसे देण्यास नकार दिल्याने आईची हत्या केली होती. यानंतर शरीराचे अवयव बाहेर काढून त्यावर मीठ आणि मिरपूड टाकून खाल्ले होते. या घटनेतील आरोपीला फाशीची शिक्षा सुनावण्यात आली आहे.


आरोपी मुलाने आईचे हृदय, मेंदू, यकृत आणि किडनी एका पातेल्यात टाकून ते मीठ आणि मिरपूड घालून खाण्यास सुरुवात केली. सुनील कुचकोरवी असे त्या नराधम मुलाचे नाव आहे. तीन वर्षांच्या सुनावणीनंतर मुंबई उच्च न्यायालयाने १ ऑक्टोबर रोजी कोल्हापूर न्यायालयाचा निर्णय कायम ठेवला आहे. तसेच या प्रकरणाला हायकोर्टाने हा 'रेरेस्ट ऑफ रेअर केस' मानले आहे.

## शिलालेखावरून 'वित्ताविना शूद्र खचले' ओळ गायब... स्मारक वादात

### भाजपाने ठरवून अपमान केल्याचा काँग्रेसचा आरोप

■ वृत्तसंस्था, नाशिक, दि. २:
नाशिक येथे तब्बल ४ कोटी ६८ लाख खर्चून बांधलेले महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांचे स्मारक वादात सापडले आहे. स्मारकातील शिलालेखावरून महात्मा फुले यांच्या अखंडातील 'वित्ताविना शूद्र खचले' ही ओळ गायब केली, तर एका ओळीत सोयीनुसार बदल केलेत.

काँग्रेसने या प्रकरणी तीव्र शब्दांत निषेध नोंदवला. विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी भाजपने महापुरुषांचा ठरवून अपमान केला. सरकारचे शाहू-फुले-आंबेडकर यांच्या विचारांवरचे बेगडी प्रेम उघड झाल्याचे म्हटले आहे. दरम्यान, या वादानंतर नाशिक महापालिकेने शिलालेख दुरुस्तीचे काम सुरू केल्याचे समजते.




नाशिकमध्ये महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांचे भारतातील सर्वात मोठे अधार्कृती ब्राँझ धातूचे भव्यदिव्य स्मारक उभारण्यात आले आहे. या स्मारकाचे लोकार्पण २८ सप्टेंबर रोजी मुख्यमंत्री शिंदे, उपमुख्यमंत्री फडणवीस, अजित पवार, मंत्री छगन भुजबळ, पालकमंत्री दादा भुसे यांच्या उपस्थितीत झाले. हेच स्मारक आता वादात सापडले.

स्मारक परिसरात महात्मा फुले यांच्या शेतकऱ्यांचा आसूड या ग्रंथातल्या खंडातील काही ओळी शिलालेखावर आहेत.

विद्येविना मती गेली,
मतीविना नीती गेली,
नीतीविना गती गेली,
गतीविना वित्त गेले,
वित्ताविना शूद्र खचले,
इतके अनर्थ एका अविद्येने केले!

मात्र, यातील 'वित्ताविना शूद्र खचले' ही ओळच शिलालेखावरून गायब आहे, तर 'गतीविना वित्त गेले' या ओळीतही बदल केला गेला. त्याऐवजी 'गतीविना वित्त खचले' अशा ओळी शिलालेखावर टाकल्या. हे बदल केल्यामुळे बहुजनांचा इतिहास पुसला गेला, असा आरोप होतोय.

महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्या स्मारकातील शिलालेखात बदल केल्यामुळे काँग्रेस आक्रमक झाली आहे. वडेट्टीवार यांनी एक्सवर एक पोस्ट टाकून तीव्र शब्दांत प्रतिक्रिया दिली.

ते म्हणतात की, महात्मा ज्योतिबा फुले यांनी या सहा ओळींमधून शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. त्यांच्या या संदेशानंतर समाजात बदल घडला. त्याचा परिणाम आज दिसून येत आहे. राज्यातील महायुती सरकारला महात्मा फुले यांचे हे विचार मान्य नाहीत, असाच प्रश्न पडायला लागला आहे. हा प्रकार जाणूनबुजून करण्यात आल्याचेही वडेट्टीवार म्हणाले.

**महासागर**
विदर्भ व मुंबई, पालघर, नाशिक, बहुप्रसारित मराठी दैनिक

नागपूर शहराकरिता नियुक्ती करावयाची आहे.

| | | |
|---|---|---|
| उपसंपादक | – | 2 |
| शहर प्रतिनिधी | – | 2 |
| कम्प्युटर ऑपरेटर | – | 2 |
| जाहीरात मार्केटिंग करीता | – | 2 |
| मराठी इंग्लिश ट्रान्सलेटर | – | 1 |

अर्ज ईमेल करा
nagpurpost@gmail.com
किंवा फोन करा : 9881717811
पत्ता : महासागर, चांडक लेआऊट, कॉटन मार्केट, नागपूर.

# इगतपुरीची जागा शिवसेनेसाठी घेणण्याची पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्याकडे उबाठाची मागणी

**इगतपुरी, दि. २ : प्रतिनिधी**

इगतपुरी तालुका शिवसेनेचा हा गेल्या कित्येक वर्षापासून बालेकिल्ला राहिला आहे आजपर्यंत पंचायत समिती जिल्हा परिषद वर शिवसेनेचे सर्वाधिक उमेदवार निवडून आलेले आहेत आणि ग्रामपंचायत शिवसेनेचे सरपंच असून त्यामुळे इगतपुरी त्रंबकेश्वर मतदारसंघाची विधानसभेची जागा शिवसेनेला मिळावी याबाबत इगतपुरी त्र्यंबकेश्वर मतदार संघाचे लोकसभा संपर्कप्रमुख निवृत्ती जाधव यांनी पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांची मुंबई येथे भेट घेऊन जागा सोडण्याबाबत साकडे घातले आहे. दरम्यान गेल्या दोन दिवसापूर्वी शिवसेनेचे नेते खासदार संजय राऊत यांनी नाशिक येथे भेट घेतली होती त्याप्रसंगी देखील शिवसेना लोकसभा संपर्कप्रमुख जाधव यांनी खासदार अवतांकडे देखील मागणी केली होती यावेळी खासदार राऊत यांनी सकारात्मक भूमिका घेत पक्षप्रमुखांकडे मागणी करणार असल्याचे सांगितले दरम्यान यावेळी जाधव यांनी मुंबई येथे मातोश्रीवर पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांची भेट घेऊन त्यांच्याकडे मागणी केली असता त्यांनीही या बाबीला सकारात्मक उत्तर देत लवकरच निर्णय कळवायला जाईल असे सांगितले. यावेळी इगतपुरी चे तालुका प्रमुख राजेंद्र नाठे व त्रंबकेश्वर चे तालुका प्रमुख समाधान बोडके यांच्यासह मतदारसंघातील सर्व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भाजपमध्ये उमेदवारीसाठी चिठ्ठयांचा खेळ !

**ठाणे, दि. २ : प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रासारख्या मोठया राज्यात पराभवाचे तोंड पहावे लागल्यानंतर भाजपने विधानसभा निवडणुकांना सामोरे जाताना उमेदवारांची निवड प्रक्रियेतही नवेनवे 'प्रयोग' करण्यास सुरुवात केली आहे. राज्यातील वेगवेगळया मतदारसंघात उमेदवारांची निवड करणे सोपे जावे यासाठी भाजपच्या प्रदेश कार्यकारणीने जिल्हा स्तरांवर चक्क चिठ्ठया टाकून उमेदवारांची पसंती कळविण्याच्या आदेश स्थानिक पदाधिकाऱ्यांना दिले आहेत. त्यानुसार जिल्हा कार्यकारणीत असलेल्या पदाधिकारी, सदस्यांना आपल्या पसंतीच्या तीन उमेदवारांची नावे पसंतीक्रमानुसार बंद लिफाफ्यात पक्ष निरीक्षकाकडे सोपवावी लागणार आहेत. लोकसभा निवडणुकांच्या पराभवामुळे सतर्क झालेल्या भाजप नेत्यांनी राज्यभरातील पदाधिकाऱ्यांशी संवाद वाढविण्यावर सध्या भर दिला आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि भाजप नेत्यांमधील संवाद वाढावा यासाठी देखील पद्धतशीर प्रयत्न केले जात आहेत. देशाचे गृहमंत्री अमित शहा सध्या महाराष्ट्राच्या दौऱ्यावर असून नागपूर, मराठवाडा, विदर्भ, पश्चिम महाराष्ट्राच्या दौऱ्यात स्थानिक पदाधिकारी आणि बुथ स्तरावरील कार्यकर्त्यांशी संवाद साधल्यानंतर मंगळवारी कोकण-ठाणे-पालघर पट्ट्यातील संघटनात्मक बाबींचा आढावा घेणार आहे. शहा यांच्या दौऱ्यात ते राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या स्थानिक कार्यकर्त्यांसोबतही संवाद साधणार आहे. त्यामुळे कोकण पट्टीतील शहा यांचा हा दौरा अनेक अर्थाने वैशिष्ट्यपुर्ण मानला जात आहे. एकीकडे संघटनात्मक पातळीवर संवादाची भूमीका पक्षाच्या नेत्यांनी घेतली असताना दुसरीकडे वेगवेगळ्या मतदारसंघातील उमेदवारांची निवड करतानाही स्थानिक कार्यकारणी, पदाधिकारी यांचे मत आजमावून घेण्याचा प्रयत्न आता पक्षाने सुरु केला आहे. ही प्रक्रिया बुधवारपासून राज्यभरात सुरु होत असून लिफाफे आणि चिठ्ठयांमधून उमेदवारांचा पसंतीक्रम मांडण्याची ही पद्धत काहीशी वादग्रस्तही ठरण्याची चिन्हे आहेत.

**चिठ्ठयांच्या खेळातून नवी स्पर्धा ?**

राज्यभरातील वेगवेगळया मतदारसंघात राज्य भाजपकडून नेमण्यात आलेल्या निरीक्षकाकडून या बैठका घेण्यात येणार आहेत. ठाणे शहर आणि आसपासच्या विधानसभा मतदारसंघाची जबाबदारी पालघरचे खासदार हेमंत सावरा यांच्याकडे सोपविण्यात आली असून ते बुधवारी सायंकाळी पक्षाच्या वर्तकनगर येथील मुख्यालयात बंद लिफाफ्यातून उमेदवारांचा पसंतीक्रम जाणून घेणार आहेत. त्यानुसार पक्षाचे जिल्हा कार्यकारणी पदाधिकारी, सदस्य, जिल्हा स्तरावरील प्रदेश निमंत्रीत सदस्य, खासदार, आमदार यांना या बैठकीसाठी निमंत्रीत करण्यात आहे. या सदस्यांना एक बंद लिफाफा सोपविला जाणार आहे. या लिफाफ्यात तीन चिठ्ठयांवर पसंतीक्रमानुसार कोणत्या उमेदवाराची ठराविक मतदारसंघात निवड केली जावी याचे पर्याय उपस्थित सदस्यांकडून भरुन घेतले जाणार आहे. ही प्रक्रिया व्यक्तीगत स्तरावर गोपनीय असावी अशी रचना करण्यात आली आहे. हे बंद लिफाफे निरीक्षकांकरवी पुढे राज्य कार्यकारणीकडे पाठविले जाणार आहेत.

**प्रक्रिया निर्दोष होण्याविषयी शंका ?**

दरम्यान उमेदवार निवडीसाठी भाजप नेत्यांनी अनुसरलेली या नव्या कार्यपद्धतीमुळे अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. अनेक जिल्ह्यामध्ये पक्षाच्या जिल्हा कार्यकारणीवर ठराविक नेत्यांचा आणि इच्छुक उमेदवारांचा वरचष्मा आहे. नवी मुंबईतील बेलापूर विधानसभा मतदारसंघाचे उदाहरण घ्यायचे झाले तर याठिकाणी संदीप नाईक हे पक्षाचे जिल्हाध्यक्ष असून येथील संपूर्ण कार्यकारणीवर त्यांचे वर्चस्व आहे. याठिकाणी स्थानिक आमदार मंदा म्हात्रे आणि नाईक कुटुंबियांमध्ये विळ्या-भोपळ्याचे नाते आहे. असाच प्रकार मीरा-भाईदर तसेच इतर काही मतदारसंघातही आहे. जिल्हा कार्यकारणीच्या पदाधिकारी आणि सदस्यांची ही 'चिठ्ठी मते' त्यामुळे एकांगी असू शकतात असा मतप्रवाह पक्षातील एका मोठया वर्गात आतापासूनच व्यक्त होत आहे. यासंबंधी भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्याशी वारंवार संपर्क साधण्याचा प्रयत्न करुनही तो होऊ शकला नाही. ठाणे जिल्हा कार्यकारणीतील एका वरिष्ठ पदाधिकाऱ्याने मात्र बुधवारपासून अशापद्धतीने उमेदवार निवडीच्या पर्यायांवर बंद लिफाफ्यांद्वारे मते मागविण्याची प्रक्रिया सुरु केली जाणार आहे, असे सांगितले.

# राष्ट्रवादी अजितदादा गटाच्या जिल्हा उपाध्यक्षासह अनेक कार्यकर्त्यांचा शिंदेंच्या शिवसेनेत प्रवेश

**नवी मुंबई, दि. २ : प्रतिनिधी**

नवी मुंबईतील राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाला आता खिंडार पडले आहे. शिवसेना उपनेते विजय नाहटा यांच्या कार्य प्रणालीवर आणि नेतृत्वावर विश्वास ठेऊन अजित पवार गटाचे नवी मुंबई जिल्हा उपाध्यक्षाने आपल्या शेकडो कार्यकर्त्यांसह शिवसेना पक्षात जाहीर प्रवेश केला. दरम्यान, झोपडपट्टीवासियांना एसआरए योजनेअंतर्गत घरे देण्यासाठी युती सरकार वचनबद्द असून शासकीय बैठक लावून सर्वे सूरू करू असे आश्वासन विजय नाहटा यांनी बोलताना दिले.

राज्याचे संवेदनशील मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कार्यप्रणालीने प्रभावित होऊन शिवसेना उपनेते विजय नाहटा यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेऊन नवी मुंबईतील राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (अजित पवार गट) जिल्हा उपाध्यक्ष सुरेश कोरे यांनी शेकडो समर्थक कार्यकर्त्यांसह सिबिडी येथील पंजाब हेरिटेज भवन सभागृहात झालेल्या शिवसेना पक्ष प्रवेश सोहळ्यात शिवसेना पक्षात जाहीर प्रवेश केला. नवी मुंबई जिल्हा उपाध्यक्ष सुरेश कोरे सह त्यांचे समर्थक प्रमुख पदाधिकारी किशोर गायकवाड, किसन वाणी, विनोद लगाडे, अनिल सोनावणे, श्रीकांत गायकवाड, सत्यम सोनकांबळे, शशिकांत गायकवाड, ज्ञानेश्वर बाविस्कर, कुंदन सोनकांबळे, काशिनाथ चौधरी यासह शेकडो महिला आणि पुरुष कार्यकर्त्यांनी शिवसेना पक्षात प्रवेश केला.

यावेळी बोलताना उपनेते विजय नाहटा यांनी सांगितले की, राज्याचे युती सरकार महिला, जेष्ठ नागरिक, युवक आदि सर्वच घटकासाठी विविध कल्याणकारी योजना राबवित असल्याने सरकारची लोकप्रियता वाढत आहे. त्यामुळे नवी मुंबईतील सर्वपक्षीय कार्यकर्ते स्वयंस्फूर्तीने शिवसेनेत प्रवेश करत असून आता पर्यंत सुमारे दोन हजार सर्वपक्षीय कार्यकर्त्यांचा बेलापूर विधानसभा मतदारसंघात पक्ष प्रवेश झाला आहे. झोपडपट्टीवासियांना आहे त्या ठिकाणी सर्व सुविधायुक्त एसआरए योजनेतून घरे मिळवून देऊ आपण निश्चित रहा असे उपनेते विजय नाहटा यांनी बोलताना सांगितले.

# पंतप्रधानांच्या दौऱ्यासाठी ठाण्यात अवजड वाहतुकीला बंदी

**ठाणे, दि. २ : प्रतिनिधी**



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा घोडबंदर येथील कासारवडवली भागात ५ ऑक्टोबरला दौरा आयोजित करण्यात आला आहे. या कालावधीत अतिमहत्त्वाचे व्यक्ती तसेच नागरिकांची मोठ्या प्रमाणात गर्दी होण्याची शक्यता आहे. त्यामुळे ठाणे वाहतुक पोलिसांनी अवजड वाहनांना घोडबंदर मार्गावर वाहतुकीस बंदी लागू केली आहे. या वाहनांना पर्यायी मार्गाने वळविण्यात आले आहे. मोदी यांना पाहण्यासाठी ठाणे जिल्ह्यातील विविध भागातून भाजपच्या पदाधिकाऱ्यांची मोठी गर्दी होण्याची शक्यता आहे. त्यामुळे घोडबंदर मार्गावर कोंडीची शक्यता व्यक्त केली जात आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी हे ५ ऑक्टोबरला कासारवडवली येथील वालावलकर मैदान येथे मुख्यमंत्री महिला सशक्तीकरण अभियान या कार्यक्रमासाठी उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमास सुमारे ४० हजार नागरिक उपस्थित राहण्याची शक्यता प्रशासनाकडून व्यक्त केली जात आहे. त्यामुळे जिल्ह्यातील विविध भागातून नागरिक घोडबंदर मार्गे कासारवडवली मैदानात पोहचतील. ठाणे आयुक्तालय क्षेत्रात अवजड वाहनांना दुपारी १२ ते ४ आणि रात्री ११ ते पहाटे पाच या कालावधीत वाहतुक करण्यास परवानगी आहे. घोडबंदर मार्गाने उरण जेएनपीटी येथून हजारो अवजड वाहने गुजरातच्या दिशेने वाहतुक करत असतात. तसेच गुजरात, वसई येथून वाहने भिवंडी आणि नवी मुंबईच्या दिशेने वाहतुक करत असतात. हलक्या वाहनांची वाहतुक देखील या मार्गावरून मोठ्याप्रमाणात होत असते. अवजड वाहनांमुळे कोंडी किंवा अपघात होऊ नये म्हणून ठाणे पोलिसांनी वाहतुक बदल लागू केले आहेत.

पोलिसांनी अवजड वाहनांना घोडबंदर मार्गावर ५ ऑक्टोबरला २४ तास बंदी लागू केली आहे. असे असले तरी मोदी यांच्या सभेसाठी भाजपचे पदाधिकारी वाहनांनी, बसगाड्यांनी विविध भागातून घोडबंदर मार्गे मैदानात येण्याची शक्यता आहे. त्यामुळे घोडबंदर मार्गावर वाहनांचा भार वाढून कोंडीची शक्यता व्यक्त केली जात आहे.

**अवजड वाहनांची पर्यायी वाहतुक**

- गुजरात येथून नवी मुंबईच्या दिशेने वाहतुक करणारी अवजड वाहने मनोर टेन नाका येथून विक्रमगड, पाली, वाडा, आबिटघर, आटगाव, शहापूर, मुरबाड, कर्जत मार्गे नवी मुंबई येथील जेएनपीटी बंदराच्या दिशेने वाहतुक करतील.
- नाशिक येथून नवी मुंबईच्या दिशेने वाहतुक करणारी अवजड वाहने शहापूर, मुरबाड, कर्जत मार्गे नवी मुंबई, जेएनपीटी मार्गे वाहतुक करतील.
- मुंबई येथून वाहतुक करणारी जड-अवजड वाहने ऐरोली टोलनाका मार्गे कर्जत, मुरबाड, शहापूर, वाडा, मनोर टेन नाका मार्गे वाहतुक करतील. किंवा जोगेश्वरी विक्रोळी मार्गे पश्चिम द्रुतगती मार्गाने वाहतुक करतील.
- नवी मुंबई येथून गुजरात किंवा नाशिकच्या दिशेने वाहतुक करणारी अवजड वाहने कर्जत, मुरबाड, शहापूर मार्गे नाशिक तसेच आटगाव, आबिटघर, वाडा, पाली, विक्रमगड, मनोर टेन नाका, गुजरात मार्गे वाहतुक करतील.

# कोस्टल रोडकरिता होणाऱ्या वृक्षतोडीला विरोध काँग्रेस पक्षाचा आंदोलनाचा इशारा

**नवी मुंबई, दि. २ : प्रतिनिधी**

सीबीडी आणि नेरूळ येथे शेकडो कोटी रुपये खर्च करून बांधण्यात आलेल्या जेटी सिडकोच्या चुकीच्या नियोजनामुळे फेल गेल्या आहेत हे वास्तव असताना सीबीडी खारघर दरम्यान कोस्टल रोडची गरज काय असा सवाल काँग्रेस पक्षाने विचारला आहे. विकासाला आमचा विरोध नाही,मात्र कोस्टल रोडसाठी मोठया प्रमाणावर वृक्षतोडीला विरोध आहे. त्यामुळे सिडकोने कोस्टल रोडच्या निर्णयाचा फेरविचार करावा अन्यथा काँग्रेस तर्फे आंदोलन करण्यात येईल असे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे प्रवकते सय्यद नाशिर हुसेन यांनी सांगितले.

सिडको कडून सीबीडी ते खारघर दरम्यान कोस्टल रोड तयार करण्यात येत आहे. यासाठी सुमारे ३० हजार झाडे तोडली जाणार आहेत. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आपल्या मन की बात या कार्यक्रमातून प्रत्येक नागरिकांनी आपल्या आईच्या नावाने एक झाड लावावे असे सांगत आहेत. मात्र दुसरीकडे विकासाच्या नावाखाली मोठ्या प्रमाणावर झाडे तोडली जात आहेत. विकासाला आमचा विरोध नाहीं,परतू विकासाच्या नावाखाली होणारी भरमसाठ वृक्षतोडीला आमचा विरोध असल्याचे नासीर हुसेन म्हणाले.

सिडकोकडून नेरूळ ते खारघर कोस्टल रोड आणि जेटीच्या बांधकामातील तांत्रिक त्रुटी बाबत माहिती देण्यासाठी वाशी येथील काँग्रेस भवन येथे आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत काँग्रेस पक्षाचे नवी मुंबई जिल्हाध्यक्ष अनिल कौशिक, प्रदेश काँग्रेसचे सचिव रामचंद्र (आबा) दळवी , इंटक अध्यक्ष रविंद्र सावंत आदी उपस्थित होते.

यावेळी बोलताना नासीर हुसैन यांनी सांगितले की,सिडकोने कोट्यावधी रुपये खर्च करून सीबीडी आणि नेरूळ येथे जेटी तयार केल्या आहेत. त्यात सिडकोच्या नियोजनातील चुकांमुळे प्रवासी जलवाहतूक सुरू होऊ शकली नाही.शिवडी ते न्हावा शेवा अटल सेतूचे बांधकाम सुरू असताना ,सीबीडी आणि नेरूळ येथे जेटी तयार करण्याची गरज काय? असा सवाल करत जेटी तयार करतांना किमान ६ फूट समुद्र खोली असने आवश्यक आहे. सिडकोने तयार केलेल्या जेटींची खोली फक्त ३ फूट इतकी आहे. नेरूळ ते खारघर कोस्टल रोड सीबीडी सेक्टर -१५ मधुन जात असल्याने, तेथील नागरिकांना त्रास होणारं आहे तसेच महापालिकेच्या वतीने वन टाइम प्लॅनिंग माध्यमातून कोट्यावधी रुपये खर्च करून झाडे लागवड व सुशोभीकरण करण्यात आले आहे. सिडकोने कोस्टल रोड बाबतचा आपल्या निर्णयाचा फेरविचार करावा अन्यथा काँग्रेस पक्ष आंदोलन करेल असे सय्यद नासीर हुसैन यांनी सांगितले.

# सिडकोच्या कोंढाणे धरणात महायुतीचा 1400 कोटींचा महाघोटाळा !

## विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांचा गौप्यस्फोट

**मुंबई, दि. २ : प्रतिनिधी**



महायुतीची घोटाळ्यांची मालिका अखंड सुरूच आता सिडकोच्या पाणी पुरवठा योजनेत कोंढाणे धरण प्रकल्पात तब्बल १४०० कोटींचा महाघोटाळा केल्याचा गौप्यस्फोट करत,सध्या महायुती मेघा इंजिनिअरिंगवर मेहेरबान आहे. त्यामुळे या कंपनीचा खिसा भरण्यासाठी हा घोटाळा केला असल्याचा थेट हल्लाबोलही विधानसभा विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी मंगळवारी आपल्या शासकीय निवासस्थानी घेतलेल्या पत्रकार परिषदेत बोलताना केला. त्याचवेळी सरकारने या सिडकोच्या पाणीपुरवठा योजनेतील कोंढाणे धरण प्रकल्पातील घोटाळ्याची चौकशी करावी,अशी मागणी करत आमचं सरकार आल्यावर महायुतीच्या काळातील घोटाळ्यांची आम्ही चौकशी करू असा इशाराही त्यांनी यावेळी दिला.

सरकार मेघा इंजिनिअरिंगवर कंत्राटांची खैरात करत असून सरकारला लाडक्या कंत्राटदारांचे खिसे भरून निवडणूक फंड गोळा करण्यात व्यस्त असल्याने शेतकऱ्याकडे पहायला सरकारला वेळ नाही. आणि म्हणून सोयाबिन उत्पादक शेतकरी सोयाबिनला दर मिळण्यासाठी मंत्र्यालयासमोर टाहो फोडत आहे. अदानीला खूश करण्यासाठी पाम तेल आयत केल्याने सोयाबिनचे दर पडले. सरकारसाठी अदानी, मेघा इंजिनिअरिंग हे लाडके कंत्राटदार आहेत.पण हे सरकार शेतकऱ्याला लाडका कधी म्हणणार असा खडा सवालही वडेट्टीवार यांनी यावेळी उपस्थित केला.

वडेट्टीवार म्हणाले की, नवी मुंबईतील सिडको तर्फे पाणी पुरवठा करण्यासाठी कोंढाणे धरण हस्तांतरीत करण्यात आले.यासाठी सिडकोने १४०० कोटींचे टेंडर काढले.यापूर्वी या धरणाबाबत मुंबई हायकोर्टात याचिका दाखल झाली होती.अंजली दमानिया यांनी याचिका ही दाखल केली होती.यावेळी मूळ कंत्राटदार काम करण्यास तयार असेल तर त्याला काम करण्यास सांगितले होते. त्यावेळी झालेल्या ३५ टक्के कामासाठी मूळ कंत्राटदाराला १०० कोटी रुपये देण्यात आले. मात्र अचानक आता सिडकोला साक्षात्कार झाला आणि इथे माती ऐवजी सिमेंट काँक्रीटचे धरण झाले पाहिजे अशी सरकारने भूमिका घेतली.त्यामुळे पुन्हा ३ सप्टेंबर २०२३ रोजी टेंडर काढले. यामध्ये ७०० कोटींचे काम वाढवून १४०० कोटी वर नेण्यात आले.पण मुळात प्रश्न असा आहे की आरसीसी काम करण्याचा निर्णय का घेतला गेला. मेघा इंजिनियरिंग या कंपनीला समोर ठेवूनच हा निर्णय घेण्यात आला आहे हे स्पष्ट आहे. मोरबे धरणातून २० वर्ष झाली दररोज नवी मुंबईला पाणी पुरवठा होतो.मग हे धरण आरसीसी करण्याचे कारण काय? लाडक्या कंत्राटदारासाठी कोंडाणे धरणाचे स्वरूप का बदलले.याचे उत्तर सरकारने दिले पाहिजे, अशी मागणीही त्यांनी यावेळी केली.

वडेट्टीवार म्हणाले की,याच मेघा इंजिनिअरिंगचे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी कौतुक करतात. ठाणे बोरिवली भुयारी मार्गाचे काम देखील याच कंपनीला दिले आहे.यासाठी नुकत्याच झालेल्या कॅबिनेटमध्ये १८ हजार ८३८ कोटींच्या खर्चाला मान्यता देण्यात आली. मूळ किंमत १४ हजार कोटीं असताना ती अचानक १८ हजार कोटी रूपये या प्रकल्पाची किंमत कशी झाली हा देखील प्रश्न आहे.सिंचन,वाहतूक, वीज अशा अनेक क्षेत्रात या कंपनीने आपले हातपाय पसरले असून या कंपनीला नागपूरला कामे दिलेली आहेत. पुणे रिंग रोड, बस निर्मिती सारखी कामेही या कंपनीला दिलेले असून इलेक्टोरल बाँड सर्वाधिक खरेदी करणारी ही कंपनी असल्यानेच सरकारने हे लाड पुरविले आहेत. पुणे रिंग रोड,नागपूर महानगर पालिका, समृद्धी, ठाणे-बोरिवली दुहेरी बोगदा, ईव्ही बस निर्मिती अशी सगळी कामे या कंपनीला देऊन महायुती सरकारने कंपनीवर खैरात केल्याचाही गंभीर आरोप त्यांनी यावेळी केला.

महायुती सरकार घोटाळे करताना थकत नाही.महाराष्ट्र लूटून खाण्याचे कामच सध्या सुरू असून या सरकारचे कितीही घोटाळे जनतेसमोर मांडले तरी देखील सरकारला काहीच फरक पडत नाही.कारण महायुती सरकार गेंड्याच्या कातडीचे सरकार आहे. या सरकारला हाकलल्याशिवाय महाराष्ट्राचे भलं होणार नाही अशा परखड शब्दात वडेट्टीवार यांनी महायुतीच्या भ्रष्ट कारभाराची चिरफाडच केली.

# खारघरमध्ये मालमत्ता कर संकलन केंद्राचे उद्धाटन

**पनवेल, दि. २ : प्रतिनिधी**

पनवेल महापालिकेच्या वर्धापनदिनाच्या पार्श्वभूमीवर नागरिकांना जास्तीत जास्त सोयी सुविधा देण्याच्या उद्देशाने आज दिनांक १ऑक्टोबर रोजी खारघर मधील केंद्रीय विहार जवळील प्राईड ईमारतीच्या तळमजल्यावर मालमत्ता कर संकलन केंद्राचे उद्धाटन आयुक्त श्री. मंगेश चितळे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी उपायुक्त बाबासाहेब राजळे, सहायक आयुक्त स्वरूप खारगे, प्रभाग अधिकारी स्मिता काळे, प्रभारी कर अधिक्षक सुनील भोईर, महेश गायकवाड, प्रभारी अधिक्षक जितेंद्र मढवी, अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

मालमत्तांधारकांच्या बिलांमधील अडचणी लक्षात घेऊन, त्या सोडविण्यावरती महापालिकेच्या मालमत्ता कर संकलन विभागाने भर दिला आहे. नागरिकांना कर भरणे सोपे जावे, त्यांच्या मालमत्ता कराच्या बिलामध्ये दुरूस्ती व्हावी, तक्रारींचे निवारण लवकर व्हावे तसेच महापालिका मुख्यालयात येण्या जाण्याचा वेळ वाचावा या उद्देशाने हे मालमत्ता कर संकलन केंद्र सुरू करण्यात आले आहे.

मालमत्ता कर भरण्याची सुविधा यापूर्वी प्रभाग समितीमध्ये देण्यात येत होती परंतू नागरिकांना अधिक सोयीचे व्हावे यासाठी हे कर संकलन केंद्र सुरू केले आहे. भविष्यात याठिकाणाहून अधिकाधिक सुविधा देण्याच्यादृष्टीने प्रयत्न केले जाणार आहेत. तसेच दर शनिवारी महापालिकेस साप्ताहिक सुट्टी असली तरी देखील मालमत्ता कराचे धनादेश स्वीकारण्याची सुविधा महापालिका मुख्यालयात सुरू करण्यात आली आहे. या सुविधेचा नागरिकांनी लाभ घ्यावा असे आवाहन उपायुक्त बाबासाहेब राजळे यांनी केले आहे. याचपध्दतीने आठवड्यातील कोणत्याही दिवशी धनादेशने कर भरणा करणाऱ्यांसाठी ड्रॉप बॉक्सची सुविधा महापालिकेच्यावतीने लवकरच सुरू करण्यात येणार आहे.नागरिकांना ऑनलाईन मालमत्ता कर भरण्यासाठी 'PMC TAX APP' मोबाईल ॲप विकसित केले आहे. तसेचwww. panvelmc.org या वेबसाईटवरती जाऊनही आपला मालमत्ता कर नागरिकांना भरता येत आहे. लवकरात लवकर नागरिकांनी आपला मालमत्ता कर भरुन महानगरपालिकेस सहकार्य करण्याचे आवाहन आयुक्त श्री.मंगेश चितळे यांनी केले आहे. याबरोबरच ऑनलाईन कर भरणा केल्यास 2 टक्के सवलत देण्यात येत आहे.

# विक्रमगड विधानसभेची जागा शिवसेनेला मिळावी - शिवसैनिकांची मागणी

**जव्हार, दि. २ : प्रतिनिधी**

आगामी येणाऱ्या निवडणुकीत विक्रमगड विधानसभेसाठी जव्हारच्या उमेदवाराला संधी देण्यात यावी अशी मागणी जव्हारच्या शिवसैनिकांनी केली आहे.जव्हार तालुक्यातून अद्याप कोणत्याही राजकीय पक्षाचा आमदार झाला नसल्याने विधानसभेचे जव्हारला प्रतिनिधित्व करता आलेले नाही म्हणून तोंडावर आलेल्या महाराष्ट्राच्या विधानसभेच्या निवडणुकीत विक्रमगड विधानसभेसाठी स्थानिक जव्हारचा उमेदवार मिळाल्यास शिवसैनिक जोमाने त्या उमेदवाराचा प्रचार करून निवडून आणतील आशी आशा जव्हारचे शिवसैनिक व्यक्त करीत आहेत.अनेक राजकीय पक्षातील नेते मंडळी विक्रमगड विधानसभेसाठी इच्छुक असून महाविकास आघाडी आणि महायुती कडून विक्रमगड विधानसभेची अधिकृत उमेदवारी कुणाला मिळणार आहे हे पाहणे आता औसुक्याचे ठरणार आहे.

विक्रमगड विधानसभेच्या कार्यक्षेत्रातील इच्छुकांनी आपापल्या राजकीय पक्षांकडे विधानसभेच्या उमेदवारीसाठी जोर लावत असून महायुती आणि महविकास आघाडी कडून नक्की कुणाची घोषणा होते हे येत्या थोड्याच दिवसात मतदारांना कळणार आहे. जव्हार शिवसेना विक्रमगड विधानसभेसाठी आग्रही असून येणाऱ्या निवडणुकीत विक्रमगड विधानसभेचा उमेदवार हा शिवसेनेचाच असावा अशी मागणी शिवसैनिकांकडून जोर धरत आहे. जव्हार शिवसेना तालुकाप्रमुख विनायक राऊत अथवा त्यांचे चिरंजीव कल्पेश विनायक राऊत यांच्या नावाच्या उमेदवारीची विक्रमगड मतदार संघात जोरदार चर्चा चालू असून त्यांना उमेदवारी मिळाल्यास ते निवडून येऊन पहिल्यांदाच महाराष्ट्राच्या विधानसभेत विक्रमगड मतदार संघाच्या वतीने स्थानिक जव्हारचा आमदार पाहायला मिळेल अशी आशा जव्हार शिवसैनिकांकडून व्यक्त केली जात आहे.

# ट्रकच्या धडकेत दुचाकीस्वाराचा मृत्यू शेजारील मुलगा जखमी, चालकास अटक

**भिवंडी, दि. २ : प्रतिनिधी**

दुचाकीस्वार तरुण त्याच्या शेजारील ओळखीच्या एका लहान मुलाला घेऊन धामणकर नाका रोडने अंजूर फाट्याकडे जात असताना दुचाकीच्या पाठीमागून भरधाव वेगाने आलेल्या ट्रकने दुचाकीला जोरदार धडक दिली असता झालेल्या अपघातात दुचाकीस्वाराचा जागीच मृत्यू झाला असून दुचाकीवर पाठीमागे बसलेला शेजारील मुलगा किरकोळ जखमी झाल्याची घटना सोमवारी सकाळी घडली आहे.याप्रकरणी ट्रक चालकाच्या विरोधात भोईवाडा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून त्यास अटक करण्यात आली आहे. श्रवनकुमार चंद्रमाणी पाठक (५९) असे अपघातात मयत पावलेल्या दुचाकीस्वाराचे नाव आहे.तर रेहान सय्यद (१५) असे किरकोळ जखमी झालेल्या मुलाचे नाव आहे.तर माजिदअली आशिक खान (४०) असे अटक केलेल्या चालकाचे नाव आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार,सोमवारी ३० सप्टेंबर रोजी सकाळी ८ वाजेच्या सुमारास श्रवनकुमार त्याच्या दुचाकीने त्याच्या शेजारी राहणारा मुलगा रेहान यास घेऊन धामणकर नाका रोडने अंजूर फाट्याकडे जात असताना लिओ स्कुल समोर आला असता माजिदअलीने त्याच्या ताब्यातील अशोक लेलँड कंपनीचा ट्रक क्र.एमएच ४६ बीयु १३६४ हा रस्त्याच्या नियमांकडे दुर्लक्ष करून निष्काळजीपणे चालवुन श्रवनकुमार च्या दुचाकीला पाठीमागून जोरदार धडक दिली.या धडकेत अपघात होऊन श्रवनकुमारचा जागीच मृत्यू झाला आहे.तर रेहान किरकोळ जखमी झाला आहे.पोलिसांनी मृतदेह शवविच्छेदना करिता येथील शासकीय रुग्णालयात पाठवला आहे.या अपघात प्रकरणी मयत श्रवनकुमार याचा मुलगा अनिलच्या फिर्यादीवरून चालक माजिदअलीच्या विरोधात भोईवाडा पोलिस ठाण्यात भान्यास कलम २८१,१२५(अ) (ब),१०६ (१), मो.वा.का कलम १८४ न्वये गुन्हा दाखल करून त्यास अटक केली आहे.पुढील तपास विनोद शेडकर करीत आहेत.

# जिल्ह्यात २,८७१ मंडळात होणार आई जगदंबेचे आगमन

■ महासागर प्रतिनिधी, यवतमाळ, दि. २ :

संपूर्ण राज्यात ओळख असलेल्या यवतमाळ येथील वैभवी नवरात्री उत्सवाला गुरूवारी ३ ऑक्टोंबरला उत्साहपूर्ण वातावरणात सुरूवात होणार आहे. यात विविध सार्वजनिक दुर्गोत्सव मंडळांच्या वतीने सकाळपासून ढोल ताशांच्या गजरात मिरवणुका काढुन आई जगदंबा मातेच्या मूतीर्ची प्राणप्रतिष्ठा करण्यात येणार आहे. मिरवणुकांच्या अनुषंगाने पोलिस प्रशासनाने तगडा बंदोबस्त तयार ठेवला आहे. यंदा उत्सवात जिल्ह्यात २ हजार ८७१ दुर्गोत्सव मंडळ मूर्तीस्थापना करणार आहे.



यवतमाळ येथील पारंपारीक आणि ऐतीहासिक नवरात्री उत्सवाची भव्यता केवळ महाराष्ट्रातच नव्हे, तर संपूर्ण देशात पसरलेली आहे. यवतमाळचा हा वैभवी नवरात्री उत्सव यंदाही भव्य-दिव्य साजरा करण्यात येत आहे. गुरूवारी या उत्सवाला सुरूवात होणार आहे.

दरवर्षीप्रमाणे यंदाही हा उत्सव भव्य करण्यासाठी अनेक सार्वजनिक मंडळांकडुन मोठ-मोठे देखावे उभारण्यात आले आहे. त्यात शहराची ग्रामदेवता असलेल्या आठवडी बाजारातील शितला माता मंदिरात हिंदुस्थानी दुर्गोत्सव मंडळाने नवरात्रीची जय्यत तयारी केली आहे. नवरात्रोत्सवासाठी शहरात दाखल झालेल्या दुगार्मातिच्या लक्षवेधी मूर्ती. शिवराय दुर्गोत्सव मंडळ, बालाजी चौकात असलेले बालाजी मंडल दुर्गोत्सव मंडळ, छोटी गुजरी चौकातील एकता दुर्गोत्सव मंडळ, मोठे वडगाव परिसरातील सार्वजनिक दुर्गोसत्व मंडळ, राणाप्रताप नगर परिसरातील जगदंबा दुर्गोत्सव मंडळ, एकवीरा दुर्गोत्सव मंडळ, विठ्ठलवाडीतील शिवशक्ती दुर्गा उत्सव मंडळ, स्टेट बँक चौकातील दुर्गोत्सव मंडळ, चांदनी चौक, आर्णी मार्गावरील लोकमाण्य दुर्गोर्त्सव मंडळ, संतोषी माता मंडळ, यांच्यासोबतच जयहिंद चौक आणि गांधी चौक या ठिकाणच्या दुर्गोत्सव मंडळांनी भव्य मंडपांची निर्मिती करुन उत्सवाची जय्यत तयारी केली आहे.

### शहरातील प्रमुख उत्सव मंडळांची जय्यत तयारी

चौका-चौकांमध्ये लावणार फिक्स पॉईंट यंदा नवरात्री उत्सवात कुठल्याही प्रकारच्या घटना घडू नये आणि नवरात्री उत्सव शांततेत पार पडावा, यासाठी शहरातील अनेक महत्वाच्या चौकात पोलिसांचे फिक्स पॉईंट लावण्यात येणार आहे. तसेच वर्दळ असलेल्या ठिकाणांवर पोलिसांची साध्या गणवेशात पायी गस्त सुरू राहणार आहे.

शहरातून दहा दिवस जड वाहतूक राहील बंद ३ ते १३ ऑक्टोबरपर्यंत शहरात जड वाहतुकीस प्रवेश बंद करण्यात आला आहे. पांढरकवडा मागार्ने येणारी जड वाहतूक आर्णी, धामणगाव बायपास मागार्ने वळविण्यात आली आहे. आर्णी मागार्ने अमरावतीकडे जाणारी व येणारी वाहतूक भोयर बायपासने वळवली आहे.

# बलात्कार प्रकरणातील आरोपीचा मुंबईला पळून जाण्याचा प्रयत्न

## पोलिसांनी अकोल्यात ठोकल्या बेड्या

■ महासागर प्रतिनिधी, चंद्रपूर, दि. २ :

अल्पवयीन मुलीवर बलात्कार प्रकरणातील आरोपी कोरपना शहर युवक कॉंग्रेस अध्यक्ष अमोल विनायक लोडे (२८) हा अकोला मार्गे मुंबई येथे पळून जात असताना अकोला बस स्थानकावर पोलिसांनी अटक केली आहे. आरोपी विरुद्ध बलात्कार व पोक्सो गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कोरपना येथील खासगी शाळेमध्ये इयत्ता सहावी मध्ये शिक्षण घेत असलेली अल्पवयीन पीडीत मुलगी आरोपीकडे दर रविवारी खासगी शिकवणीसाठी जात होती. त्याचवेळी आरोपीने अल्पवयीन मुलीला फुस लावून तिच्यावर शारिरीक अत्याचार केल्याची माहिती पालकांना दिल्याने पालकांनी कोरपना पोलीस स्टेशनला जावून सदरची माहिती दिल्यानंतर तात्काळ आरोपीवर पोक्सो कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला व लगेच पिडीतेस वैद्यकिय तपासणीकरीता जिल्हा सामान्य रूग्णालय येथे दाखल करण्यात आले. सदरची माहिती स्थानिक गुन्हे शाखेला प्राप्त होताच पोलिस अधीक्षक मुमक्का सुदर्शन, अप्पर पोलीस अधिक्षक रिना जनबंधु यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक महेश कोंडावार यांनी तपासाची चक्रे फिरवून तात्काळ दोन पथके तयार करून आरोपीचे शोधकामी रवाना केले.

आरोपीचा शोध घेत असतांना आरोपी हा अकोला मार्गे मुंबईला पळून जात असल्याची गोपनिय माहिती स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला प्राप्त होताच अकोला येथे एक पथक रवाना होवून मुंबईला पळून जाण्याच्या तयारीत असलेला आरोपी अमोल विनायक लोडे (२८) रा. कोरपना, ता. कोरपना, जिल्हा चंद्रपुर यांस रात्रीदरम्यान अकोला येथील बस स्थानकातून स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने ताब्यात घेतले व पोलीस स्टेशन कोरपना यांच्या ताब्यात देण्यात आले. सदरची कामगिरी पोलीस अधिक्षक, चंद्रपुर, अपर पोलीस अधिक्षक, चंद्रपुरं यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक महेश कोंडावार यांचे नेतृत्वात सपोनि. बलराम झाडोकार, पोउपनि. विनोद भुरले, पोउपनि. मधुकर सामलवार, पोहवा. धनराज करकाडे, नितेश महात्मे, जयंत चुनारकर, दिनेश आराडे, पोशि. मिलींद टेकाम स्थागुशा चंद्रपुर यांनी केली आहे.

# यंदा सप्तशृंगी देवीच्या मूर्तीला मिळतेय अधिक पसंती





■ महासागर प्रतिनिधी, अकोला, दि. २ :

सध्या नवरात्रोत्सवाची जोरदार तयारी सुरू असून ३ ऑक्टोबर रोजी नवरात्रोत्सवाला प्रारंभ होत आहे. मंगळवारी अकोल्यात देवींच्या मूर्तीवर अखेरचा हात मूर्तिकारांनी फिरवला. उत्पादन खर्च वाढल्याने यंदा देवीच्या मूर्तींच्या किमतींमध्ये तब्बल १५ ते २० टक्क्यांनी वाढ झाली असून पाचशे रुपयांपासून ते २१ हजार रुपयांपर्यंत देवीच्या मूर्तींच्या किमती पहायला मिळत आहेत. यात सर्वाधिक पसंती सप्तशृंगी देवीच्या मूतीर्ला मिळत आहे.

नवरात्रोत्सवात घराघरात नवरात्रीच्या दिवसांत लहान मूर्ती बसवल्या जातात. तर अनेक मंडळं देखाव्याबरोबरच देवीच्या विलोभनीय मूर्ती बसवत असतात. यासाठी गेल्या महिनाभरापासून देवीच्या मूर्ती तयार करण्यात येत आहेत. अकोल्यात मंगळवारी कौलखेड, कुंभारवाडामध्ये मूर्तिकारांची देवीच्या मूर्तीवर अखेरचा हात फिरवण्याची लगबग होती. यात सप्तश्रृंगी, दुर्गा, रेणुका, महालक्ष्मी, कालिका देवी, महिषासुरनी अशा विविध मूर्ती तयार करण्यात आल्या आहेत. दुर्गा देवीची सर्वाधिक मागणी असून त्यापाठोपाठ सप्तश्रृंगी देवी मूर्तीस जास्त मागणी असल्याचे विक्रेत्यांकडून सांगण्यात आले. मूर्तीमधून विविध देवीच्या रूपांचे दर्शन यंदा मूर्तिकारांकडून सप्तश्रृंगी, दुर्गा, रेणुका, महालक्ष्मी, कालिका देवी, महिषासुरमर्दिनी अशा विविध मूर्ती तयार करण्यात आल्या आहे. सप्तश्रृंगी देवीच्या मूर्तीस सर्वाधिक मागणी असून त्यापाठोपाठ दुर्गा देवीची मूर्तीस जास्त मागणी असल्याचे विक्रेत्यांकडून सांगण्यात आले.

# पत्नीशी अनैतिक संबंधाच्या संशयावरून युवकाची हत्या

■ महासागर प्रतिनिधी, दारव्हा, दि. २ :

पत्नीशी अनैतिक संबंधाच्या संशयावरून एका युवकाची लोखंडी रॉडने पाच घाव घालून हत्या करण्यात आली. ही घटना दारव्हा तालुक्यातील पाळोदी येथे रविवारी २९ सप्टेंबरला रात्री ९ वाजताच्या सुमारास घडली आहे.

याप्रकरणी मारेकऱ्याला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. रविंद्र किसन भुतकर वय ४२ वर्ष रा. पाळोदी ता. दारव्हा असे मारेकऱ्याचे नाव आहे. तर सुनिल रमेश जोगदंड वय ३२ वर्ष असे मृतक युवकाचे नाव आहे. दारव्हा तालुक्यातील पाळोदी येथील रविंद्र भुतकर याने रविवारी रात्रीच्या सुमारास सुनिल जोगदंड याची डोक्यावर लोखंडी रॉडने चार ते पाच घाव घालुन हत्या केली. हा थरार रात्री दारव्हा तालुक्यातील पाळोदी गावात घडला. गंभीर जखमी अवस्थेत सुनिल जोगदंड याला त्याच्या नातेवाईकांनी उपचारासाठी प्रथम दारव्हा व नंतर यवतमाळ येथे घेऊन गेले. मात्र, यवतमाळ येथे उपचार सुरू असताना त्याचा मृत्यू झाला.

घटनेची माहीती मिळताच सहायक पोलिस अधीक्षक तथा दारव्हा उपविभागीय पोलिस अधिकारी चिलुमुला रजनीकांत, ठाणेदार विलास कुलकर्णी यांनी आपल्या सहकाऱ्यांसह मध्यरात्रीच पाळोदी गावात धाव घेतली. दरम्यान, घटनाक्रम समजावून घेत रात्रीच मारेकरी रविंद्र भुतकर याला ताब्यात घेतले. मृतक सुनिल जोगदंड याचे यवतमाळ येथे शवविच्छेदन झाल्यानंतर पाळोदी गावात अंत्यविधी करण्यात आला. यामुळे सकाळपासूनच पाळोदी गावात देखील चोख बंदोबस्त ठेवला होता.

या घटनेबाबत मृतकाचा भाऊ रवी जोगदंड वय ३९ वर्ष रा. पाळोदी याने दिलेल्या तक्रारीवरून मारेकरी रविंद्र भुतकर याच्यावर खुनासह अनुसुचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

पत्नीशी अनैतिक संबंधाच्या संशयावरून ही हत्या करण्यात आल्याचे पोलिस सूत्रांकडून सांगण्यात येत आहे. सोमवारी पोलिसांनी मारेकरी रविंद्र भभुतकर याला न्यायालयात हजर केले असता, न्यायालयाने दोन दिवसाची पोलिस कोठडी सुनावली आहे. या प्रकरणाचा तपास दारव्हा उपविभागीय पोलिस अधिकारी चिलुमुला रजनीकांत यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

# रुणाची हत्या करून मृतदेह केला गायब

■ महासागर प्रतिनिधी, पुसद, दि. २ :

युवकांच्या गटामध्ये झालेल्या भांडणात एका तरुणाचा गळा चिरुन खून करण्यात आला. इतकेच नव्हे तर मारेकऱ्यांनी त्याचा मृतदेह त्या ठिकाणावरुन गायब केला. रविवारी २९ सप्टेंबर रोजी रात्री उशीरा घडलेल्या या घटनेची गोपनीय माहिती स्थानिक गुन्हे शाखेला मिळाली. त्यावरुन एलसीबीच्या पथकाने या प्रकरणात तातडीने कारवाई करीत गुन्हा उघडकीस आणला. इतकेच नव्हे तर अल्पावधीतच आरोपींना अटक देखील केली.



अविनाश संतोष शिंगारे वय २७ वर्षे रा. धम्मनगर असे मृत तरुणाचे नाव आहे. वसंतनगर पोलीस स्टेशन हद्दीतील श्रीरामपूर धम्म नगर परिसरात रविवार २९ सप्टेंबर रोजी रात्री अंदाजे १० ते ११ वाजेच्या सुमारास युवकांचे भांडण झाले होते. त्या भांडणात अविनाश शिंगारे याचा खून झाल्याची व त्यांचा मृतदेह मारेकऱ्यांनी सोबत नेल्याची माहिती ३० सप्टेंबर रोजी दुपारी १ वाजेच्या सुमारास एलसीबीच्या पथकाला मिळाली. त्यावरुन पथकाने घटनास्थळ गाठले. नंतर तपासाची चक्रे फिरवता अल्पावधीतच दोन आरोपींना अटक करत नंतर दोघांना ताब्यात घेतले.

अखेर चार आरोपी गजाआड घटनेमध्ये आरोपींनी पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने अविनाशचे प्रेत बेवारस स्थितीत टाकून दिले होते. स्थानिक गुन्हे शाखेने अल्पावधीतच तपास करत धम्म नगरमध्ये राहणाऱ्या बाबुराव ग्यानबा खडसे व अनिकेत वसंता खंदारे या दोघांना ताब्यात घेऊन त्याची सखोल तपासणी केली. तेव्हा समाधान बाबुराव खडसे, संदीप रामेश्वर कलम व एक अल्पवयीन तरुणाने अविनाश याचा खून केल्याचे व त्याचा मृतदेह धम्मनगरच्या बाजूलाच असलेल्या कॅनेलमध्ये टाकून दिल्याची कबुली दिली. पकडलेल्या चारही आरोपीला स्थानिक गुन्हे शाखेने गजाआड केले आहे.

## १०८ कर्मचाऱ्यांनी घेतले मतमोजणीचे धडे

■ महासागर प्रतिनिधी, अमरावती, दि. २ :

आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर येथील जिल्हाधिकारी कार्यालयात अधिकारी-कर्मचाऱ्यांची या प्रशिक्षणाची श्रृंखला सुरु झाली असून गेल्या दोन दिवसांत १०८ अधिकारी, कर्मचाऱ्यांनी उमेदवारी अर्ज दाखल करण्यापासून ते मतमोजणीपर्यंतच्या विविध टप्प्यांचे धडे घेतले. जिल्हा नियोजन सभागृहात पार पडलेल्या य दोन दिवसीय प्रशिक्षणानंतर सर्व अधिकारी, कर्मचारी जिल्हा स्तरावरील साधन व्यक्ती बनले असून आता ते तालुकास्तरीय अधिकारी, कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देणार आहेत. जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांच्या निदेर्शानुसार उपजिल्हा निवडणूक अधिकारी शिवाजी शिंदे व याच विभागाचे नायब तहसिलदार प्रवीण देशमुख यांनी या शिबिराचे आयोजन केले. शिबिरात राज्यस्तरीय साधन व्यक्ती म्हणून अकोल्याचे एसडीओ शरद जावळे, अकोटचे एसडीओ मनोज लोणारकर, दयार्पुरचे तहसीलदार रवींद्र कानडजे, बुलडाण्याचे एसडीओ शैलेश काळे आणि अचलपुरचे तहसीलदार डॉ. संजय गरकल यांनी वेगवेगळ्या विषयांची मांडणी केली.

# भाजप कार्यकर्त्यांनी बंद पाकिटात दिली मनातल्या उमेदवारांची तीन नावे

■ महासागर प्रतिनिधी, अकोला, दि. २ :

महाविकास आघाडीशी टक्कर देणारा व मनातला उमेदवार कोण? हेजाणून घेण्यासाठी जिल्ह्यातील चार विधानसभा मतदारसंघातील १०९३ पदाधिकारी व कार्यकर्ते यांच्याकडून प्रत्येकी तिघांची नावे एका बंद लिफाफ्यात घेतली. ज्यांच्या नावावर अधिक पसंती असेल त्यालाच विधानसभेची उमेदवारी मिळेल, असा दावा भाजपकडून केला जात आहे.

विशेष म्हणजे लोकसभा निवडणुकीच्या वेळीही उमेदवारीवरून कार्यकर्त्यांची बंदद्वार मते जाणून घेण्यात आली होती. त्यात अनुप धोत्रे यांच्या नावाला सर्वाधिक पसंती देण्यात आली होती. त्यावेळीवाद झाल्याने यावेळी ही लिफाफा प्रक्रिया राबवण्यात आली आहे. राज्यात भाजपचे १०५ आमदार आहेत. सद्यःस्थितीत या १०५ वधानसभा मतदारसंघाच्या आमदारांना वेगवेगळ्या मतदार संघाचे निरीक्षक नेमण्यात आले आहे. पक्षाच्या स्ट्रॅटेजीनुसार, प्रत्येक कार्यकर्ता व पदाधिकाऱ्यांची पसंती कुणाला आहे. हे जाणून घेण्यासाठी मंगळवारी जिल्ह्यात असलेल्या चार विधानसभा मतदारसंघाचे निरीक्षकांनी पदाधिकारी व कार्यकर्ते यांच्याशी संवाद साधला.

जिल्ह्यातील पाच विधानसभा मतदारसंघापैकी चार मतदारसंघात २०१९ च्या निवडणुकीत भाजपचे आमदार निवडून आले होते. अकोला पूर्व, अकोला पश्चिम, मूर्तिजापूर व अकोट मतदारसंघाचा त्यात समावेश आहे. केवळ बाळापूर मतदारसंघ हा युतीमध्ये शिवसेनेने जिंकला होता. भाजपनेही मंगळवारी बाळापूर विधानसभा मतदारसंघ सोडून उर्वरित चार विधानसभेसाठी पसंती मागितली.

बाळापूरसाठी पसंती न मागितल्याने हा मतदारसंघ पारंपरिकरित्या महायुती शिवसेनेसाठी सोडणार असल्याचे दिसून येते. गेल्याच आठवड्यात शिवसेनेचे निरीक्षक केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी बाळापूरचा आढावा घेतला होता. त्यामुळे तुम्ही चार आम्ही एक अशी भूमिका शिवसेनेची असल्याने बाळापूरची जागा शिवसेनेसाठी निश्चित मानली जाते.

आगामी विधानसभा निवडणुकीत तिकीट मागण्याचा अधिकार सगळ्यांना आहे. केवळ पक्षासाठी, राष्ट्रासाठी व महाराष्ट्रासाठी कार्यरत असणाऱ्या संघटनेचे आपण पदाधिकारी आहोत, या भावनेने कार्यरत असल्याचे प्रतिपादन खासदार अनुप धोत्रे यांनी केले.

कार्यकर्त्यांनी दिलेले बंद लिफाफे उघडल्यानंतर ज्याच्या नावाला अधिक पसंती मिळेल त्यांनाच उमेदवारी देण्याबाबत पक्ष निर्णय घेणार आहे. यात कार्यकर्त्यांनी विद्यमान आमदारांच्याच नावाला पसंती की आणखी दुसऱ्यांच्या नावाला हे येणाऱ्या काळात समजेल.

# दुचाकी-ट्रकचा अपघात, दुचाकीस्वार जागीच ठार

■ महासागर प्रतिनिधी, बाभुळगाव, दि. २ :

बसस्थानकाकडून शहरात येत असलेल्या दुचाकी व शहरातून बसस्थानकाकडे जात असलेल्या ट्रकचा मोठ्या पुलावर भीषण अपघात झाला. ही घटना मंगळवारी १ ऑक्टोबर रोजी दुपारी १२.१५ वाजेच्या सुमारास घडली. यात दुचाकीस्वार हरेश्वर सुरेश गायकवाड वय २६ वर्ष, रा. गवंडी हा जागीच ठार झाला. तर पाठीमागे बसलेला पंकजकुमार वय ३५ वर्ष, रा. लबादा, उत्तरप्रदेश हा गंभीर जखमी झाला. त्याला यवतमाळ येथे हलवले, मात्र उपचारादरम्यान त्याचाही मृत्यू झाला.

मोठ्या पुलावर ११.३० वाजेदरम्यान एका ऑटोरिक्षाचा समोरील टायर फुटून तो अपघातग्रस्त झाला. त्यामध्ये असलेले पाणीपुरी बनविण्याचे पाणी व साहित्य रस्त्यावर पडले. रस्त्यावर घट्टपाणी सांडल्यामुळे घरसण तयार झाली. त्यानंतर १२.१५ वाजेच्या सुमारास गवंडी येथील रहिवासी हरेश्वर सुरेश गायकवाड वय २६ वर्ष हा युवक बाभूळगाव येथे जात होते. बसस्थानकावरून सदर युवकाने पंकज कुमार या एका कंपनीत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यास लिफ्ट दिली.


हरेश्वर गायकवाड याची दुचाकी क्रमांक एमएच-२९-एजी-२९७३ मोठ्या पुलाजवळ आल्याबरोबर तेथे सांडून असलेल्या पाणीपुरीच्या पाण्यावरून घसरली. त्याच वेळी समोरून सिमेंट घेवून येत असलेला ट्रक क्रमांक एमएच-३४-बीझेड-६३५४ या वाहनाच्या मागील चाकात हरेश्वर गायकवाड फरफटल्या गेला. तर पाठीमागील पंकजकुमार रस्त्यावर फेकल्या गेला. हरेश्वरला जबर दुखापत होवून तो जागीच ठार झाला. तर पंकजचा रुग्णालयात प्राण सोडले.

# कीटकजन्य आजारांबाबत नवरात्रोत्सवात जनजागृती

■ महासागर प्रतिनिधी, अकोला, दि. २ :

जनजागृतीपर कार्यक्रम राबवण्याबाबत ३ सप्टेंबरला सुरू होणाऱ्या नवरात्र उत्सव कार्यक्रमात राष्ट्रीय कीटकजन्य आजाराविषयी जनजागृतीपर एकदिवसीय कार्यक्रम ४ ते ११ ऑक्टोबरपर्यंत घेण्यात येणार आहेत.

त्यामध्ये देवी मंडळाच्या ठिकाणी जनजागृती करणे, ग्रामपंचायतीत राष्ट्रीय कीटकजन्य आजाराविषयी आरोग्य शिक्षण देणे, शाळांमध्ये मुलांना डेंग्यू आजाराबद्दल माहिती देणे, गप्पी मासे सोडण्याची धडक मोहीम राबवणे, कापडाचे ऑइल बॉल तयार करून पाणी साचलेल्या ठिकाणी सोडण्याची कार्यवाही करणे, आरोग्य सेविका व आशा स्वयंसेविकांना घेवून महिला सभा आयोजित करून आरोग्य शिक्षण देणे व ग्रामपंचायत स्तरावर गप्पी मासे पैदास केंद्र तयार करणे इत्यादी



कार्यक्रम नवरात्र उत्सवामध्ये जनजागृतीपर घेण्यात येणार आहेत.

हिवताप, डेंग्यू, चिकुनगुन्या इत्यादी कीटकजन्य आजाराविषयी समाजामध्ये जनजागृती निर्माण होऊन त्यांच्या प्रतिरोधक उपाययोजनांच्या अंमलबजावणीत जनतेच्या सक्रिय सहभाग प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे. त्यामध्ये ग्रामीण भागातील वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्य पर्यवेक्षक, आरोग्य निरीक्षक, आरोग्य सेवक, आरोग्य सेविका, आशा स्वयंसेविका यांचा सहभाग घेऊन एकदिवसीय कार्यक्रम नेमून दिल्याप्रमाणे कार्यक्षेत्रात जनजागृतीपर कार्यक्रम राबवण्यात येणार आहेत. नवरात्री उत्सवात जनजागृतीपर कार्यक्रमांतर्गत आठवड्यातून एक दिवस कोरडा दिवस म्हणून पाळण्यात यावा. त्यामध्ये सर्व पाण्याचे साठे व भांडी घासून पुसून कोरडी केली जावी व सर्व पाणी साठे झाकून किंवा कापडाने घट्ट बांधून ठेवण्यात यावेत,असे जिल्हा हिवताप अधिकारी अकोला डॉ. अतुलशंकरवार यांनी आवाहन केले

# महिला सरपंचाने स्वतःला जमिनीत घेतले गाडून

■ महासागर प्रतिनिधी, बुलढाणा, दि. २ :

एरवी शासकीय अधिकारी, कर्मचारी हे ग्रामस्थ किंवा जन सामान्यासोबत साहेबगिरीच्या अविभार्वात वागतात. त्यांचा पाणउतारा करतात, टोचून कडक बोलतात असा सर्वांचा अनुभव आहे. अगदी कुणी अन्यायाविरुद्ध आंदोलन केले तरी तिकडे लवकर ते ढुंकूनही पाहत नाही, असे परिस्थिती सगळीकडे आहे. मात्र, बुलढाणा जिल्ह्याच्या आदिवासी बहुल संग्रामपूर तालुक्यातील एका महिला सरपंचांनी असा काही आंदोनात्मक हिसका दाखविला की साहेब थेट आंदोलनाच्या दारी आले.

आज बुधवारी (२ ऑक्टोबर) हे अनोखे आंदोलन करण्यात आले. आंदोलन सुरू झाल्यावर काही तासांतच साहेब दूरवरच्या आंदोलनस्थळी धावत आले आणि महिला सरपंच आणि गावकऱ्यांची मागणी तत्काळ मार्गी लावली. सुवर्णा गणेश टापरे असे या महिला रणरागिणीचे नाव असून त्या



आदिवासी बहुल आणि विकासापासून वंचित संग्रामपूर तालुक्यातील काथरगाव पिंपरी या ग्रामपंचायतीच्या लोकनियुक्त सरपंच आहेत.

त्यांनी आपले सहकारी उपसरपंच, सदस्य यांच्या समवेत आज, अहिंसक आंदोलनाचे प्रणेते, राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंतीच्या मुहूर्तावर स्वतःसह आपल्या सहकाऱ्यांना जमिनीत अर्धे गाडून घेतले. त्यांचा आणि गावकऱ्यांचा संताप अनावर व्हायला कारणही तसेच आहे.

मागील वर्षी २०२३ मधील सव्वीस, सत्तावीस फेब्रुवारी रोजी झालेल्या अतिवृष्टी व गारपोटीमुळे संग्रामपूर तालुक्यातील शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले. त्यामध्ये काथरगाव पिंपरी येथील सर्वसामान्य, अल्पभूधारक महिला, पुरुष शेतकऱ्यांचाही समावेश होता. या नैसर्गिक तांडवाला दीड वषार्चा कालावधी लोटला, मात्र गावातील बाधित शेतकऱ्यांना त्याची अध्यपाही नुकसान भरपाई मिळालेली नाही. आजवरच्या काळात फक्त फसवी आश्वासनच मिळाली. कवडीची देखील आर्थिक नुकसान भरपाई मिळाली नाही.

यंदाचा खरीप हंगाम देखील पावसाच्या मनमानी आणि लहरीपणामुळे धोक्यात आहे. कपाशी आणि सोयाबीन या मुख्य पिकांच्या उत्पादनात घट येणार हे आत्ताच स्पष्ट झाले आहे. यामुळे गावकरी, शेतकरी हवालदिल झाले आहे. नुकसान भरपाईसाठी वेळोवेळी तहसीलदार आणि अन्य अधिकाऱ्यांना निवेदन, तक्रार अर्ज, स्मरण पत्र देऊनही काहीच फायदा झाला नाही.

यामुळे बाधित शेतकऱ्यांनी सरपंच सुवर्णा गणेश टापरे, उपसरपंच आणि सदस्यांना ,ताई काही तुम्हीच काही हालचाल करा असे साकडे घातले. यामुळे सरपंचांनी रणरागिणीचे रूप धारण केले. त्यांनी गावजवळच एका गड्ड्यात स्वतःला अर्धवट गाडून घेतले. यात काही शेतकरी देखील सहभागी झाले. घोषणा देणाऱ्या ग्राम पंचायत सदस्या, सरपंच,जमा झालेले गावकरी असा या अभिनव भूमिगत आंदोलन होते.

**Change Of Name**

MY OLD NAME WAS **DEEPAK SAHADEORAO BAWANE.** MY NEW NAME IS **DEEPAK SAHADEO BAWNE .**
**ADD:** B-22; SHANKARRAO PADHYE APPTS; SOMALWADA; NAGPUR - 440025

MY OLD NAME WAS **SUREKHA DEEPAK BAWANE.** MY NEW NAME IS **SUREKHA DEEPAK BAWNE.**
**ADD:** B-22; SHANKARRAO PADHYE APPTS; SOMALWADA; NAGPUR - 440025

MY OLD NAME WAS **ASHOK RAMCHARAN BELEY.** MY NEW NAME IS **ASHOK RAMCHARAN BELE.**
**ADD:** 176 DOUBLE STOREY QTR. NO. 9/8 RAGHUJI NAGAR NAGPUR - 441501

MY OLD NAME WAS **ALKA ASHOK BELEY.** MY NEW NAME IS **ALKA ASHOK BELE.**
**ADD:** 176 DOUBLE STOREY QTR. NO. 9/8 RAGHUJI NAGAR NAGPUR - 441501

MY OLD NAME WAS **MOHAMMAD HUSAIN DHANANI.** MY NEW NAME IS **HUSAIN JIKAR BHAI DHANANI.**
**ADD:** PLOT NO.77 HABIB NAGAR TRKA NEAR ROSHAN SCHOOL UPPALWADI NAGPUR 440026

## शारीरिक, आत्मिक शुद्धता व ऋतू परिवर्तनाचा काळ

# घटस्थापना आणि नवरात्र



प्रविण बागडे
नागपूर.
9923620919
pravinbagde@gmail.com

घटस्थापना हा हिंदू धर्मातील एक विधी आहे. आश्विन शुद्ध प्रतिपदा या तिथीला स्वरूप घडा किंवा कलश याच्या ठिकाणी देवीची स्थापना केली जाते आणि याचे नऊ दिवस पूजन केले जाते. ताटात गंगाजलाने भरलेला कलश ठेवून आणि त्यात नाणी, सुपारी आणि कच्चा तांदूळ आणि हळद पावडर पासून तयार केलेले अक्षत भरतात. त्यावर आंब्याची पाच पाने आणि एक नारळ घालतात. शेवटी माँ शैलपुत्री आणि माँ दुर्गा यांची पूजा करतात आणि तेलाचा दिवा, अगरबत्ती, फुले, फळे, मिठाई आणि देशी तुपाचा विशेष भोग लावतात. तसेच आश्विन महिन्यात घटामध्ये देवीची स्थापना करून, नंदादीप प्रज्वलित करून आदिमायेची नऊ दिवस मनोभावे पूजा करणे, म्हणजेच घटस्थापना किंवा नवरात्रोत्सव.

---------------

घटस्थापना दरम्यान लोक कलशात पवित्र पाणी भरतात. त्यानंतर कलशावर शेणाचा लेप केला जातो आणि त्यात बार्लीच्या बिया पेरल्या जातात. नंतर ते वाळूच्या खड्ड्यात ठेवले जाते. कलश हिंदू विधींमध्ये खोल प्रतीकात्मकता धारण करतो, विपुलता, समृद्धी आणि आध्यात्मिक शुद्धतेचे प्रतिनिधित्व करतो.

हे पवित्र गंगा नदीच्या पाण्याने भरलेले आहे, जे जीवन टिकवून ठेवणाऱ्या दैवी उर्जेचे प्रतीक आहे. कलश हे दैवी पात्र म्हणून पूजनीय आहे आणि समारंभांमध्ये तांदळाच्या पलंगावर ठेवले जाते.

नवरात्रीचे उत्सव संपूर्ण महाराष्ट्रात वेगवेगळे असतात आणि विशिष्ट संस्कार क्षेत्रांमध्ये भिन्न असतात, जरी त्यांना समान म्हटले जाते आणि एकाच देवतेला समर्पित केले जाते. सर्वात सामान्य उत्सव नवरात्रीच्या पहिल्या दिवशी घटस्थापनेने सुरू होतो, ज्याचा शाब्दिक अर्थ भांडगे चढवणे असा होतो.

घटस्थापना पूजेचे महत्त्व आणि महत्त्व हे जीवनाच्या सर्व क्षेत्रात देवीचे सामर्थ्य प्राप्त करण्याचा प्रयत्न करते.



या व्यतिरिक्त हा चांगला आणि वाईट यांच्यातील लढाईच्या प्रारंभाचा उत्सव आहे. संपूर्ण सणात कलशाची पूजा केली जाते त्यानंतर दहाव्या दिवशी किंवा विजयादशमीला कलश विसर्जन केले जाते.

महाराष्ट्रात नवरात्रीची ही पोकळी भरून काढण्यासाठी, प्रबोधनकार, बोले आणि इतरांनी नवरात्र हा जनसामान्यांचा उत्सव म्हणून साजरा करण्यास सुरुवात केली, प्रबोधनकारांनी शिवाजी महाराजांनी पूजलेल्या तुळजापूरच्या भवानीला महाराष्ट्राचे प्रमुख दैवत म्हणून धारण केले.

हिंदूंना जातीपातीच्या ओलांडून एकत्र आणण्याची कल्पना होती. त्यांच्या चरित्रात, प्रबोधनकार असा दावा करतात की शिवाजी महाराजांच्या काळात जरी नवरात्र साजरी केली जात असली तरी पुण्यातील ब्राह्मण पेशव्यांच्या काळात गणेशपूजेला प्राधान्य मिळाले. लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांनी नंतर सार्वजनिक उत्सवाच्या माध्यमातून गणेश उपासना परंपरेचे पुनरुज्जीवन केले.

महाराष्ट्रातील यवतमाळ जिल्हा हा नवरात्रोत्सवासाठी प्रसिद्ध आहे. उत्सवादरम्यान शहर दिव्यांनी सजवले जाते आणि अनेक सांस्कृतिक कार्यक्रम होतात.

हिंदू धर्मात देवीची विशेष आराधना वर्षातून दोन वेळा केली जाते. वासंतिक नवरात्रात चैत्र शुद्ध प्रतिपदा ते चैत्र शुद्ध नवमीपर्यंत. शारदीय नवरात्रात आश्विन शुद्ध प्रतिपदा ते आश्विन शुद्ध नवमीपर्यंत देवीची उपासना केली जाते. या नऊ दिवसात देवीच्या विविध रूपांची पूजा व अर्चना केली जाते.

नवरात्र हे साधारणपणे नऊ दिवसांचे असते पण तिथीचा क्षय झाल्याने ती आठ दिवसांची किंवा वृद्धी झाल्यास दहा दिवसांची असू शकते. चंपाषष्ठीची म्हणजे खंडोबाची नवरात्र फक्त सहा दिवसांचे असते. सर्व देवांच्या ठिकाणी असलेल्या शक्तींचे दैवतीकरण होऊन त्या शक्तिरूप मूर्तीला देवी असे नाव मिळाले आणि शाक्त संप्रदायी लोकांनी तिला सर्वश्रेष्ठ देवता, आदिमाया किंवा जगदंबा म्हणून गौरविले. देवीची उग्र व सौम्य अशी दोन रूपे पहायला मिळतात.

उमा, गौरी, पार्वती, जगदंबा, भवानी ही देवीच्या सौम्य रूपांची नावे असून दुर्गा, काली, चंडी, भैरवी, चामुंडा ही देवीची उग्र रूपे आहेत. शैलपुत्री, ब्रह्मचारिणी, चंद्रघंटा, कुष्मांडी, कंदमाता, कात्यायनी, कालरात्री, महागौरी आणि सिद्धिदात्री अशी ही देवीची नऊ रूपे आहेत. मार्कंडेय पुराणातील देवी माहात्म्यात सांगितले आहे शरद ऋतूतील वार्षिक महापूजेत देवीमाहात्म्य भक्तिपूर्वक ऐकल्यास सर्व बंधनांपासून व्यक्ती मुक्त होते आणि धनधान्याने परिपूर्ण होते.

नवरात्र हा ऋतू परिवर्तनाचा काल असतो. यामुळे आपल्या नवीन शक्ती, नवा उत्साह, उमेद निर्माण होत असते. बृहत संहितेनुसार सूर्य तसेच इतर ग्रहांमध्ये होणाऱ्या परिवर्तनाचा प्रभाव मनुष्याच्या आरोग्यावर आणि व्यवहारांवर होत असतो.

सृष्टीतील परिवर्तन हा शक्तीचाच खेळ आहे. ब्रह्मचर्य, संयम, उपासना, यज्ञ केल्याने शरीरात रोगप्रतिकारक शक्ती वाढते. स्मरणशक्ती चांगली होऊन बौद्धिक विकास होतो. म्हणून नवरात्र हा शारीरिक व आत्मिक शुद्धतेचा काळ आहे असे मानले जाते.

गुजरातमध्ये नवरात्री उत्सव उत्साहाने साजरा केला जातो. दांडिया किंवा दांडिया रास हे गुजरातमधील लोकनृत्य आहे. हे समूहनृत्य विशेष करून नवरात्रात नाचले जाते. गुजरातमध्ये कोणत्याही सणाला किंवा शुभप्रसंगी हे नृत्य करण्याची परंपरा आहे.

गरबा हा गुजरातमधील नवरात्री उत्सवातील पारंपरिक नृत्याचा प्रकार आहे. एका रंगीत घड्याला छिद्रे पाडून त्यात दिवा लावला जातो आणि त्याची पूजा केली जाते. या घड्याला गरबो असे म्हणतात. गरबा खेळणे म्हणजे टाळ्यांच्या किंवा बहुधा लाकडी दांड्यांच्या लयबद्ध गजरामध्ये देवीची भक्तिरसपूर्ण गाणी म्हणणे.

गरब्याच्या वेळी गोलाकार फेर धरून केलेले मंडल हे घटाचे प्रतीक असते, यांच्या मध्यभागी छिद्र असलेल्या रंगीबेरंगी मातीच्या घड्यात दिवे लावले जातात आणि त्याभोवती गोलाकार नाचण्याची पद्धत आहे. नवरात्र साधारणपणे देवीचे असते, पण इतर देवांची नवरात्रेही असतात.

तुळजाभवानीचे नवरात्र दहा दिवसांचे असते, तशीच खंडोबाचे, व्यंकटेशाचे, नरसिंहाचे, दत्ताचे अशी इतरही नवरात्रे असतात. यापैकी नरसिंहाचे नवरात्र तीन ते नऊ दिवस, खंडोबाचे पाच किंवा सहा दिवस, बालाजी (व्यंकटेशाचे) दहा दिवस, दत्ताचे नऊ ते दहा दिवस असते.

आश्विन शुक्ल प्रतिपदेपासून सुरू होणाऱ्या नवरात्रीं खेरीज, आश्विन शुक्ल तृतीयेपासून सुरू होणारा सप्तरात्रोत्सव, पंचमीपासून सुरू होणारा पंचरात्रोत्सव आणि सप्तमीपासून सुरू होणारा त्रिरात्रोत्सव ही कमी-अधिक दिवसांची नवरात्रे असतात.

नवरात्री दरम्यान विशिष्ट रंग परिधान करणे शुभ मानले जाते, कारण प्रत्येक दिवसाचा एक वेगळा दुवा आणि महत्त्वपूर्ण आध्यात्मिक अर्थ आहे.

नवरात्रीचा पहिला रंग हा उत्सव सुरू होणाऱ्या आठवड्याच्या दिवसानुसार निवडला जातो आणि उरलेले आठ दिवस पूर्वनिश्चित चक्रानुसार रंगवले जातात. नवरात्रीचे नऊ रंग पिवळे, हिरवे, राखाडी, केशरी, पांढरे, लाल, रॉयल ब्लू, गुलाबी आणि जांभळे आहेत. या रंगांचा उपयोग उत्सवादरम्यान पूजा केल्या जाणाऱ्या प्रत्येक देवींचे चित्रण करण्यासाठी केला जातो.

सोमवारः पांढरा - स्वतःला पांढरी फुले आणि इतर वस्तूंनी वेढून घ्या. मंगळवारः लाल - तुमच्या कम्फर्ट झोनमधून बाहेर पडण्यासाठी आव्हाने स्वीकारा. बुधवारः तुमची प्रलंबित कामे अभ्यासण्यासाठी आणि पूर्ण करण्यासाठी हिरवा दिवस चांगला आहे. गुरुवारः पिवळा - शैक्षणिक उत्कृष्टतेचा पाठपुरावा करण्यासाठी उत्कृष्ट दिवस. घटस्थापना आणि शारदीय नवरात्री तुमच्या आयुष्यात सुख, समृद्धी, शांती घेवून येवो, हीच सदिच्छा व घटस्थापनेच्या मंगलपर्वाच्या हार्दिक शुभेच्छा!

●●●●●●●●●

# भारतीय स्वातंत्र्याचे मूर्तिमंत साक्षीदार

काल दोन दिग्गज महापुरुषांची जयंती साजरी झाली. मोहनदास करमचंद गांधी हे भारताच्या स्वातंत्र्य संग्रामातील प्रमुख नेते आणि तत्त्वज्ञ होते. ते एक वकील, वसाहतविरोधी राष्ट्रवादी नेते आणि राजकीय नैतिकतावादी होते. ब्रिटीश राजवटीपासून भारताच्या स्वातंत्र्याच्या यशस्वी मोहिमेचे नेतृत्व करण्यासाठी महात्मा गांधींनी अहिंसक आंदोलनाचा वापर केला. नंतर जगभरातील अनेक नागरी हक्क आणि स्वातंत्र्य चळवळींना महात्मा गांधींकडून प्रेरणा मिळाली. महात्मा संस्कृत- महान आत्मा, पूज्य असा त्यांचा सन्माननीय उल्लेख प्रथम दक्षिण आफ्रिकेत १९१४मध्ये केला गेला. आता हा शब्द जगभरात त्यांच्यासाठी वापरला जातो. तर भारताचे दुसरे पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री यांना १९६६ मध्ये मरणोत्तर भारतरत्न हा भारताचा सर्वोच्च नागरी पुरस्कार प्रदान करण्यात आला. ते जय जवान आणि जय किसान! ही उद्घोषणा कर्ते दयाळू व लोकांचे लाडके पंतप्रधान होत. मूर्ती छोटी पण कीर्ती मोठी म्हणून सर्वत्र परिचित होते.

-----------------------

### विश्व अहिंसा दिनाचे जनक म. गांधी

गुजरातमधील एका हिंदू कुटुंबात २ ऑक्टोबर १८६९ रोजी जन्मलेल्या आणि वाढलेल्या गांधींनी इनर टेंपल, लंडन येथे वकिलीचे शिक्षण घेतले. जून १८९१ मध्ये, वयाच्या २२ व्या वर्षी त्यांना व्यवसायासाठी बोलावण्यात आले. भारतात दोन अनिश्चित वर्षे राहिल्यानंतर, ते १८९३ मध्ये दक्षिण आफ्रिकेत एका भारतीय व्यापाऱ्याच्या दाव्यासाठी गेले.

ते २१ वर्षे दक्षिण आफ्रिकेत कुटुंबासोबत राहिले आणि इथेच असहकार आणि अहिंसेच्या तत्त्वावर आधारित सत्याग्रहाचा उपयोग गांधींनी प्रथम केला. सन १९१५मध्ये वयाच्या ४५ व्या वर्षी ते भारतात परतले आणि लवकरच अन्यायकारक जमीनकर आणि भेदभावाच्या विरोधात शेतकरी, कामगार आणि शहरी मजुरांना आंदोलन करण्यासाठी संघटित करण्याचे ठरवले.

१९२१मध्ये भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची सूत्रे सांभाळल्यानंतर गरिबी निर्मूलन, आर्थिक स्वावलंबन, स्त्रियांचे समान हक्क, सर्वधर्मसमभाव, अस्पृश्यता निवारण आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे स्वराज्य यासाठी देशभरात चळवळ चालू केली. गांधींनी भारतातील ग्रामीण गरिबांची ओळख म्हणून स्वतः कातलेल्या सुताचे धोतर आणि शाल अशी साधी राहणी स्वीकारली. त्यांनी शाकाहाराचा अवलंब केला आणि अनेकदा आत्मशुद्धीसाठी आणि राजकीय चळवळीसाठी साधन म्हणून दीर्घ उपवास केले.

ते एका स्वयंपूर्ण निवासी समुदायात राहू लागले आणि साधे अन्न खाऊ लागले. गांधी हे आजीवन साम्प्रदायीकातावादाचे विरोधक होते आणि ते मोठ्या प्रमाणात सर्वधर्म आणि पंथ यांच्यापर्यंत पोहोचले. ढासळत जाणाऱ्या खिलाफत चळवळीला त्यांनी आधार दिला आणि ते मुस्लिमांचे नेते बनले. १९३० मध्ये इंग्रजांनी लादलेल्या मिठावरील कराविरोधात त्यांनी हजारो भारतीयांचे ४०० किमी- २५० मैल लांब दांडी यात्रेमध्ये प्रतिनिधित्व केले. १९४२मध्ये त्यांनी इंग्रजांविरुद्ध भारत छोडो आंदोलन चालू केले. या आणि इतर कारणांसाठी त्यांना भारतात आणि दक्षिण आफ्रिकेत अनेकदा तुरुंगवास भोगावा लागला.

धार्मिक बहुलवादावर आधारित स्वतंत्र भारताच्या गांधींच्या दृष्टिकोनाला १९४० च्या दशकाच्या सुरुवातीला मुस्लिम राष्ट्रवादाने आव्हान दिले; ज्याने ब्रिटिश भारतातील मुस्लिमांसाठी स्वतंत्र मातृभूमीची मागणी केली होती. ऑगस्ट १९४७ मध्ये ब्रिटनने स्वातंत्र्य दिले, परंतु ब्रिटीश भारतीय साम्राज्य हे दोन अधिराज्यांमध्ये विभागले गेले, एक हिंदूबहुल भारत आणि मुस्लिमबहुल पाकिस्तान.



कृ. गो. निकोडे गुरूजी.
रामनगर, गडचिरोली.
७७७५०४१०८६.

अनेक विस्थापित हिंदू, मुस्लीम आणि शीख त्यांच्या नवीन भूमीत जात असताना, विशेषतः पंजाब आणि बंगालमध्ये धार्मिक हिंसाचार सुरू झाला. स्वातंत्र्याच्या अधिकृत उत्सवापासून दूर राहून, गांधींनी पीडित भागांना भेट दिली आणि त्रास कमी करण्याचा प्रयत्न केला. त्यानंतरच्या काही महिन्यांत त्यांनी धार्मिक हिंसाचार थांबवण्यासाठी अनेक उपोषणे केली. यातील शेवटचे उपोषण हे १२ जानेवारी १९४८ रोजी दिल्लीत सुरू केले, जेव्हा ते ७८ वर्षांचे होते.

यामागे पाकिस्तानला देय असलेली काही रोख संपत्ती भरण्यासाठी भारतावर दबाव आणण्याचे अप्रत्यक्ष लक्ष्य देखील होते. भारत सरकारने धार्मिक दंगलखोरांप्रमाणेच माघार घेतली असली तरी, पाकिस्तान आणि भारतीय मुस्लिम, विशेषतः दिल्लीत वेढा घातल्या गेलेल्या, त्यांच्या बचावासाठी गांधीजी आग्रही होते, असा विश्वास भारतातील काही हिंदूंमध्ये पसरला. यापैकी एक नथुराम गोडसे हा पश्चिम भारतातील हिंदू राष्ट्रवादी होते. त्यांनी दि.३० जानेवारी १९४८ रोजी दिल्लीत एका आंतरधर्मीय प्रार्थना सभेत छातीत तीन गोळ्या झाडून महात्मा गांधींची हत्या केली.

### भारताचे दुसरे पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री

लाल बहादूर शास्त्री यांचा जन्म २ ऑक्टोबर १९०४ रोजी मुगलसराय, उत्तर प्रदेश, भारत येथे झाला. ते एका विनम्र कुटुंबात वाढले आणि महात्मा गांधींच्या शिकवणींचा त्यांच्यावर खूप प्रभाव पडला.

शास्त्री यांनी भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात सक्रिय सहभाग घेतला आणि त्यांच्या सुरुवातीच्या काळात भारतीय राष्ट्रीय काँग्रेसमध्ये सामील झाले. सन १९४७मध्ये भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर शास्त्री यांनी सरकारमध्ये विविध मंत्रीपदे भूषवली. कृषी आणि सामुदायिक विकास मंत्री म्हणून त्यांनी भारताची कृषी धोरणे तयार करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. १९६४ मध्ये पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांच्या अकाली निधनानंतर लाल बहादूर शास्त्री यांची भारताचे पंतप्रधान म्हणून नियुक्ती करण्यात आली. त्यांनी ९ जून १९६४ रोजी पदभार स्वीकारला आणि अन्नटंचाई आणि प्रादेशिक तणाव यासह त्यांना अनेक आव्हानांना सामोरे जावे लागले.

१९६५च्या भारत-पाक युद्धादरम्यान शास्त्री यांच्या पंतप्रधानपदाच्या कार्यकाळातील निर्णायक क्षणांपैकी एक म्हणजे त्यांचे नेतृत्व. वाढत्या शत्रुत्वाचा सामना करताना, शास्त्रींनी धैर्य आणि दृढनिश्चय दाखवून भारताच्या सीमांचे रक्षण करण्यासाठी महत्त्वपूर्ण निर्णय घेतले. मनोबल वाढवण्यासाठी आणि लष्करी आणि कृषी या दोन्ही क्षेत्रांच्या महत्त्वावर जोर देण्यासाठी त्यांनी जय जवान जय किसान ही प्रसिद्ध घोषणा दिली.

युद्धविराम घोषित झाल्यानंतर शास्त्री जानेवारी १९६६ मध्ये ताश्कंद, उझबेकिस्तान येथे शांतता शिखर परिषदेत सहभागी झाले होते. दोन्ही राष्ट्रांमधील शांतता पुनर्संचयित करण्याच्या उद्देशाने त्यांनी पाकिस्तानचे अध्यक्ष अयुब खान यांच्यासोबत ताश्कंद घोषणापत्रावर स्वाक्षरी केली.

तथापि, ११ जानेवारी १९६६ रोजी ताश्कंदमध्ये शास्त्रींच्या आकस्मिक आणि रहस्यमय मृत्यूने देशाला हादरा बसला. लाल बहादूर शास्त्री यांच्या राष्ट्रासाठी महत्त्वपूर्ण योगदानाबद्दल, त्यांना मरणोत्तर भारतरत्न, भारताचा सर्वोच्च नागरी पुरस्कार प्रदान करण्यात आला. कला, साहित्य, विज्ञान, सार्वजनिक सेवा आणि सामाजिक सेवा यासह विविध क्षेत्रातील अपवादात्मक सेवेसाठी भारतरत्न प्रदान केला जातो.


राष्ट्राच्या कल्याणासाठी शास्त्रींचे निःस्वार्थ समर्पण आणि आव्हानात्मक काळात त्यांचे नेतृत्व यामुळे ते या प्रतिष्ठित सन्मानाचे पात्र ठरले. त्याच दिवशी लाल बहादूर शास्त्री यांना भारतरत्न देऊन गौरविण्यात आले, ज्या दिवशी त्यांचे निधन झाले होते. श्रद्धांजली म्हणून हा पुरस्कार समारंभ मरणोत्तर झाला आणि देशासाठी त्यांनी दिलेल्या अमूल्य योगदानाची गौरवपूर्ण ओळख होती.!! विश्व अहिंसा दिनाच्या सप्ताहभर हार्दिक शुभेच्छा !!

●●●●●●●●●

# नवरात्र व्रताचा इतिहास, महत्त्व आणि शास्त्र

*सर्वमंगल मांगल्ये शिवे सर्वार्थ साधिके ।*
*शरण्ये त्र्यंबके गौरी नारायणि नमोस्तुते ।।*

अर्थ : सर्व मंगलकारकांची मंगलरूप असणारी; स्वतः कल्याणशिवरूप असणारी; धर्म, अर्थ, काम व मोक्ष हे चारही पुरुषार्थ साध्य करून देणारी; शरण जाण्यास योग्य असणारी; त्रिनेत्रयुक्त असणारी, अशा हे नारायणी देवी, तुला मी नमस्कार करतो.



पूर्वार्ध

श्री दुर्गादेवीच्या अतुलनीय गुणवैशिष्ट्यांची ओळख या एका श्लोकावरून होते. जीवनाला परिपूर्ण करणारे जे-जे आहे, त्या त्या सर्वांचे मूर्तीमंत प्रतीक म्हणजे आदिशक्ती श्री दुर्गादेवी. श्री दुर्गादेवीला सर्व जगताची जननी म्हटले आहे. महिषासुराच्या नाशासाठी अवतार घेणाऱ्या श्री दुर्गादेवीचा उत्सव म्हणजे नवरात्र! नवरात्रात घटस्थापना करतात. घटरूपी ब्रह्मांडात अवतीर्ण झालेल्या तेजस्वी अशा आदिशक्तीचे म्हणजेच श्री दुर्गादेवीचे अखंड तेवणाऱ्या नंदादीपाच्या माध्यमातून नऊ दिवस पूजन करणे, म्हणजे नवरात्रोत्सव साजरा करणे.

नवरात्र हे देवीचे व्रत असून महाराष्ट्रासह अनेक ठिकाणी हे व्रत कुलाचार म्हणूनसुद्धा पाळले जाते. या व्रतात नऊ दिवस व्रतस्थ राहून देवीची मनोभावे आराधना केली जाते. आज अनेक राज्यांत याला उत्सवाचे स्वरूपही आले आहे. या उत्सवातील अनुचित प्रकार रोखून त्याचे पावित्र्य राखणे, हेही काळानुसार धर्मपालनच ! नवरात्र व्रतामागील इतिहास, या व्रताचे महत्त्व आणि ते साजरे करण्यामागील शास्त्र या लेखातून जाणून घेऊया.

तिथी : आश्विन शुद्ध प्रतिपदा ते नवमी.

इतिहास : रामाच्या हातून रावणाचा वध व्हावा, या उद्देशाने नारदाने रामाला नवरात्रीचे व्रत करायला सांगितले. नंतर हे व्रत पूर्ण केल्यावर रामाने लंकेवर स्वारी करून शेवटी रावणाला ठार मारले.

महिषासुर नावाच्या असुराशी प्रतिपदा ते नवमी असे नऊ दिवस युद्ध करून देवीने नवमीला रात्री महिषासुराला ठार मारले. तेव्हापासून तिला महिषासुरमर्दिनी म्हणू लागले.

महत्त्व : जगात जेव्हा जेव्हा तामसी, आसुरी आणि क्रूर लोक प्रबळ होऊन सात्त्विक अन् धर्मनिष्ठ सज्जनांना छळतात, तेव्हा देवी धर्मसंस्थापनेकरता पुनःपुन्हा अवतार घेते. त्या देवतेचे हे व्रत आहे. नवरात्र व्रताला पुष्कळ घराण्यांत कुलाचाराचे स्वरूप असते. आश्विन शुद्ध प्रतिपदेस या व्रताचा प्रारंभ होतो.

घरात पवित्र स्थानी एक वेदी सिद्ध करून त्यावर सिंहारूढ अष्टभुजादेवीची आणि नवार्णयंत्राची स्थापना करावी. यंत्राशेजारी घट स्थापून त्याची आणि देवीची यथाविधी पूजा करावी.

नवरात्रमहोत्सवात कुलाचाराप्रमाणे घटस्थापना आणि मालाबंधन करावे. शेतातील मृत्तिका आणून तिचा दोन पेरे (बोटाची) जाड चौकोनी थर करावा आणि त्यात (पाच किंवा) सप्तधान्ये घालावी. जव, गहू, तीळ, मूग, राळे, सावे आणि चणे ही सप्तधान्ये होत.

मृत्तिकेचा किंवा तांब्याचा कलश घेऊन त्यात पाणी, गंध, फुले, दूर्वा, अक्षता, सुपारी, पंचपल्लव, पंचरत्ने किंवा नाणे इत्यादी वस्तू घालाव्यात. सप्तधान्ये आणि कलश (वरुण) स्थापनेचे वैदिक मंत्र येत नसल्यास पुराणोक्त मंत्र म्हणावेत. तेही येत नसल्यास त्या त्या वस्तूचे नाम घेऊन समर्पयामि म्हणून नाममंत्रांचा विनियोग करावा. कलशामध्ये माळ पोहोचेल अशी बांधावी.

नऊ दिवस प्रतिदिन कुमारिकेची पूजा करून तिला भोजन घालावे. सुवासिनी म्हणजे प्रकट शक्ती, तर कुमारिका म्हणजे अप्रकट शक्ती. प्रकट शक्तीचा थोडा अपव्यय होत असल्याने सुवासिनीपेक्षा कुमारिकेत एकूण शक्ती जास्त असते. अखंड दीपप्रज्वलन, त्या देवतेचे माहात्म्यपठन (चंडीपाठ), सप्तशतीपाठ, देवीभागवत, ब्रह्मांडपुराणातील ललितोपाख्यानाचे श्रवण, ललिता-पूजन, सरस्वतीपूजन, उपवास, जागरण इत्यादी कार्यक्रम करून क्षमता आणि सामर्थ्य यांनुसार नवरात्रमहोत्सव साजरा करावा.

---------------

(उर्वरीत भाग उद्याच्या अंकात)

सौ.अंजली पाध्ये
नागपूर. 7709536906.

■ ■ ■ ■

## नसानसामध्ये ताकद भरणारे पदार्थ



व्हिटॅमिन बी ९ ला फॉलिक ॲसिड म्हणतात. हे मज्जातंतूंसाठी आवश्यक असलेले आणखी एक जीवनसत्व आहे. गर्भाच्या मज्जासंस्थेच्या विकासासाठी हे आवश्यक आहे. यामुळे गर्भवती महिलांना ते घेण्याचा सल्ला दिला जातो. हिरव्या पालेभाज्या, सोयाबीन, काळे बीन्स आणि किवी खाऊन हे मिळवू शकता.

शरीरासाठी तिसरा आवश्यक पोषक घटक म्हणजे व्हिटॅमिन ई आहे. व्हिटॅमिन ईच्या कमतरतेमुळे नसा कमकुवत होऊ शकतात. बदाम, अक्रोड, किवी खाऊन तुम्हाला व्हिटॅमिन ई मिळू शकते.

शरीरासाठी महत्वाचे चौथे जीवनसत्त्व म्हणजे इ ६ आहे. केळी, शेंगदाणे, हिरव्या पालेभाज्या इत्यादी व्हिटॅमिन इ ६ चे उत्तम स्रोत आहेत. यामुळे हृदयरोग आणि कर्करोग सारख्या आजाराशी लढण्यासाठी प्रतिकार क्षमता तयार होते. शरीरासाठी इ १ जीवनसत्त्वाचे महत्वही कमी नाही. या पोषक तत्वांचा उपयोग शरीराच्या सर्व नसा मजबूत करण्यासाठी होतो. व्हिटॅमिन बी १ च्या कमतरतेवर मात करण्यासाठी, दाळी आणि हिरव्या पालेभाज्या खाव्या.

नसा मजबूत करण्यासाठी व्हिटॅमिन बी १२ खूप महत्वाचे आहे. त्यांच्या कमतरतेमुळे, मज्जातंतूंचे कार्य कमकुवत होते. हे जीवनसत्व मिळविण्यासाठी अंडी, मांस, मशरूम आणि पालक यांचे सेवन करा.

●●●●

# स्वामी रामानंद तीर्थ



स्वामी रामानंद तीर्थ ऊर्फ व्यंकटेश भगवानराव खेडगीकर यांची आज जयंती. ३ ऑक्टोबर १९०३ रोजी त्यांचा जन्म विजापूर जिल्ह्यातील सिंदगी या ठिकाणी झाला. त्यांचे शिक्षण सोलापूर येथील सरकारी शाळेत झाले.

उस्मानाबाद जिल्ह्यातील हिप्परगा रवा या गावी गुरुकुलात ते कार्यरत होते. १९३० मध्ये स्वामी नारायण तीर्थ यांनी त्यांना दीक्षा दिली व ते स्वामी रामानंद तीर्थ झाले. अंबेजोगाई या ठिकाणी त्यांनी योगेश्वरी नूतन विद्यालयाचे नूतनीकरण केले.

हैदराबाद येथील निजामाचा सेनापती कासीम रझवी याच्या रझाकार या संघटनेने मराठवाड्यातील जनतेवर अत्याचार सुरू केले होते. याचा विरोध करणे आवश्यक झाले होते. यासाठी काम करणाऱ्या महाराष्ट्र परिषदेचे चिटणीस म्हणून स्वामी काम पाहत होते. यासाठीची चळवळ अनेक वर्षे चालली होती. २७ ऑक्टोबर, १९३८ रोजी स्वामी रामानंद सत्याग्रहासाठी कार्यकर्त्यांसह हैदराबाद शहरातील राजमार्गावर आले. त्यांना अटक झाली होती. ते सुमारे चार महिने कारावासात होते. सुटका होताच स्वामीजींनी भूमिगतपणे काम केले.

हैदराबाद संस्थान भारतीय संघराज्यात विलीन करून लोकशाही मान्य करा व संस्थानाचे स्वतंत्र अस्तित्त्व संपवाह्व अशी हाक रामानंद तीर्थ यांनी सरकार आणि जनतेला दिली. याचा परिणाम होऊन लोक या संग्रामात सामील झाले. मुक्तिसंग्रामात आपल्या विचारांचा प्रसार करण्यासाठी त्यांनी व्हिजन हे साप्ताहिक चालवले होते. यामार्फत ते भारतीय स्वातंत्र्याच्या विचारांचा प्रचार करत. माणिकराव पहाडे, शंकरभाई पटेल, बाबासाहेब परांजपे व गोविंदभाई श्रॉफ हे तरुण स्वातंत्र्यसैनिक होते. हैदराबाद मुक्तिसंग्राम चळवळीत स्वामी रामानंद तीर्थ यांचे ते प्रमुख समर्थक होते.

तत्कालीन गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांनी सशस्त्र पोलीस कारवाई करून निजामाला शरण आणले. हैदराबाद संस्थान १७ सप्टेंबर १९४८ रोजी भारतात विलीन झाले. लोकसभेच्या लागोपाठच्या दोन निवडणुकांत गुलबर्गा व औरंगाबाद येथून रामानंद तीर्थ हे निवडून गेले होते. १९७२ साली त्यांचे हैदराबाद येथे निधन झाले.

●●●●●●●●●

# साहित्यातील मिरासदार ; द मा मिरासदार

मराठी साहित्यातील जेष्ठ साहित्यिक द. मा. मिरासदार यांचा काल म्हणजे २ ऑक्टोबर रोजी तिसरा स्मृतीदिन होता. तीन वर्षापूर्वी म्हणजे २ ऑक्टोबर २०२१ रोजी त्यांचे निधन झाले होते. त्यांच्या निधनाने मराठी साहित्यातील मिरासदारी पर्वाचा अंत झाला असेच म्हणावे लागेल.

द. मा. मिरासदार हे मराठीतील प्रख्यात विनोदी लेखक व कथाकथनकार होते. १४ एप्रिल १९२७ रोजी त्यांचा जन्म झाला. द. मा मिरासदार यांचे पूर्ण नाव दत्ताराम मारुती मिरासदार असे होते मात्र ते द. मा या नावानेच प्रसिद्ध झाले. द. मा मिरासदार यांनी १९५२ साली अध्यापन क्षेत्रात प्रवेश केला. पुण्याच्या कॅम्प एज्युकेशन सोसायटीच्या शाळेत ते शिक्षक होते.

त्याआधी काही काळ त्यांनी पत्रकारिताही केली. १९६२ सालापासून त्यांनी कथाकथनास सुरवात केली. द. मा मिरासदार, व्यंकटेश माडगूळकर आणि शंकर पाटील यांनी ६० च्या दशकात संपूर्ण महाराष्ट्रभर कथाकथनाचे प्रयोग केले.

त्यांच्या कथाकथनाने महाराष्ट्राला अक्षरशः भुरळ घातली. द. मा मिरासदार हे विनोदी कथा सादर करायचे. त्या कथांचे लेखनही त्यांनीच केलेले असायचे. द. मा मिरासदार यांच्या भुताचा जन्म, माज्या बापाची पेंड, व्यंकुची शिकवणी, शिवाजीचे हस्ताक्षर, माझी पहिली चोरी, हरवल्या च्या शोध या विनोदी कथा श्रोत्यांनी अक्षरशः डोक्यावर घेतल्या. द. मा. मिरासदार यांची कथा सादर करण्याची शैली खुमारदार होती. आपल्या खुमारदार शैलीत कथा सादर करत त्यांनी महाराष्ट्राला लोटपोट हसवले.



श्याम ठाणेदार
दौंड. जिल्हा पुणे.
९९२२५४६२९५

द. मा. मिरासदार यांनी विपुल प्रमाणात लेखन केले. विनोदी कथा ही त्यांची खासियत होती. द. मा. मिरासदार यांचे २४ कथासंग्रह प्रसिद्ध झाले आहेत. याशिवाय त्यांनी १८ चित्रपटांच्या पटकथाही लिहिल्या आहेत. एक डाव भुताचा या चित्रपटाची कथा- पटकथा लेखन त्यांनी केले आहे इतकेच नाही तर या चित्रपटात त्यांनी अभिनयही केला आहे.

मिरासदार यांच्या विनोदी कथा ग्रामीण जीवनावर आधारित असत. ग्रामीण जीवनातील विसंगतीचे, विक्षिप्तपणाचे, इरसालपणाचे दर्शन त्यांच्या कथांतून घडत. त्यांनी केवळ विनोदीच नाही तर स्पर्श, विरंगुळा, कोणे एके काळी यासारख्या गंभीर कथाही लिहिल्या. त्यांच्या अनेक कथांवर चित्रपट निघाले. काही कथांचा समावेश शालेय अभ्यासक्रमातही करण्यात आला. त्यांना अनेक पुरस्कार मिळाले आहेत. त्यांच्या निधनाने मराठी साहित्य विश्वात जी पोकळी निर्माण झाली आहे ती कधीही भरून न निघणारी अशीच आहे. द. मा. मिरासदार यांच्या निधनाने मराठी साहित्यातील मिरासदारीच संपली असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. मिरासदार यांना विनम्र अभिवादन!

●●●●●●●●●

## अशोकायन

### परतीचा पाऊस

परतीच्या पावसा
बळीच्या मागे
लावू नको घोर
सोयाबीन डागी झाली तर
व्यापाऱ्यांचीच
पिकेल बोर!

वारेमाप मजुरी
द्यावी लागते मजुरांना
बळीच्या पदरात
पडणार नाही एकही आणा!

उठसुठ बळीलाच
धरतो धारेवर
का बरं फिरवतो
पाणी त्यांच्या स्वप्नांवर ?



प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)

# अल्पवयीन विद्यार्थिनीवर अत्याचाराचा केल्याचा आरोप

## पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल

■ महासागर प्रतिनिधी,

चंद्रपूर, दि. २ : कोरपना तालुक्यातील एका खासगी शाळेचे व्यवस्थापन पाहाणाऱ्या कोरपना शहर युवक काँग्रेसचे अध्यक्ष अमोल लोंढे यांच्या विरोधात सहावीच्या विद्यार्थिनीवर बलात्कार केल्या प्रकरणी पोक्सो व बलात्काराचा गुन्हा दाखल करण्यात आल्याने खळबळ उडाली आहे. दरम्यान या घटनेनंतर पोलिस गुन्हा दाखल करण्यास टाळाटाळ करीत होते. त्यामुळे मंगळवारी सायंकाळी पालक व शिक्षकांनी कोरपना पोलिस ठाण्यात जावून संताप व्यक्त केल्याने काही काळ परिस्थिती तणावपूर्ण झाली होती. मुलीने पोलिसांना दिलेल्या तक्रारीनुसार पुण्याच्या एमिनेन्स इंग्लिश स्कूलची शाखा कोरपना येथे आहे. या शाळेचे व्यवस्थापनाचे काम पाहाणारे कोरपना शहर युवक काँग्रेसचे अध्यक्ष अमोल लोंढे यांनी पीडित विद्यार्थिनीला मे महिन्यातील एका रविवारी उन्हाळ्याच्या सुट्टीत वर्गाबाहेर बोलावले. त्यानंतर तिला कार्यालयात नेऊन दोन गोळ्या पाण्यासोबत खायला लावल्या. गोळी खाण्यास विद्यार्थिनीने नकार दिल्यानंतर तिला धमकवण्यात आले. घाबरलेल्या विद्यार्थिनीने गोळ्या खाल्ल्या. त्यानंतर अमोल लोंढे याने जबरदस्तीने बलात्कार केल्याची तक्रार विद्यार्थिनीने केली आहे. घरी कोणाला सांगितल्यास वडिलांना जीवे मारण्याची धमकी दिली होती.

दरम्यान, घाबरलेल्या विद्यार्थ्याने हा प्रकार कोणालाही सांगितला नाही. मात्र तिने हा प्रकार तिच्या मैत्रिणीला सांगितला होता.



दोन दिवसांपूर्वी तिच्या मित्राने पीडितेच्या आईला याबाबत माहिती दिली. हे ऐकून आईच्या पायाखालची जमीनच सरकली. आईने मुलीला विश्वासात घेतले आणि तिला सत्य विचारले, त्यानंतर तिने घाबरून घडलेला प्रकार कथन केला. त्यानंतर आई व मुलीने थेट कोरपना पोलीस ठाणे गाठून आरोपी लोंढे याच्याविरुद्ध तक्रार दाखल केली.

तक्रारीनंतर पोलिसांनी बलात्कार आणि बाललैंगिक अत्याचार कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अमोल लोंढे हा कोरपना शहर युवक काँग्रेसचे नवनियुक्त शहराध्यक्ष असल्याचे सांगण्यात येत आहे. उल्लेखनीय म्हणजे सुमारे वर्षांपूर्वीही राजुराचे आमदार काँग्रेस जिल्हाध्यक्ष सुभाष धोटे यांच्या शाळेत एका अल्पवयीन विद्यार्थिनीवर असाच अत्याचार झाला होता.

**पोलीस म्हणतात चौकशी सुरू**

११ वर्षीय विद्यार्थिनीच्या तक्रारीनंतर आरोपी अमोल लोंढेविरुद्ध बलात्कार आणि पोक्सोच्या कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रकरण मे महिन्यातील आहे.

या प्रकरणाची चौकशी सुरू आहे, असे गडचांदूरचे एसडीपीओ रवींद्र जाधव यांनी सांगितले.

# कीटकजन्य आजारांबाबत नवरात्रोत्सवात जनजागृती

■ महासागर प्रतिनिधी,

अकोला, दि. २ : जनजागृती पर कार्यक्रम राबवण्याबाबत ३सप्टेंबरला सुरू होणाऱ्या नवरात्र उत्सव कार्यक्रमात राष्ट्रीय कीटकजन्य आजाराविषयी जनजागृतीपर एकदिवसीय कार्यक्रम ४ ते ११ ऑक्टोबरपर्यंत घेण्यात येणार आहेत.



त्यामध्ये देवी मंडळाच्या ठिकाणी जनजागृती करणे, ग्रामपंचायतीत राष्ट्रीय कीटकजन्य आजाराविषयी आरोग्य शिक्षण देणे, शाळांमध्ये मुलांना डेंग्यू आजाराबद्दल माहिती देणे, गप्पी मासे सोडण्याची धडक मोहीम राबवणे, कापडाचे ऑइल बॉल तयार करून पाणी साचलेल्या ठिकाणी सोडण्याची कार्यवाही करणे, आरोग्य सेविका व आशा स्वयंसेविकांना घेवून महिला सभा आयोजित करून आरोग्य शिक्षण देणे व ग्रामपंचायत स्तरावर गप्पी मासे पैदास केंद्र तयार करणे इत्यादी कार्यक्रम नवरात्र उत्सवामध्ये जनजागृतीपर घेण्यात येणार आहेत.

हिवताप, डेंग्यू, चिकुनगुन्या इत्यादी कीटकजन्य आजाराविषयी समाजामध्ये जनजागृती निर्माण होऊन त्यांच्या प्रतिरोधक उपाययोजनांच्या अंमलबजावणीत जनतेच्या सक्रिय सहभाग प्राप्त करून घेणे आवश्यक आहे. कार्यक्रमात जास्तीत जास्त लोक सहभाग घेवून जनजागृती करण्यात येणार आहे व त्यामध्ये ग्रामीण भागातील वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्य पर्यवेक्षक, आरोग्य निरीक्षक, आरोग्य सेवक, आरोग्य सेविका, आशा स्वयंसेविका यांचा सहभाग घेऊन एकदिवसीय कार्यक्रम नेमून दिल्याप्रमाणे कार्यक्षेत्रात जनजागृतीपर कार्यक्रम राबवण्यात येणार आहेत.

नवरात्री उत्सवात जनजागृतीपर कार्यक्रमांतर्गत आठवड्यातून एक दिवस कोरडा दिवस म्हणून पाळण्यात यावा. त्यामध्ये सर्व पाण्याचे साठे व भांडी घासून पुसून कोरडी केली जावी व सर्व पाणी साठे झाकून किंवा कापडाने घट्ट बांधून ठेवण्यात यावेत. यामुळे डासांचा प्रादुर्भाव रोखण्यात मदत होईल, असे जिल्हा हिवताप अधिकारी अकोला डॉ. अतुल बी. शंकरवार यांनी नागरिकांना आवाहन केले आहे.

# सोयाबीनची प्रतिक्विंटल आठ हजार दराने खरेदी व्हावी

## श्रमिक शेतकरी संघटनेची आयोगाच्या शिफारशी लागू करण्याची मागणी

■ महासागर प्रतिनिधी,

अकोला, दि. २ : सोयाबीनची खरेदी पारदर्शकपणे करा, सोयाबीनला प्रतिक्विंटल आठ हजार ८०० रुपये बाजार भाव (किमान आधारभूत किंमत) देण्यात यावा, यासह अन्य मागण्यांसाठी महाराष्ट्र श्रमिक शेतकरी संघटनेने जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक दिली. संघटनेने विविध मागण्यांचे निवेदनही सादर केले.

यंदा कधी अवर्षण तर कधी अतिवृष्टीमुळे खरीप पिकांना फटका बसला. जून महिन्यात पहिले दहा दिवस पाऊस झाल्यानंतर दुसऱ्या व तिसऱ्या आठवड्यात उघडीप होती. त्यानंतर जुलै महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यापासून मात्र पावसाला पुन्हा प्रारंभ झाला.

काही दिवसांचा अपवाद वगळल्यास रोज काही ठिकाणी पाऊस पडला होता. त्यानंतर ऑगस्ट व सप्टेंबर महिन्यात आतापर्यंत अनेकदा अतिवृष्टी झाली. १० पेक्षा जास्त मंडळांमध्ये अतिवृष्टीची नोंद करण्यात आली. परिणामी कापूस, सोयाबीन पिकांची हानी झाली होती. दरम्यान आता सोयाबीन खरेदी



प्रकरणी श्रमिक शेतकरी संघटनेने मागणी केली आहे. निवेदन निवासी उपजिल्हाधिकारी विजय पाटील यांना देण्यात आले. यावेळी जिल्हा समन्वयक देवराव पाटील हागे, संजय मालोकार, विजय वाहुरवाघ, नफिस अहमद, आशा चंदन, प्रदीप वखारीया आदी होते. राज्य सरकारने सोयाबीन एमएसपीने म्हणजेच प्रतिक्विंटल चार हजार ८५० रुपये प्रमाणे खरेदी करण्याचे जाहीर केले. हा दर हा शेतकऱ्यांवर अन्याय असून स्वामिनाथन आयोगाच्या शिफारशीनुसार सोयाबीनला ८ हजार ८०० रुपये प्रतिक्विंटल मिळणे आवश्यक आहे. सोयाबीन पिकाचे होणारे एकरी उत्पादन व त्यावर होणारा प्रत्यक्ष उत्पादन खर्च विचारात घेता शेतकऱ्यांना सरकारचा हा एमएसपी दर शेती तोट्याची करण्यास भाग पाडणारा आहे, असेही निवेदनात नमूद केले आहे. खरीप हंगामात अतिवृष्टी झाली. त्यामुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले. जून, जुलै महिन्यात झालेल्या पावसामुळे , सोयाबीन, कापूस, तूर पिकांचे नुकसान झाले. सततच्या पावसामुळे सोयाबीनच्या पिकाला शेंगा न लागल्याचे प्रकार सुद्धा समोर आले. याचा परिणाम शेतमालाच्या उत्पादनावर झाला आहे.

कोट्यवधींचा फटका जून व जुलैमध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे पिकांना फटका बसला असून, नुकसान भरपाईसाठी१२ कोटी ४० लाख६४ हजार रुपये मंजूर करण्यात आले. जिल्ह्यात ऑगस्ट व सप्टेंबर महिन्यात सतत पाऊस झाला. या दोन महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे पिकांची हानी झाली.

मदतीसाठी ७४ कोटी ४४ लाख ३५ हजार४०८ रुपयांची आवश्यकता आहे.

# अमरावती जिल्हाभरातील ५६ प्रकल्पांमध्ये ८८.४५ टक्के पाणी



■ महासागर प्रतिनिधी,

अमरावती, दि. २: जिल्ह्यात झालेल्या संततधार तसेच प्रकल्प क्षेत्रात झालेल्या पावसाने मोठा प्रकल्प, मध्यम आणि लघु अशा प्रकल्पात जलसाठ्यात वाढ झाली असून, यातील काही प्रकल्प ओव्हरफ्लो होऊन वाहत असल्याने प्रशासनाने त्या प्रकल्पाचे दारे खुली केली आहेत. यामध्ये एक मोठा अप्पर वर्धा प्रकल्प तर सहा मध्यम प्रकल्पांचा समावेश आहे. आजघडीला ८८.४५. टक्के जलसाठा आहे. जिल्ह्यात यंदा होत असलेल्या संततधार पावसामुळे प्रकल्पातील पाणीसाठा कमालीचा वाढत आहे. त्यामुळे आगामी काळात पिण्याला तसेच शेतीला पूरक पाणी मिळेल.

जिल्ह्यात पावसाची रिपरिप सुरू होती. काही भागात तीन दिवसापूर्वी पावसाचा जोर कायम होता. त्यामुळे जलपातळीत आणखी वाढ आहे. त्यामुळे नदी नाल्यांसह मोठे प्रकल्प आणि मध्यम प्रकल्पांच्या जल पातळी वाढली आहे. सद्यास्थितीत ५६ प्रकल्पात उपयुक्त जलसाठा८८.४५ . टक्के आहे. जिल्ह्यातील सर्वात मोठा प्रकल्प असलेल्या अप्पर वर्धा धरणाचा पाणीसाठा हा ४४.१८. टक्क्यांवर पोहोचला आहे. मध्यम प्रकल्पात ६४.१३. टक्के पाणीसाठा तर४८ लघु प्रकल्पात . टक्यांवर जलसाठा आहे. यातील अनेक मध्यम आणि लघु प्रकल्प ओव्हरफ्लो झाले आहेत.

सद्यस्थितीत सात प्रकल्पांचे दारे खुली करण्यात आली आहेत. यामध्ये सर्वात मोठा अप्पर वर्धा धरण टक्यांवर भरले आहेत. याचे ५ गेट १० सेंटी मीटरने खुले करण्यात आली आहेत. यामधून क्युमेक विसर्ग होत आहे. तर मध्यम प्रकल्प असलेल्या शहानूरचे २ गेट पाच सेंटीमीटरने खुले करण्यात आले आहेत. त्यातून २.११. क्युमेक विसर्ग होत आहे.

तसेच चंद्रभागा प्रकल्पाचे ३ गेट पाच सेंमी सोडले असून यातून १७.४०. क्यूमेक विसर्ग होत आहे, तर पूर्णाचे २ गेट १० सेंमी खुले केली असून १७.३८. क्युमेक विसर्ग होत आहे. सपनचे २ दारे सेंटी मीटरने उघडी केली असून . क्यूमेकने विसर्ग होत आहे. तर पंढरी प्रकल्पातून १.६४२४. क्युमेकने विसर्ग होत आहे. तर गर्गा मधून ११.४६. क्यू मेकने विसर्ग होत आहे.

# भाजप कार्यकर्त्यांनी बंद पाकिटात दिलीमनातल्या उमेदवारांची'' तीन नावे

■ महासागर प्रतिनिधी,

अकोला, दि. २ : महाविकास आघाडीशी टक्कर देणाराव मनातला उमेदवार कोण? हेजाणून घेण्यासाठी जिल्ह्यातील चार विधानसभा मतदारसंघातील पदाधिकारी व कार्यकर्ते यांच्याकडून प्रत्येकी तिघांची नावे एका बंदलिफाफ्यात घेतली. ज्यांच्या नावावर अधिक पसंती असेल त्यालाच विधानसभेची उमेदवारी मिळेल,असा दावा भाजपकडून केला जातआहे. विशेष म्हणजे लोकसभा निवडणुकीच्या वेळीहीउमेदवारीवरून कार्यकर्त्यांची बंदद्वारमते जाणून घेण्यात आली होती. त्यात अनुप धोत्रे यांच्या नावाला सर्वाधिक पसंती देण्यात आली होती. त्यावेळीवाद झाल्याने यावेळी ही लिफाफाप्रक्रिया राबवण्यात आली आहे.

राज्यात भाजपचे आमदारआहेत. सद्य:स्थितीत या विधानसभा मतदारसंघाच्याआमदारांना वेगवेगळ्या मतदारसंघाचेनिरीक्षक नेमण्यात आले आहे.पक्षाच्या स्ट्रॅटेजीनुसार, प्रत्येककार्यकर्ता व पदाधिकाऱ्यांची पसंतीकुणाला आहे. हे जाणून घेण्यासाठीमंगळवारी जिल्ह्यात असलेल्या चारविधानसभा मतदारसंघाचेनिरीक्षकांनी पदाधिकारी व कार्यकर्तेयांच्याशी संवाद साधला.

जिल्ह्यातील पाच विधानसभा मतदारसंघापैकी



चारमतदारसंघात२०१४ च्या निवडणुकीत भाजपचे आमदारनिवडून आले होते. अकोला पूर्व, अकोला पश्चिम,मूर्तिजापूर व अकोट मतदारसंघाचा त्यात समावेश आहे.केवळ बाळापूर मतदारसंघ हा युतीमध्ये शिवसेनेनेजिंकला होता. भाजपनेही मंगळवारी बाळापूर विधानसभामतदारसंघ सोडून उर्वरित चार विधानसभेसाठी पसंतीमागितली. बाळापूरसाठी पसंती न मागितल्याने हामतदारसंघ पारंपरिकरित्या महायुती शिवसेनेसाठीसोडणार असल्याचे दिसून येते. गेल्याच आठवड्यातशिवसेनेचे निरीक्षक केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधवयांनी बाळापूरचा आढावा घेतला होता. त्यामुळे तुम्ही चारआम्ही एक अशी भूमिका शिवसेनेची असल्यानेबाळापूरची जागा शिवसेनेसाठी निश्चित मानली जाते.

**तिकिट मागण्याचा अधिकार सर्वांनाच**

आगामी विधानसभा निवडणुकीत तिकीट मागण्याचाअधिकार सगळ्यांना आहे.

केवळ पक्षासाठी, राष्ट्रासाठीव महाराष्ट्रासाठी कार्यरत असणाऱ्या संघटनेचे आपणपदाधिकारी आहोत, या भावनेने कार्यरत असल्याचेप्रतिपादन खासदार अनुप धोत्रे यांनी केले.

ज्याच्या नावाला अधिक पसंती तोच उमेदवार

कार्यकर्त्यांनी दिलेले बंद लिफाफे उघडल्यानंतर ज्याच्यानावाला अधिक पसंती मिळेल त्यांनाच उमेदवारीदेण्याबाबत पक्ष निर्णय घेणार आहे. यात कार्यकर्त्यांनीविद्यमान आमदारांच्याच नावाला पसंती की आणखीदुसऱ्यांच्या नावाला हे येणाऱ्या काळात समजेल.

# वीज कंपनीच्या व्हिडिओ कॉन्फरन्समध्येच सहाय्यक अभियंत्याचा मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी,

हिंगोली , दि. २ : नांदेड विभागाच्या विज कंपनीच्या थकीत देयकाच्या वसुलीसह इतर सुचनांसाठी मंगळवारी व्हिडीओ कॉन्फरन्सींगद्वारे आयोजित बैठकीत हिंगोलीच्या सहाय्यक अभियंत्याचा हृदयविकाराने मृत्यू झाल्याची घटना दुपारी एक ते दिड वाजण्याच्या सुमारास घडली आहे. त्यांचा मृतदेह हिंगोलीच्या शासकिय रुग्णालयात हलविण्यात आला आहे.

विज कंपनीच्या नांदेड विभागांतर्गथ नांदेड, हिंगोली व परभणी जिल्ह्याचा समावेश आहे. नांदेड येथील मुख्य अभियंता कार्यालयाकडून व्हिडीओ कॉन्फरन्सींगद्वारे बैठका घेऊन आवश्यक त्या सुचना तीनही जिल्ह्यातील विज कंपनीच्या अभियंत्यांना दिल्या जातात.

दरम्यान, आज दुपारी साडेबारा वाजता मुख्य अभियंता कार्यालय नांदेड यांच्याकडून व्हिडीओ कॉन्फरन्सींगद्वारे बैठकीचे आयोजन केले होते. याबैठकीस तीनही जिल्ह्यातील अभियंत्यांना उपस्थित राहण्याच्या सुचना दिल्या होत्या. त्यानुसार दुपारी साडेबारा वाजता बैठक सुरु झाली. या बैठकीत हिंगोलीच्या विज कंपनीच्या कार्यालयातील सर्व अभियंता



सहभागी झाले होते. बैठकीमध्ये थकीत विज देयक वसुली सोबतच इतर सुचना दिल्या जात असतानाच हिंगोली कार्यालयातील सहाय्यक अभियंता सचिन दत्तात्रय कोळपे () हे खुर्चीवरून खाली पडले.

या बैठकीत उपस्थित इतर अधिकाऱ्यांनी तातडीने त्यांच्याकडे धाव घेतली. त्यांच्या तोंडातून फेस येत असल्याने त्यांना तातडीने हिंगोली येथे खाजगी रुग्णालयात उपचारासाठी नेण्यात आले. मात्र उपचारापुर्वीच त्यांचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी जाहिर केले. त्यानंतर मयत अभियंता सचिन कोळपे यांचा मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी हिंगोलीच्या शासकिय रुग्णालयात दाखल केला आहे. या घटनेमुळे हिंगोली विज कंपनीच्या कार्यालयावर शोककळा पसरली आहे. दरम्यान, मयत सचिन यांच्या पश्चात पत्नी व एक मुलगी असा परिवार असून ते मुळचे नांदेड येथील रहिवासी असल्याचे विज कंपनीच्या सुत्रांनी सांगितले.

# राष्ट्रीय पोषण अभियानात हिंगोली जिल्हा राज्यात पहिला

■ महासागर प्रतिनिधी,

हिंगोली , दि. २ : राज्यात राष्ट्रीय पोषण अभियानांतर्गत हिंगोली जिल्हयाने ११९७ अंगणवाड्यांमधून नाविन्यपूर्ण उपक्रम राबवून तब्बल १८ लाख नोंदी घेत राज्यात प्रथम क्रमांक मिळविला आहे. भंडारा जिल्हा दुसऱ्या तर अमरावती जिल्हा तिसऱ्या क्रमांकावर आला आहे.




राज्यात महिला बाल कल्याण विभागाच्या वतीने अंगणवाड्यांमधून सप्टेंबर महिन्यात पोषण माह राबविण्यात आला. यामध्ये १ लाख अंगणवाड्यांमधून विविध उपक्रम राबवून त्याच्या नोंदी घेण्याच्या सुचना आयुक्त कार्यालयाने दिल्या होत्या. या उपक्रमात अंगणवाडीतील बालकांच्या आरोग्य सोबतच गरोदर व स्तनदामातांसाठी मार्गदर्शन उपक्रमांचा समावेश होता.

दरम्यान, हिंगोली जिल्हयात जिल्हाधिकारी अभिनव गोयल, जिल्हा परिषदेच्या मुख्यकार्यकारी अधिकारी नेहा भोसले, अतिरिक्त मुख्यकार्यकारी अधिकारी अनुप शेंगुलवार यांच्या मार्गदर्शनाखाली उपमुख्यकार्यकारी अधिकारी गणेश वाघ तसेच बालविकास प्रकल्प अधिकाऱ्यांनी यांनी सहा प्रकल्पांमधील अंगणवाड्यांमधून उपक्रम राबविण्यास सुरवात केली आहे.

महिला बाल कल्याण विभागाच्या आयुक्त कार्यालयाने ठरवून दिलेल्या उपक्रमांसोबतच इतर नाविन्यपूर्ण उपक्रम राबविले आहेत. या उपक्रमांची माहिती व छायाचित्र देखील ऑनलाईन अपलोड केले जात आहे. हिंगोली जिल्हयातील ११९७ अंगणवाड्यामधून १८ लाख ऑनलाईन नोंदी घेण्यात आल्या आहेत. राज्यात सर्वात जास्त उपक्रम व नोंदी घेत हिंगोली जिल्ह्याने राज्यात पहिला क्रमांक मिळविला आहे. तर भंडारा जिल्ह्यातील १४९७ अंगणवाड्यांतून ९.७५ लाख नोंदी घेण्यात आल्या असून या जिल्हयाने दुसरा तर अमरावती जिल्हयातील ३१८९ अंगणवाड्यांतून २० लाख नोंदी घेतल्या गेल्या असून त्यांची दररोजच्या नोंदीची सरासरी कमी आल्यामुळे त्यांना तिसऱ्या क्रमांकावर समाधान मानावे लागले आहे.

# यंदा सप्तशृंगी देवीच्या मूर्तीला मिळतेय अधिक पसंती





## मूर्तींच्या किमती १५ ते २० टक्क्यांनी वाढल्या

■ महासागर प्रतिनिधी,

अकोला, दि. २ : सध्या नवरात्रोत्सवाची जोरदार तयारी सुरू असून३ ३ ऑक्टोबर रोजी नवरात्रोत्सवाला प्रारंभ होत आहे. मंगळवारी अकोल्यात देवींच्या मूर्तीवर अखेरचा हात मूर्तिकारांनी फिरवला. उत्पादन खर्च वाढल्याने यंदा देवीच्या मूर्तींच्या किमतींमध्ये तब्बल १५ ते २० टक्क्यांनी वाढ झाली असून पाचशे रुपयांपासून ते २१ हजार रुपयांपर्यंत देवीच्या मूर्तींच्या किमती पहायला मिळत आहेत. यात सर्वाधिक पसंती सप्तशृंगी देवीच्या मूर्तीला मिळत आहे.

नवरात्रोत्सवात घराघरात नवरात्रीच्या दिवसांत लहान मूर्ती बसवल्या जातात. तर अनेक मंडळं देखाव्याबरोबरच देवीच्या विलोभनीय मूर्ती बसवत असतात. यासाठी गेल्या महिनाभरापासून देवीच्या मूर्ती तयार करण्यात येत आहेत. अकोल्यात मंगळवारी कौलखेड, कुंभारवाडामध्ये मूर्तिकारांची देवीच्या मूर्तीवर अखेरचा हात फिरवण्याची लगबग होती. यात सप्तशृंगी, दुर्गा, रेणुका, महालक्ष्मी, कालिका देवी, महिषासुरनी अशा विविध मूर्ती तयार करण्यात आल्या आहेत. दुर्गा देवीची सर्वाधिक मागणी असून त्यापाठोपाठ सप्तशृंगी देवी मूर्तीस जास्त मागणी असल्याचे विक्रेत्यांकडून सांगण्यात आले.

मूर्तींमधून विविध देवीच्या रूपांचे दर्शन यंदा मूर्तिकारांकडून सप्तशृंगी, दुर्गा, रेणुका, महालक्ष्मी, कालिका देवी, महिषासुरमर्दिनी अशा विविध मूर्ती तयार करण्यात आल्या आहे. सप्तशृंगी देवीच्या मूर्तीस सर्वाधिक मागणी असून त्यापाठोपाठ दुर्गा देवीची मूर्तीस जास्त मागणी असल्याचे विक्रेत्यांकडून सांगण्यात आले.


## कार्यालय नगरपंचायत हिंगणा

ता. हिंगणा, जि. नागपुर

Email: nphingna@gmail.com

क्रमांक/नपंहि जा.क्र.-८२६३/२०२४ — दिनांक ०१/१०/२०२४

**निविदा सूचना**

मुख्याधिकारी नगरपंचायत हिंगणा हे खालील कामाकरीता योग्य त्यावर्गात पंजीबद्ध/अधिकृत निविदाधारकां कडुन निविदा मागवित आहे. निविदा मुख्याधिकारी यांचे कार्यालयात दिनांक ०३/१०/२०२४ ते ०९/१०/२०२४ रोजी दुपारी ३:०० वाजेपर्यंत पोहोचतील अशा बेताने सादर करावयात. प्राप्त निविदा शक्य झाल्यास दिनांक १०/१०/२०२४ सकाळी ११:०० वाजता उपस्थित निविदाकारा समक्ष उघडण्यात येतील. कामासंबंधी अधिक माहिती व कोरे निविदा प्रपत्र लेखा विभाग नगरपंचायत यांचे कार्यालयात निविदा प्रसिद्धी पासुन दिनांक ०३/१०/२०२४ ते दिनांक ०९/१०/२०२४ पर्यंत कार्यालयीन कामाकाजाचे वेळेत निर्धारीत मुल्य भरून प्राप्त करता येतील.

| अ.क्र. | कामाचा तपशिल | अनामत रक्कम | निविदा प्रपत्र किंमत | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|
| १ | नगरपंचायत हिंगणा येथील सन २०२४-२०२५ ते २०२५-२६ करिता आयकर, व्यवसायकर, जि.एस.टी व इतर शासकीय कपाती या कामाकरीता अनुभवी सनदी लेखापाल यांचेकडुन निविदा मागविण्यात येत आहे. | ३००० | ५०० | आदेशानुसार |

अटी व शर्ती

१) निविदा मंजुर झाल्यानंतर रु. ५००/- चे स्टॅप पेपरवर करारनामा करून द्यावा लागेल.
२) कंत्राटदाराने सादर करावयाचे सर्व कागदपत्रे अटी व शर्ती मध्ये नमुद आहेत.
३) नियमानुसार आयकर / जि.एस.टी कपात तसेच इतर कपात करण्यात येईल.
४) जि.एस.टी कराच्या बोझाचा विचार करूनच निविदा सादर करणे आवश्यक राहील.
नियमानुसार जि.एस.टी अंतर्भुत करूनच दर सादर करावा. सदर कामाच्या सर्व अटी व शर्ती नगरपंचायत कार्यालय हिंगणा येथे कार्यालयीन वेळेत पाहण्यास मिळतील

- स्वा- अध्यक्षा नगरपंचायत हिंगणा
- स्वा- मुख्याधिकारी नगरपंचायत हिंगणा


RNINo-20789/71 महासागर नागपूर मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस,कॉटन मार्केट,नागपूर१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय,टेकडी रोड,सिताबर्डी,नागपूर येथे प्रकाशित केले. संपादकश्रीकृष्ण तनसुखदास चांडक मुख्य कार्यालय फोन७४४७७३५८५१/९९२२९७००२३/७४४७७३५८५३

# बॉक्स ऑफिसवर धमाका



**ज्युनिअर एनटीआरच्या देवराने जबरदस्त ॲडव्हान्स बुकिंग मिळवत आपण आल्याची वर्दी दिली आहे. देवरा हा यंदाच्या वर्षातला सर्वाधिक ॲडव्हान्स बुकिंग मिळवणारा दुसऱ्या क्रमांकाचा चित्रपट ठरला आहे. तिकडे स्त्री २ ने ६०० कोटी क्लबमध्ये प्रवेश केला असून अशी कामगिरी करणारा तो पहिलाच हिंदी चित्रपट ठरला आहे. दुसरीकडे मराठी बॉक्स ऑफिसवरही उत्साहाचं वातावरण असून नवरा माझा नवसाचा २ चांगली कामगिरी करतो आहे.**

बॉक्स ऑफिसवर सध्या चर्चा आहे ती 'देवरा' या चित्रपटाची. ज्युनिअर एनटीआर, सैफ अली खान आणि जान्हवी कपूर यांच्या प्रमुख भूमिका असणाऱ्या या चित्रपटाबद्दल देशभरात प्रचंड उत्सुकता आहे. देवरा हा अर्थातच 'पॅन इंडिया' चित्रपट असून ज्युनिअर एनटीआर आरआरआरनंतर तब्बल अडीच वर्षांनी रुपेरी पडद्यावर झळकत असल्यामुळे त्याचे चाहते या चित्रपटाच्या प्रतीक्षेत आहेत. त्यातच तो चित्रपटात दुहेरी भूमिका करतो आहे. देवरा दोन भागांमध्ये प्रदर्शित होणार असून ॲक्शनपटांच्या फ्रँचायजींची भारतात चलती असल्यामुळे 'देवरा'च्या दोन्ही भागांना चांगला प्रतिसाद मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त होते आहे.

'देवरा'ने ॲडव्हान्स बुकिंगमध्ये कमाल केली असून पहिल्या दिवसाच्या ॲडव्हान्स बुकिंगमधून चित्रपटाने ४९.९० कोटी रुपयांचा गल्ला जमवला आहे. पहिल्या दिवशी देशभरातल्या तब्बल १७,००० खेळांची १८.४५ लाखांहून अधिक तिकिटे विकली गेली आहेत. त्यामुळे 'देवरा' हा सर्वाधिक ॲडव्हान्स बुकिंग मिळवणारा या वर्षातला दुसरा चित्रपट ठरला आहे. याआधी 'कल्की २८९८ एडी'ने ५५.३० कोटी रुपयांचं ॲडव्हान्स बुकिंग मिळवलं होतं. 'देवरा'ला हा आकडा मागे टाकला आला नाही. जबरदस्त ॲडव्हान्स बुकिंग, ज्युनिअर एनटीआरची क्रेझ आणि ज्युनिअर एनटीआर-जान्हवी कपूरची नवी कोरी जोडी पाहण्याची उत्सुकता यामुळे 'देवरा' बॉक्स ऑफिस दणाणून सोडेल अशी अपेक्षा आहे. त्यामुळे आता हा चित्रपट कोणते नवे विक्रम



करणार, हे पाहणं उत्सुकतेचं ठरणार आहे. तिकडे 'स्त्री २' ने ६०० कोटी रुपयांचा टप्पा ओलांडला असून ६०० कोटी क्लबमध्ये समाविष्ट होणारा 'स्त्री २' हा पहिलाच बॉलिवूडपट ठरला आहे.

चित्रपटाने आत्तापर्यंत जवळपास ६०९ कोटी रुपये कमावले आहेत. प्रदर्शित झाल्यापासूनच 'स्त्री २' ने बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घातला असून अनेक विक्रम मोडले आहेत. अजूनही हा चित्रपट दिवसाला एक कोटी रुपयांहून अधिक कमाई करतो आहे. मधल्या काळात 'स्त्री २' ला कोणतीही स्पर्धा नव्हती. मात्र आता 'देवरा'मुळे 'स्त्री २' ला आवरतं घ्यावं लागणार असल्याचं चित्र आहे. असं असलं तरी 'स्त्री २' हा यंदाच्या वर्षीचा ब्लॉकबस्टर चित्रपट ठरला आहे हे निश्चित!



मराठी बॉक्स ऑफिसवरही सध्या उत्साहाचं वातावरण आहे. बहुप्रतिक्षित 'नवरा माझा नवसाचा २' ने चांगला व्यवसाय केला आहे. पहिल्या भागाच्या सुपरहिट यशानंतर प्रेक्षकांना दुसऱ्या भागाची प्रचंड उत्सुकता होती. सचिन आणि सुप्रिया पिळगावकर या जोडीसह अशोक सराफ, स्वप्निल जोशी, सिद्धार्थ जाधव, वैभव मांगले अशी कलाकारांची तगडी फौज असल्यामुळे 'नवरा माझा नवसाचा २' मध्ये अभिनयाची जादू पहायला मिळणार, याची प्रेक्षकांना खात्री होती. म्हणूनच प्रेक्षकांनी चित्रपटगृहांमध्ये गर्दी केल्याचं चित्र पहायला मिळालं. यामुळे 'नवरा माझा नवसाचा २' ने अवघ्या पाच दिवसात १०.३६ कोटी रुपयांचा गल्ला जमवला. आठ कोटी रुपये बजेट असणारा हा चित्रपट फक्त तीन दिवसात मुद्दल वसूल करून नफ्यात आला. यंदाच्या वर्षात मराठी चित्रपटांनी चांगली कामगिरी केली आहे. 'नाच गं घुमा'ने २३.५५ कोटी रुपये कमावले तर 'जुने फर्निचर'ने १२.४५ कोटी रुपये गल्ला जमवला. 'नवरा माझा नवसा'चा तिसऱ्या क्रमांकावर असून तो 'जुने फर्निचर'ला मागे टाकून पुढे जाईल. आता हा चित्रपट 'नाच गं घुमा'चा विक्रम मोडणार का हे पाहणं उत्सुकेचं ठरणार आहे.

# ग्लॅम वर्ल्ड

## तृप्तीच्या मनातलं...



'ॲनिमल'मधल्या झोयाच्या भूमिकेनंतर तृप्ती डिमरीला प्रचंड लोकप्रियता मिळाली. 'ॲनिमल'नंतर तिला चांगले चित्रपट मिळू लागले. 'लैला मजनू', 'बुलबुल'सारखे चित्रपट करूनही तिची फारशी चर्चा झाली नव्हती. मात्र 'ॲनिमल'नंतर परिस्थिती बदलली. 'ॲनिमल'मधली भूमिका आणि त्यानंतरचा प्रवास याबद्दल तृप्तीने मनोगत व्यक्त केलं आहे.

तृप्ती डिमरीने 'ॲनिमल' चित्रपटाआधी 'कला', 'बुलबुल', 'लैला' 'मजनू'सारख्या चित्रपटांमध्ये काम केलं होतं. मात्र तिला म्हणावी तितकी प्रसिद्धी मिळाली नव्हती. मात्र 'ॲनिमल'मधली झोयाची छोटेखानी भूमिका तिला फळली. तृप्ती लोकप्रियतेच्या शिखरावर पोहोचली. झोयाची भूमिका स्वीकारण्यामागच्या कारणांचा खुलासा तिने केला आहे. आपल्याला 'कंफर्ट झोन'मध्ये रहायला आवडत नसल्याचं तिने म्हटलं आहे. कंफर्ट झोनच्या बाहेर पडून काहीतरी वेगळं करण्याची इच्छा होती. त्यामुळे झोयाची भूमिका मला खूपच आव्हानात्मक वाटली आणि मी ती स्वीकारली, असं तृप्ती सांगते. तृप्ती पुढे म्हणते, एक कलाकार म्हणून तुम्ही स्वत:वर बंधनं घालून घेऊ शकत नाही. दुसऱ्या शब्दात सांगायचं तर एकाच प्रकारच्या भूमिकांमध्ये अडकू शकत नाही. तुमची प्रत्येक भूमिका आव्हानात्मक आणि वेगळी असायला हवी. त्यामुळे मला मिळालेली प्रत्येक भूमिका ही आव्हानात्मकच आहे, असंच मला प्रत्येक वेळी वाटतं. ॲनिमलनंतर तृप्तीला चांगल्या भूमिका मिळू लागल्या आहेत. मध्यंतरी ती विकी कौशलसोबत 'बॅड न्यूज'मध्ये दिसली. 'विकी विद्या का वो वाला व्हिडिओ'मध्ये ती राजकुमार रावसोबत दिसेल. तसंच 'भुलभुलैय्या ३' मध्ये ती कार्तिक आर्यनसोबत काम करते आहे. 'धडक २' साठीही तिची निवड झाली असून यात सिद्धांत चतुर्वेदी तिचा नायक असेल. त्यामुळे तृप्ती येत्या काळात अनेकविध भूमिकांमधून रुपेरी पडद्यावर झळकणार आहे.

## भावाचं कौतुक



आलिया भट्टच्या 'जिगरा'ची सध्या बरीच चर्चा आहे. आलिया भट्ट आणि वेदांग रैना यांच्या यात प्रमुख भूमिका आहेत. या चित्रपटाला भावाबहिणींच्या प्रेमाची पार्श्वभूमी आहे. वेदांगने 'द आर्ची'मध्येही काम केलं होतं. वेदांगसोबत काम केल्यानंतर आलिया त्याचं खूप कौतुक करते आहे. वेदांग उत्तम अभिनेता असून त्याचं भविष्य उज्ज्वल असल्याचं तिने म्हटलं आहे. वेदांग खूपच मेहनती असल्याचंही आलियाने सांगितलं. त्यामुळे आलिया आता आपल्या ऑनस्क्रीन भावाच्या अभिनयाने प्रभावित झाली आहे असं म्हणायला हरकत नाही.



## धूम ४ मध्ये रणबीर?



'धूम' ही बॉलिवूडमधली लोकप्रिय फ्रँचायजी आहे. बॉलिवूडच्या सर्वात हिट फिल्म फ्रँचायझींपैकी एक असलेल्या धूमने अनेक सिनेमांचे रेकॉर्ड मोडले होते. या चित्रपटाचा पहिला भाग २००४ मध्ये रिलीज झाला होता. 'धूम ३' नंतर प्रेक्षकांना आता धूम ४ ची प्रतीक्षा आहे. जॉन अब्राहम, हृतिक रोशन आणि आमीर खानला धूममध्ये पाहिल्यानंतर आता चौथ्या भागात कोण दिसणार याबाबत उत्सुकता आहे. सध्या सुरू असणाऱ्या चर्चांनुसार रणबीर कपूर 'धूम ४' मध्ये दिसू शकतो. मात्र अभिषेक बच्चन आणि उदय चोप्रा यांचा पत्ता कट होण्याची शक्यता आहे. पोलीस आणि त्याच्या सहकाऱ्याच्या भूमिकेत नव्या पिढीतले कलाकार दिसू शकतात, असंही सूत्रांचं म्हणणं आहे.

## समाधानी राधिका

'मेरी आशिकी तुमसे ही' या मालिकेतून घराघरात पोहोचलेली राधिका मदान बॉलिवूडमध्ये कधी स्थिरस्थावर झाली हे कळलंदेखील नाही. 'पटाखा', 'मर्द को दर्द नही होता', 'अंग्रेजी मीडियम'सारख्या चित्रपटांमध्ये ती दिसली. राधिका आपल्या प्रवासाबद्दल समाधानी आहे. ती दररोज रात्री डायरी लिहिते आणि आपल्याकडे जे आहे त्याबाबत आभार मानते. खुद्द राधिकानेच हे सांगितलं आहे. राधिकाप्रमाणेच आपणही समाधानी असायला हवं.

## गावाकडच्या प्रेमाची गोष्ट



मराठी टेलिव्हिजनविश्वात सातत्याने नव्या मालिका दाखल होत आहेत. प्रत्येक मालिकेतून वेगळा विषय मांडण्याचा प्रयत्न होतो आहे. 'तुझ्यात जीव रंगला', 'लागीरं झालं जी' अशा मालिकांमधून आपण गावाकडची प्रेमकथा बघितली. अशीच एक प्रेमकथा सांगणारी नवी मालिका प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. नायक आणि नायिकेचं हळूहळू फुलत जाणारं प्रेम प्रेक्षकांना भावतं. त्यातच हे प्रेम गावाकडचं असेल तर त्याला एक वेगळीच किनार असते. गावाकडच्या मातीतल्या प्रेमकथा प्रेक्षकांना आवडतात. याआधीही 'लागीरं झालं जी', 'तुझ्यात जीव रंगला' अशा मालिकांमधून गावाकडच्या प्रेमकथा प्रेक्षकांच्या भेटीला आल्या. अशाच प्रकारची अजून एक प्रेमकथा प्रेक्षकांचं मनोरंजन करणार आहे. 'लई आवडतेस तू मला' या मालिकेत एक वेगळीच प्रेमकथा पहायला मिळणार आहे. प्रोमो समोर आल्यानंतर या मालिकेची चर्चा सुरू झाली. एकमेकांमध्ये वैर असणाऱ्या दोन गावांमधली ही प्रेमकथा आहे. कळशी आणि साखरगाव या दोन गावांमध्ये जन्मोजन्मीचं वैर आहे. एकमेकांच्या गावाची वेसही न ओलांडणाऱ्या या गावांमधले मुलगा आणि मुलगी एकमेकांच्या प्रेमात पडतात, त्यानंतर नेमकं काय होतं हे या मालिकेत पाहता येणार आहे. कळशी गावचा सरकार हा रांगडा गडी साखरगावात येतो आणि साखरगावच्या साहेबरावांची लेक सानिकाच्या प्रेमात पडतो. हे प्रेम कसं फुलतं, गावकरी त्यांना कसा विरोध करतात, हे सगळं आपल्याला मालिकेत पाहता येणार आहे. या मालिकेतून नवी कोरी जोडी प्रेक्षकांसमोर येणार आहे. तन्मय जक्का आणि सानिका मोजर हे कलाकार मालिकेत प्रमुख भूमिकेत दिसतील. या मालिकेच्या कथानकामुळे आपल्याला 'गोलीयों की रासलीला रामलीला' या चित्रपटाची नक्कीच आठवण होते. त्यामुळे या मालिकेत वेगळं काय पहायला मिळणार याबाबत कुतुहल आहे.

## रांगडा 'येक नंबर'

मराठी चित्रपटांच्या प्रेक्षकांना नेहमीच काहीतरी वेगळं हवं असतं. त्यातही राजकीय विषयावरील चित्रपट प्रेक्षकांना भावतात. 'येक नंबर' हा असाच एक चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. चित्रपटाचा ट्रेलर जबरदस्त आहे. या चित्रपटातून काहीतरी अनोखं पहायला मिळणार अशी अपेक्षा आहे.

मराठीत काही चित्रपटांची चांगलीच चर्चा होते. त्यातही राजकीय पार्श्वभूमी असणाऱ्या चित्रपटांबद्दल बरंच काही बोललं जातं. 'येक नंबर' हा सुद्धा असाच एक चित्रपट. 'येक नंबर'चा ट्रेलर नुकताच प्रदर्शित करण्यात आला. या चित्रपटात काहीतरी वेगळं, भन्नाट पहायला मिळणार असं ट्रेलर बघून वाटू लागलं आहे. राजेश मापुस्कर यांनी येक नंबरचं दिग्दर्शन केलं आहे तर धैर्य घोलप आणि सायली पाटील यांच्या यात प्रमुख भूमिका आहेत. या चित्रपटातल्या नायकाचं नाव प्रताप आहे. या प्रतापच्या दोनच इच्छा आहेत. एक म्हणजे आमदार व्हायचं आणि दुसरं म्हणजे आपल्या प्रेयसीशी म्हणजेच पिंकीशी लग्न करायचं. मात्र लग्न करण्यासाठी पिंकीने एक अट ठेवली आहे. राज ठाकरेंना गावात आणलं तर आपण लग्न करू, असं पिंकीने प्रतापला सांगितलं आहे. त्यामुळे राज ठाकरेंना गावात आणण्याचं आव्हान स्वीकारून प्रताप मुंबईकडे निघाला आहे. राज ठाकरेंच्या भेटीसाठी सुरू असणारी त्याची धडपड ट्रेलरमध्ये पहायला मिळते. त्यामुळे चित्रपटात प्रत्यक्षात राज ठाकरे दिसणार का, याबाबत उत्सुकता आहे. ट्रेलरमध्ये मलाईका अरोराची झलक दिसते आहे. यात तिचं आयटन साँग असल्याची चर्चा आहे. चित्रपटाला अजय-अतुलचं संगीत आहे. जाहीर झालं जगाला हे चित्रपटातलं गीत चांगलंच गाजत आहे. आता हा प्रताप राज ठाकरेंना भेटणार का आणि त्यांना गावात आणण्यात यशस्वी ठरणार का, हे पाहणं उत्सुकतेचं ठरणार आहे. काहीतरी वेगळं आणि रांगडं या चित्रपटात पहायला मिळेल, अशी अपेक्षा आहे.



## थोडक्यात

### छगन भुजबळांना जीवे मारण्याची धमकी



■ **नाशिक:** राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांना पुन्हा एकदा जीवे मारण्याची धमकी दिल्याने खळबळ उडाली आहे. एका इसमाकडून भुजबळ यांना जीवे मारण्याची धमकी देण्यात आली. आरोपीने मेसेज आणि फोनद्वारे ही धमकी दिली होती. याप्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली असून त्याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आरोपीने राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांना जीवे मारण्याची धमकी दिली होती. या प्रकरणी नाशिक पोलिस ठाण्यात तक्रार नोंदवण्यात आली होती. पोलिसांकडून आरोपीची ओळख पटली असून रविंद्र यशवंत धनक असे आरोपीचे नाव आहे. त्याच्यावर जालना जिल्ह्यातील अंबड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### भाजप आणि संघाकडून देशात 'संघ जिहाद' प्रकल्प



■ **मुंबई :** उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कोल्हापूर येथे एका कार्यक्रमात 'वोट जिहाद' आणि 'लव्ह जिहाद'वर भाष्य केले होते. यावरुन काँग्रेस नेते सचिन सावंव यांनी खरपूस समाचार घेत भाजप आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर निशाण साधला आहे. देशात संघाचा प्रसार करण्यासाठी भाजपा आणि संघाकडून 'संघ जिहाद' हा प्रकल्प राबविला जात आहे, अशी टीका सचिन सावंत यांनी केली आहे.

सचिन सावंत म्हणाले की, देशात संघाचा प्रसार करण्यासाठी भाजपा आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाकडून 'संघ जिहाद' हा प्रकल्प राबविला जात आहे. या प्रकल्पाअंतर्गत गेली दहा वर्षे 'व्होट जिहाद' 'लव जिहाद', ' लँड जिहाद' सारखे शब्द भाजप आणि संघाकडून वापरले जातात. देशात संघाचा विचार पसरविण्यासाठी द्वेष पसरवणे आणि मुस्लिम समाजाला क्ष्य करण्यासाठी अशा शब्दांचा प्रयोग केला जातो. आता उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दोन दिवसांपूर्वी व्होट जिहाद लव जिहाद हे शब्द वापरले आहेत. देवेंद्र फडणवीस हे महाराष्ट्रातील अकार्यक्षम गृहमंत्री ठरले आहेत. तशी त्यांची ख्याती झाली आहे, असा घणाघात सचिन सावंत यांनी केला आहे.

# पान, तंबाखू खावून रस्त्यावर थुंकणाऱ्यांचे फोटो वर्तमानपत्रात छापा

## स्वच्छ भारत अभियान कार्यक्रमात मंत्री नितीन गडकरींची सूचना



■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २:** भारतात चॉकलेट खाल्ले तर वेष्टन रस्त्यावर फेकणारे विदेशात मात्र वेष्टन खिशात ठेवतात असे सांगतानाच पान, तंबाखू व गुटखा खावून रस्त्यावर थुंकणाऱ्यांचे फोटो काढून वर्तमानपत्रांकडे पाठवा. आणि वर्तमानपत्रांनीही शहर घाण करणाऱ्यांचे फोटो छापावेत असे आवाहन केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी येथे केले.

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त नागपूर महानगरपालिकेद्वारे वारसास्थळ असलेल्या कस्तुरचंद पार्क येथे आयोजित स्वच्छ भारत अभियान कार्यक्रमात ते बोलत होते. याप्रसंगी मनपाचे आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी, आतिरिक्त आयुक्त आँचल गोयल उपस्थित होते.

मला देखील चॉकलेट खाल्ल्यावर गाडीतून वेष्टन रस्त्यावर फेकण्याची सवय होती. पण, नंतर ही सवय प्रयत्नपूर्वक बदलली. आता मी वेष्टन खिशात ठेवतो आणि घरी गेल्यावर डस्टबीनमध्ये टाकतो.

नेते जगाला मार्गदर्शन करतात. पण व्यक्तिगत जीवनात अनुकरण करीत नाही. मी मात्र असे वागत नाही अशी उपरोधीक टीका गडकरींनी केली. इकॉलॉजी, पर्यावरण चांगले असले तर दवाखान्यात जायची वेळ येत नाही. जल, वायू व ध्वनी प्रदुषणामुळे आयुष्य कमी करीत आहो. कचऱ्यातून संपत्ती निर्माण केली तर सर्व समस्या संपेल असे ते म्हणाले.

केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाने दिल्ली-मुंबई, ढोलेरा-अहमदाबाद तसेच इतर राष्ट्रीय महामार्गाच्या बांधणीमध्ये कचऱ्याचे विलगीकरण करून कंत्राटदारांना या कचरा सामग्रीचे रस्ते बांधणीत वापर करण्याचे सांगितले असून आतापर्यंत ८० लाख टन कचऱ्याचा वापर रस्ते बांधणीत करण्यात आला आहे. यामुळे पर्यायाने कचऱ्याची विल्हेवाट लागून स्वच्छता अभियानाला हातभार लागत असल्याचे गडकरींनी सांगितले.

पूर्व नागपूरातील भांडेवाडी येथील कचरा डेपोतील पार्टिकलवर प्रक्रिया करून त्यामार्फत जैव खतांची निर्मिती सुद्धा आता होत असून या जैव खतांचा वापर केल्याने पिकाच्या उत्पादनामध्ये वाढ होते. आणि ही खते रासायनिक खतांना पर्याय ठरतात असा दावा गडकरींनी केला.

कचऱ्यापासून बायो सीएनजी निर्मिती शक्य असून महानगरपालिकेने आपल्या ताफ्यातील वाहने पेट्रोल डिझेल ऐवजी सीएनजी, बायो एलएनजी अशा अपारंपरिक इंधनांवर संचालित करावी अशी सूचना गडकरींनी केली. यावेळी अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

# रातुम नागपूर विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. संजय दुधे यांना पद सोडण्याचे आदेश

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २ :** राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाला अनेक गंभीर प्रसंगांमधून सामोरे जावे लागत आहे. विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांचे नुकतेच निधन झाले.

कुलगुरूंच्या निधनानंतर विद्यापीठातील प्र- कुलगुरू पदाचा कार्यकाळ संपुष्टात येत असतो. कुलगुरू चौधरी यांचे दोनदा निलंबन झाले आहे. मात्र निलंबनानंतरही विद्यापीठातील प्र- कुलगुरू डॉ. संजय दुधे यांचे पद कायम होते. मात्र कुलगुरूंच्या निधनामुळे त्यांना आता आपले पद सोडावे लागणार आहे.

विशेष म्हणजे राज्यपालांनी तसे पत्र काढून त्यांना पद सोडण्याच्या सूचना दिल्या आहेत. मंगळवारी रात्री तसे पत्र विद्यापीठाला देण्यात आले. विद्यापीठ शिक्षण मंचासाठी मोठा धक्का मानला जात आहे. विद्यापीठातील कुठल्याही मोठ्या पदावर आता त्यांच्या गटातील अधिकारी नाही.

तत्कालीन कुलगुरू दिवंगत डॉ. सुभाष चौधरी यांच्या नियुक्तीनंतर कायद्याचे कलम ६ नुसार कुलपतींनी कुलगुरूंशी विचारविनिमय करून विद्यापीठासाठी प्र-कुलगुरू म्हणून डॉ. संजय दुधे यांची नियुक्ती केली होती. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम 2016 च्या कलम 13 उपकलम 7 नुसार प्र-कुलगुरूंचा पदावधी (कार्यकाळ) कुलगुरूंच्या पदाच्या अवधीबरोबरच किंवा वयाची 65 वर्षे पूर्ण करेपर्यंत जे लवकर घडेल तेव्हा समाप्त होतो.

> माजी कुलगुरू डॉ. काणे यांनी कुलसचिव पदासाठी गुणवत्तेच्या निकषावर अपात्र ठरवलेल्या डॉ. संजय दुधे यांची नागपूर विद्यापीठाच्या प्र-कुलगुरू पदावर ऑक्टोबर २०२० मध्ये नियुक्ती झाली होती. विद्यापीठ वर्तुळातील अनेक दिग्गजांना डावलून डॉ. दुधेंची निवड झाल्याने गुणवत्ता, पात्रता या निकषांऐवजी विशिष्ट विचारांची बांधीलकी व शिक्षण मंचाची निष्ठा सरस ठरल्याची चर्चा होती.

दिवंगत कुलगुरू डॉ. चौधरी यांचे 26 सप्टेंबरला निधन झाले. त्याच दिवशी प्र-कुलगुरू म्हणून कार्यकाळ नैसर्गिकपणे संपला. त्यामुळे कायद्याचे तंतोतंत पालन करून प्र-कुलगुरूंचा कार्यकाळ संपुष्टात आल्याचे परिपत्रक जाहीर करावे, अशी मागणी अधिसभा सदस्य ॲड. मनमोहन वाजपेयी यांनी प्रभारी कुलगुरूंकडे केली होती.

### महाराष्ट्र स्वराज्य पक्षाचे पहिले आंदोलन

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. २:** संभाजी राजे छत्रपती यांच्या महाराष्ट्र स्वराज्य पक्षाला भारतीय निवडणूक आयोगाच्या वतीने मान्यता मिळाली आहे. आता या पक्षाच्या वतीने राज्यातील पहिले आंदोलन करण्यात येत आहे.

मुंबई जवळ असलेल्या अरबी समुद्रात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते शिवस्मारकाचे जल पूजन झाले होते. हे शिव स्मारक शोधायला चला, असे आवाहन संभाजीराजे छत्रपती यांनी केले आहे. या अभियानाच्या माध्यमातून संभाजीराजे छत्रपती हे भाजपाला कोंडीत पकडण्याचा प्रयत्न करणार असल्याचे बोलले जात आहे.

या संदर्भात संभाजीराजे छत्रपती यांनी शिवप्रेमी नागरिकांना आंदोलन स्थळी उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे. मुंबईतील गेट ऑफ इंडिया येथे ६ ऑक्टोबर रोजी अकरा वाजता हे सर्व एकत्र जमणार आहेत.

# अक्षय शिंदे एन्काउंटरची न्यायिक चौकशी होणार



■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. २:** बदलापूर लैंगिक अत्याचार प्रकरणातील आरोपी अक्षय शिंदे याच्या एन्काउंटरची चौकशी करण्यासाठी महाराष्ट्र सरकारने एक सदस्यीय न्यायिक आयोगाची स्थापना केली आहे.

अलाहाबाद उच्च न्यायालयाचे माजी मुख्य न्यायमूर्ती दिलीप भोसले हे अक्षय शिंदे एन्काउंटरचा तपास करणार आहेत. गृह विभागाच्या वतीने या न्यायिक आयोगाची स्थापना करण्यात आली आहे. राज्य सरकारने याबाबत मंगळवारी एक अधिसूचना जारी केली आहे.

राज्य सरकारने जारी केलेल्या अधिसूचनेनुसार, २३ सप्टेंबर रोजी झालेल्या एन्काउंटरसाठी कोणतीही व्यक्ती, गट किंवा संघटना प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे जबाबदार होती का, याचा तपास केला जाणार आहे.

उद्भवलेली परिस्थिती हाताळण्यासाठी पोलिसांनी उचलेली पावले आणि घटनेशी संबंधित सर्व पैलूंची सविस्तर चौकशी या एक सदस्यीय समितीमार्फत होणार आहे.

चौकशी पूर्ण करण्यासाठी निवृत्त न्यायमूर्ती दिलीप भोसले यांना तीन महिन्यांची मुदत देण्यात आली आहे. एन्काउंटरला कारणीभूत ठरलेल्या घटनांचा नेमका क्रम आणि कारणांची चौकशी करणे सरकारला आवश्यक वाटले. त्यामुळे राज्य सरकारने या प्रकरणाची गंभीर दखल घेतली आहे.

# राज ठाकरेंनी वाचाळवीरांना फटकारले

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २:** महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त सोशल मीडियावर पोस्ट करत खास शब्दांत शुभेच्छा दिल्या आहेत. या पोस्टमध्ये महात्मा गांधींचे विचार सांगत बेताल वक्तव्ये करणाऱ्यांना देखील फटकारले आहे.

महाराष्ट्रात वाचाळवीरांना फारच बरे दिवस आले आहेत. काहीही बोलले, कितीही बेताल वक्तव्ये केली, तरी प्रसिद्ध मिळते हे माहीत झाल्यामुळे असल्यांचा सुळसुळाट झाला आहे, असा टोला राज ठाकरे यांनी लगावला आहे. राज ठाकरे यांनी माध्यमांना देखील सल्ला दिला आहे.

राज ठाकरेंनीआपल्या पोस्टमध्ये लिहिले की, महाराष्ट्रात वाचाळवीरांना तर फारच बरे दिवस आलेत. काहीही बोलले, कितीही बेताल वक्तव्य केली, तरी प्रसिद्धी मिळते हे माहित झाल्यामुळे, असल्यांचा सुळसुळाट झाला आहे. आणि हे होत आहे, कारण माध्यमे यांना प्रसिद्धी देतात. आणि त्यात भर पुन्हा सोशल मीडियाची. माध्यमांनी पण या क्षणापुरता न विचार करता, पुढच्या अनेक दशकांसाठी आपण काय पेरतोय याचा विचार करायला हवा.

### नेत्यांच्या मागे नको, गडावर या!

■ **वृत्तसंस्था, छ. संभाजीनगर, दि. २:** नेत्याच्या मागे न जाता सर्व मराठा बांधवांनी नारायण गडावर दसरा मेळाव्याला उपस्थित रहावे, असे आवाहन मनोज जरांगे पाटील यांनी केले आहे.२२

जरांगे पाटील म्हणाले की, दसरा मेळाव्याच्या तयारीसाठी मी उद्या रुग्णालयातून दुपारी १२ वाजता डिस्चार्ज घेणार आहे. यानंतर ते दसरा मेळाव्याच्या तयारीसाठी आंतरवाली सराटीमध्ये जाणार आहेत. गावागावातील मराठ्यांनी आपल्या भागातील नेते कुठे आले कुठे गेले हे लक्षात ठेवायला हवे. उद्या ते मतदान मागायला आपल्याकडे येणारच आहेत. कोण मुद्दामून नारायण गडावर आले नाही हे लक्षात घ्या असेही त्यांनी यावेळी बोलताना म्हटले आहे.

## पर्यावरण संवर्धनासाठी कार्यरत 'एच टू ओ अँड सॉईल फाऊंडेशन'




सृष्टीतील प्रत्येक घटक हा निसर्ग आणि पर्यावरणाचा महत्वाचा घटक आहे.यात विविध वृक्ष, प्राणी, पक्षी, नदी, नाले, पर्वत या सर्वांचे स्थान हे अबाधित आहे. परंतु, मनुष्याच्या प्रगतीच्या नावाखाली या निसर्ग साखळीला बाधा निर्माण होत आहे. आपली पूर्वीची जीवनशैली ही निसर्गाला पूरक अशी होती. चिमणी, कावळे, पोपट अशा असंख्य पक्षांना सहजच अन्न मिळत होते.

मात्र,मागील काही दशकांमध्ये हे चित्र बदलल पूर्वी वाड्यांमध्ये कौलारू घरांमध्ये पक्षांना घरटी बनवून राहण्यासाठी जागा असायची.आता सिमेंटच्या जंगलात चिमण्या आणि कावळ्यांना राहता येईल अशी निवाऱ्याची जागा नसते. त्यातच कीटकनाशकांच्या अती वापरामुळे छोट्या किडी, मुंग्या, सूक्ष्म जिवाणू आता नाहीसे होत आहेत. त्यामुळे पक्षांना अन्न मिळण कठीण झालेले आहे. जिथे दाट झाडे आहेत त्याच ठिकाणी पक्षांचा किलबिलाट ऐकायला मिळतो.

या पक्षांना विशेषतः चिमण्याना वाचवा अभियान सर्वत्र जोरात सुरू असताना औरंगाबाद शहरात स्परोमेन अशी ओळख असलेल्या संदीप भाले यांनी मागील 5 वषार्पासून चिमणी वाचवा अभियान सुरू केले आहे. पर्यावरण प्रेमी संदीप भाले यांनी पाच वषार्पूर्वी एच टू ओ अँड सॉ एल इंव्हायरमेंट रिसर्च फाऊंडेशन ही संस्था स्थापन केली. या संस्थेमार्फत शेतकऱ्यांसाठी माफक दरात माती परीक्षण, पाणी परीक्षण शेती विषयक सल्ला, वृक्षारोपण असे उपक्रम राबविले जातात.

चिमणी संवर्धनासाठी जनजागृती व्हावी म्हणून 2010 मध्ये संदीप यांनी जागतिक चिमणी दिनाचे औचित्य साधून एच ओ टू संस्थेची स्थापना केली.याच संस्थेच्या माध्यमातून चिमण्यांना शहरात सिमेंटच्या इमारती मुळे घरटी बनवता येत नसल्यामुळे मग कृत्रिम घरटी बनविण्यास सुरवात झाली.

6 सेंटिमीटर आकाराचा मध्यभागी गोल करून 12 सेंटिमीटर उंची आणि 14 सेंटिमीटर लांबीच्या आकर्षक आकारामध्ये ही घरटी तयार होऊ लागली. शिवाय पाच लिटर तेलाच्या क्यान पासून देखील अशी घरटी बनू लागली. या दोन्ही घरत्यामध्ये चिमण्यांची कुटुंब आरामात राहू शकतील अशी या घरट्याची रचना आहे.

हे घरटे कुठेही अडकवता येते आणि चिमण्या शिवाय या घरट्यात दुसरा कोणताही पक्षी जाऊ शकत नाही अशी याची रचना आहे. औरंगाबाद मधील गृहलक्ष्मी महिला बचत गटामार्फत ही घरटी बनविली जातात.

एक घरटे बनविण्यासाठी साधारण 70 ते 80 रुपये खर्च येतो. ही घरटी ना नफा ना तोटा तत्त्वावर शाळांना, पर्यावरण प्रेमींना दिली जातात. याच संस्थेच्या माध्यमातून घर तिथे घरटे हा अभिनव पद्धतीचा उपक्रम महाराष्ट्रात राबविला जातो. मागील पाच वर्षात संदीप यांच्या एच टू ओ या संस्थेच्या माध्यमातून सुमारे 14 हजार घरट्यांचे वाटप केले गेले आहे. या संस्थेच्या माध्यमातूनच शाळा महाविद्यालयांमध्ये जनजागृतीपर कार्यक्रमांचे आयोजन केले जाते.

आतापर्यंत संस्थेचे पाच हजार स्वयंसेवक जोडले गेले आहेत. शेतातील पिकांना नष्ट करणाऱ्या अळी आणि कृमी यांना संपुष्टात आणण्यासाठी चिमण्यांचा महत्वाचा वाटा आहे. एका अर्थाने पर्यावरणाची जैव विविधता टिकवून ठेवण्यात चिमण्यांची भूमिका ही अत्यंत महत्त्वाची ठरते. हेच महत्व लोकांना विविध माध्यमातून पटवून देण्यासाठी संस्था व त्यांचे कार्यकर्ते प्रयत्नशील असतात.

एकूणच, जगनिवारा, जगाचा पोशिंदा शेतकरी, त्या अनुषंगाने शेती आणि शेती टिकविण्यासाठी पक्षी संवर्धन ही काळाची गरज आहे हेच ओळखून एच टू ओ संस्था ही कार्यरत आहे. पर्यावरण प्रेमी अशा लोकांमुळेच अशा प्रकारच्या संस्था या आपली सामजिक उत्तरदायित्व भूमिका बजावतात.अशा संस्थेचे खरोखरच मनापासून कौतुक आणि अभिनंदन देखील करूयात. ■ ■

### शब्दार्थ

**WWW**

इंटरनेट जगतात वर्ल्ड वाइड वेबची सुरुवात टीम बरनर्स ली यांनी 6 ऑगस्ट 1991 रोजी केली होती. आज याला 22 वर्षे पूर्ण होत आहेत.वर्ल्ड वाइड वेब हे एक तंत्रज्ञान असून यामुळे जगातील सर्व संगणक एकमेकांशी जोडलेले आहेत. वर्ल्ड वाइड वेब किंवा डब्ल्यूडब्ल्यूडब्ल्यू लिंक्ड पेजेसचा एक मोठा संग्रह आहे. इंटरनेटचा वापर करताना ब्राउझरच्या मदतीने याच्यापर्यंत यूजर्सला सहज पोहोचता येऊ शकते. ■ ■




## होमेथॉन प्रॉपर्टी एक्स्पो २०२४ आता बनणार हरीत उपक्रम

नॅशनल रियल इस्टेट डेव्हलपमेंट काऊन्सिल (नरेडको), महाराष्ट्रा तर्फे भारतातील सर्वांत मोठ्या रियल इस्टेट प्रॉपर्टी एक्स्पोच्या तिसऱ्या पर्वाचे - होमेथॉन प्रॉपर्टी एक्स्पो २०२४ या प्रदर्शनाचे आयोजन ४ ते ६ ऑक्टोबर २०२४ दरम्यान मुंबईतील जिओ वर्ल्ड कन्व्हेन्शन सेंटर, बीकेसी येथे करण्यात येत असून आता हे प्रदर्शन हरीत प्रदर्शन बनणार आहे.

होमेथॉन प्रॉपर्टी एक्स्पो २०२४ चे औचित्य साधून नरेडको महाराष्ट्र कडून आता त्यांच्या शाश्वत आणि पर्यावरणस्नेही भविष्यातील गृहनिर्माण उपक्रमासाठी उद्घाटनाच्या सत्रात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत सहकार्य करारावर हस्ताक्षर करण्यात येणार आहे.

या उपक्रमाचा एक भाग म्हणून नरेडको महाराष्ट्रा ने फिनिक्स फाऊन्डेशन संस्था या प्रसिध्द कृषीतज्ञ आणि पर्यावरणाशी सुसंगत पीक म्हणून बांबूचे उत्पादन करण्यास प्रोत्साहन देणारे पाशा पटेल यांच्या नेतृत्वाखालील संस्थेबरोबर भागीदारी केली आहे. या भागीदारीमुळे नरेडको महाराष्ट्र कडून पाशा पटेल यांच्या मार्गदर्शनानुसार विकासकांमध्ये बांबूचा वापर करण्यासाठी जागरुकता निर्माण करण्यात येणार असून यामुळे बांधकाम प्रकल्पातील पर्यावरणस्नेही पर्याय म्हणून उपयोग करुन भविष्यातील घरे निर्माण करण्यासह शाश्वत उपक्रमांचा वापर करुन पर्यावरणा विषयी विचार करण्यावर भर देण्यात येणार आहे.

या उपक्रमा विषयी बोलतांना नरेडकोचे उपाध्यक्ष राजन बांदेलकर यांनी सांगितले, नरेडको महाराष्ट्रने नेहमीच सक्षम शाश्वत पध्दतींच्या निर्मितीवर लक्ष्य केंद्रित केले आणि घरखरेदीदार आणि विकासक यांच्यातील दुवा म्हणून आम्ही पर्यावरणावर सकारात्मक परिणाम करण्यावर भर देत आहोत.

होमेथॉन प्रॉपर्टी एक्स्पो मध्ये भविष्यातील शाश्वत हाऊसिंग देण्यावर विशेष लक्ष देत आहोत. बांबूचा वापर वाढवण्यासह पर्यावरणस्नेही सामानाचा वापर करत पर्यावरणस्नेही कामांमुळे राज्याच्या नेट झिरो उपक्रमाला आम्ही सहकार्य करुन देशाच्या पातळीवर आम्ही नेऊ. ■ ■

: संकलन व संयोजन :
**सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६**
subodh.ranshevre @rediffmail.com

# पण आपण रोज नमस्कार करावा...



■ **वृत्तसंस्था, कोल्हापूर, दि. २:** खासदार संजय राऊत हे परमेश्वरावर, महापुरुषावर किंवा महान नेत्यांवर बोलण्याचे धाडस व उपमर्द करू शकतात. पण आपण कलम ३७० रद्द केल्यामुळे रोज अमित शहा यांना नमस्कार केला पाहिजे, असे मत राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी बुधवारी ठाकरे गटावर निशाणा साधताना व्यक्त केले.

संजय राऊत यांनी पत्रकारांशी संवाद साधताना अमित शहा यांच्यासह भाजपच्या सर्वच नेत्यांना स्वप्नदोषाचा आजार जडल्याचा आरोप केला होता. त्यांच्या या टीकेवर भाजपच्या वर्तुळातून संमिश्र प्रतिक्रिया येत आहेत. मंत्री चंद्रकांत पाटील यांनीही या प्रकरणी संजय राऊत यांच्यावर टीका करत तेच असे बोलण्याचा उपमर्द करू शकतात असा दावा केला आहे.

चंद्रकांत पाटील म्हणाले, खासदार संजय राऊत अमित शहाच नाही तर परमेश्वर, महापुरुष किंवा एखाद्या महान नेत्यावरही बोलण्याचे धाडस व उपमर्द करू शकतात. पण आपण जम्मू काश्मीरमधील कलम ३७० रद्द केल्यामुळे रोज अमित शहा यांना नमस्कार केला पाहिजे. अमित शहा एक दूरदृष्टी असणारे नेते आहेत. त्यामुळेच ते २०२९ च्या निवडणुकीविषयी बोलले असतील.

चंद्रकांत पाटील यांनी यावेळी आगामी विधानसभा निवडणुकीत महायुतीच्या 170 हून अधिक जागा निवडून येण्याचा दावा करत उद्धव ठाकरे यांच्यावरही निशाणा साधला.

ते म्हणाले, यंदाच्या विधानसभा निवडणुकीत महायुतीतील तिन्ही घटकपक्षांच्या १७० हून अधिक जागा निवडून येतील. लाडकी बहीण योजनेसह अनेक चांगल्या योजना सरकारने जनतेला दिल्या आहेत. पण काहींना उपकारांची जाणीव नसते. त्यांनी ती ठेवली असती तर युतीचे सरकार आले असते.

### कोयता गँग, ड्रग्स माफियांनी सुसंस्कृत पुण्याची वाट लावली



■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. २:** शरचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून एक व्हिडिओ शेअर केला आहे.

या व्हिडिओमध्ये रस्त्यावर जाणाऱ्या वाहनावर रात्रीच्या वेळी कोयता गँग हल्ला करत असल्याचे दिसून येत आहे. तसेच या गाडीमध्ये असलेली महिला घाबरलेल्या अवस्थेत देवाचा धावा करत असल्याचे देखील दिसून येत आहे. या माध्यमातून आमदार रोहित पवार यांनी उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर निशाणा साधला आहे.

या संदर्भात आमदार रोहित पवार यांनी व्हिडिओ पोस्ट करत पुण्यात कोयता गँग आणि ड्रग्ज माफिया यांनी सुसंस्कृत पुण्याची वाट लावल्याचा आरोप केला आहे. गृहमंत्र्यांनी पुण्याचे मिझार्पुर करून सोडले असल्याचा आरोप देखील आमदार रोहित पवार यांनी केला आहे. त्यामुळे आता या अकार्यक्षम सरकारला बाजूला करून महाराष्ट्राला सुरक्षित करण्याची वेळ आली असल्याचा दावा देखील त्यांनी केला आहे.

## कॉम्प्रेसरचा स्फोट

### एक ठार, दोन गंभीर जखमी



■ **वृत्तसंस्था, सातारा, दि. २:** माची पेठ परिसर मंगळवारी दुपारी सर्व्हिसिंग सेंटरमधील कॉम्प्रेसरच्या स्फोटाने हादरला. या स्फोटात एक जागीच ठार, तर दोनजण गंभीर जखमी झाले आहेत. या स्फोटामुळे आजुबाजूच्या घरांतील खिडक्यांच्या काचा फुटल्या. मुनीर पालकर (वय ३५, रा. गुरुवार परज, सातारा), असं मृताचं तर हारूण बागवान आणि उमर बागवान, अशी गंभीर जखमींची नावे आहेत.

सातारा शहरातील माची पेठेत अदालत वाड्याजवळ असलेल्या सर्व्हिसिंग सेंटरमध्ये भरदुपारी भीषण स्फोट झाला. स्फोटानंतर आसमंतात पांढऱ्या रंगाचे लोट पसरले. स्फोट एवढा जबरदस्त होता की सर्व्हिसिंग सेंटरच्या बाजूच्या दुकानात बसलेल्या तिघांपैकी मुनीर बागवान हा ३० फूट दूरवर उडाला आणि डांबरी रस्त्यावर पडला. त्याच्या शरीराच्या चिंधड्या उडाल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला. सर्व्हिसिंग सेंटरलगतच्या दुकानात बसलेले आणखी दोघे जण या स्फोटात गंभीररित्या जखमी झाले आहेत. रक्तबंबाळ अवस्थेत त्यांना रुग्णालयात नेण्यात आलं. घटनास्थळी रक्ताचा सडा पडला होता.

## लोकसभा निवडणुकीत बैल चालले नाही...

# त्यामुळे आता गाय आणली!



■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. २:** गाय ही बैलांची माता आहे, पण सरकारचे बापजादे बैल असल्यानेच निवडणुकीसाठी आता गाय आणली आहे. लोकसभा निवडणुकीत बैल चालले नाहीत. त्यामुळे राज्यातील सत्ताधाऱ्यांनी आता विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर गायींना मंचावर आणले आहे, अशी खरमरीत टीका उद्धव ठाकरे यांनी केली आहे.

ठाकरे पुढे असे म्हणाले, अर्थात, त्यांनी काहीही केले तरी लोकसभेप्रमाणेच विधानसभा निवडणुकीतही राज्यातील जनता या सरकारला गोठ्यात ढकलणार हे निश्चित आहे. तरीही लोकहो सावधान, गायींना राज्यमाता बनविण्याचा निर्णय हे गायींच्या नावाने दंगली घडविण्याचे कारस्थान असू शकते.

लाडक्या बहिणींनंतर मिंधे सरकारने गायींना राज्यमातेचा दर्जा द्यायचा निर्णय घेतला आहे. गाय ही यापुढे राज्यमाता-गोमाता असेल असे सरकारने जाहीर केले. निवडणुका जिंकण्यासाठी मिंधे सरकार काय उचापती करेल याचा नेम नाही. देवांना, गायींनाही राजकारणात आणून निवडणुकांना सामोरे जाण्याचा हा प्रकार हास्यास्पद आहे. किमान देवाला तरी राजकारणापासून दूर ठेवा असे सर्वोच्च न्यायालयाने आंध्र प्रदेशच्या सरकारला सुनावले.

तिरुपती देवस्थानातील लाडूत चरबीयुक्त तूप मिसळले जात असल्याचा आरोप मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांनी केला. यावर सर्वोच्च न्यायालय म्हणते, संवैधानिक पदावर असणाऱ्या लोकांनी तरी देवाला राजकारणापासून दूर ठेवले पाहिजे. जेव्हा तुम्ही घटनात्मक पदावर असता तेव्हा देवाला राजकारणापासून दूर ठेवावे असे अपेक्षित असल्याचे त्यांनी नमूद केले आहे.

**गोमाता वगैरे थोतांड...**

आपण हिंदुत्ववादी आहोत हे दाखविण्यासाठी भाजप व त्यांचे लोक रोज प्रयत्न करतात. गायीस राज्यमाता म्हणण्याआधी भाजप व त्यांच्या बगलबच्च्यांनी हिंदुहृदयसम्राट, वीर सावरकर यांचे गायीबाबतचे विचार समजून घ्यायला हवे होते. गोमाता वगैरे थोतांड आहे. असे वीर सावरकर म्हणत व त्यांचे हे विचार विज्ञानवादी होते, असेही उद्धव ठाकरे यांनी म्हटले आहे.

नागपूर

# महासागर वृत्तसागर

■ गुरुवार, दि. ०३ ऑक्टोबर २०२४ ■



# जेष्ठ नागरिक संघटनेची वार्षिक आमसभा संपन्न

■ महासागर प्रतिनिधी
कळमेश्वर, दि. २ :

कळमेश्वर येथिल संत सावता मंदिर सभागृहात दिनांक 1 आक्टोंबर 2024 मंगळवार ला कळमेश्वर जेष्ठ नागरिक संघटनेची आमसभा संपन्न झाली. यात सवार्नुमते नवीन कार्यकारणीची निवड करण्यात आली. आमसभेचे अध्यक्ष डॉक्टर कृष्णाजी बगडे हे होते तर प्रमुख अतिथी सुधीर भगत अध्यक्ष फेस्काम नागपूर विभाग हे होते.

यावेळी काशिनाथ चिमूरकर मनोहर राऊत, मेघराज नवले, मुकिंदा राऊत, ताज महंमद शेख, दयाराम धनगरे, अरुण धोटे, हरिभाऊ शेंडे, ज्ञानेश्वर गूळांदे, उमादेवी गौतम, वरीट पत्रकार युवराज मेश्राम प्रधान संपादक महाराष्ट्र संदेश न्यूज चॅनल व स्टार महाराष्ट्र न्यूज चॅनेल नागपूर जिल्हा प्रतिनिधी तथा शितल नंदनवार न्यूज इंडिया चैनल 2/4 च्या संपादिका तथा पत्रकार चांदणी पाठक संपादिका हमारी चौपाल नागपूर हे अतिथी म्हणून उपस्थित होते.



या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राध्यापक हरिभाऊ शेंडे यांनी केले. तर वार्षिक अहवाल सादर केला. यावेळी सचिव मेघराज नवले यांनी केले या कार्यक्रमांमध्ये दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. तथा 75 वर्षावरील 21 ज्येष्ठ नागरिकांचा शाल शिल्ड व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. बारावी व दहावीच्या प्राविण्य विद्यार्थ्यांचा सत्कार ज्येष्ठ नागरिक यांचा सत्कार तसेच यावेळी पत्रकार युवराज मेश्राम, शितल नंदनवार व चांदनी पाठक यांचाही यावेळी जेष्ठ नागरिक संघटनेच्या वतीने शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.

त्याच प्रमाणे यावेळी अध्यक्षपदावरून कृष्णाजी बगडे म्हणाले की, ज्येष्ठ नागरिकांच्या साठी शासनाने विविध उपक्रम आणलेले आहेत, त्याचा फायदा सर्व ज्येष्ठ नागरिकांपर्यंत पोहोचण्यासाठी संघटना कटिबद्ध आहे. ज्येष्ठ नागरिकांसाठी निसर्गरम्य सहली आरोग्य विषय चे शिबिरे योगा क्रीडा इत्यादी विविध उपक्रम जेष्ठ नागरिकांना सहभागी करून साठ वर्षावरील नागरिकांना आपण या संघटनेमध्ये समाविष्ट करण्यात यावे, असे ते याप्रसंगी म्हणाले.

यावेळी इतनी शक्ती हमे देना दाता सामूहिक गीत झाल्यानंतर ज्येष्ठ नागरिकांच्या व्यथा वरील प्रबोधन गीत संघटनेचे सदस्य आकाशवाणी व दूरदर्शन कलावंत अरुण सहारे यांनी मंचकावरून सादर करून वाहवा मिळवली. संघटनेच्या सदस्या नलिनी देशमुख यांनी पदाधिकारी व सदस्यावर कॉमेडी गीत सादर केले संचालन ताज महंमद शेख व कृष्णा शेंडे यांनी केले तर आभार प्रदर्शन संघटनेचे उपाध्यक्ष मनोहर राऊत यांनी केले. याप्रसंगी या कार्यक्रमाला कळमेश्वर तालुक्यातील बहुसंख्येने जेष्ठ नागरिक संघटनेचे सदस्य गण उपस्थित होते.

# माजी आमदार डी.मल्लिकार्जुन रेड्डी यांच्या नेतृत्वात तहसील कार्यालयावर धडक मोर्चा



■ महासागर प्रतिनिधी, रामटेक, दि. २ :

दि.१ ऑक्टोबर ला रामटेक विधानसभा क्षेत्राचे माजी आमदार डी. मल्लिकार्जुन रेड्डी यांच्या नेतृत्वात हजारोंच्या संख्येत तहसील कार्यलयावर धडक मोर्चा काढण्यात आला. शांती मंगल कार्यालयापासून मोचार्ची सुरुवात करण्यात आली.डॉ. आंबेडकर चौकातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतड्याला माल्यार्पण करुण मोर्चा तहसील कार्यालयात धडकला.

मोचार्चा उद्देश या क्षेत्रातील बेरोजगार युवक, रखडलेला तीर्थक्षेत्र विकास, कोरडवाहू क्षेत्र सिंचन, वनशेत्र आदिवासी ४२ गावांतील वाघामुळे बळी पडणारी जनता, घरकुलपासून वंचित असणारे बेघर, महाराष्ट्र खनिकर्म विकास महामंडळात युवकांना रोजगार मिळावा.

देवलापार येथे कृषि उत्पन्न बाजार समितीचा उपबाजार सुरु करण्यात यावा, सोयाबीन व कापसाला आधारभूत किंमत जाहीर करावी, भ्रष्टाचारमुळे त्रस्त जनतेच्या समस्यांचे निराकारण करने अश्या अनेक विविध समस्यांविषयी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांना रामटेकचे उपविभागीय अधिकारी प्रियेश महाजन यांच्या मार्फत निवेदन देण्यात आले.

त्यानंतर शांती मंगल कार्यालय येथे सभा घेण्यात आली. मोर्चा व संवादसभेला माजी आमदार डी. मल्लिकार्जुन रेड्डी,नमो नमो मोर्चा चे राष्टीय अध्यक्ष विजय हटवार,डॉ. राजेश ठाकरे, पं.स. उपसभापती नरेंद्र बंधाटे, माजी नगराध्यक्ष दिलीप देशमुख, जि.प.सदस्य व्यंकट कारेमोरे, जि.प. सदस्य सतीश डोंगरे, पं.स.सदस्य नरेश मेश्राम, माजी न.प.उपाध्यक्ष आलोक मानकर, उमेश पटले, रवी चव्हाण, रेखा दूनेदार, सागर गावंडे, सागर लोंढे, सुखदेव शेंद्रे, संजय बिसमोगरे, नेहा गावंडे,उज्वला धमगाये, चित्रा धुरई, संजय अजबिले, योगेश मात्रे, नंदलाल बावनकुळे, फजित सहारे, कुणाल कांबळे, गणेश बगमारे, हेमंत जैन, केशव मेहर, वसंता कोकाटे, मुलचंद यादव, अतुल चित्रिव, नंदकिशोर कोहळे सह मोठ्या प्रमाणात महिला व पुरुष उपस्थित होते.

# वाडीत वंचितच्या आरक्षण बचाव जनसंवाद यात्रेला भव्य प्रतिसाद



■ महासागर प्रतिनिधी,
वाडी, दि. २ :

येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा प्रांगणातून वंचित बहुजन आघाडीच्या वतीने आयोजित आरक्षण बचाव जनसंवाद यात्रेची सुरुवात मंगळवार १ ऑक्टोबर रोजी सकाळी करण्यात आली.

सर्वप्रथम माजी जि.प.सदस्य दिनेश बन्सोड, वंचित बहुजन युवा आघाडीचे जिल्हाध्यक्ष मनीष बोरकर, सोनिया वानखेडे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर, तथागत बुद्ध व सम्राट अशोक यांच्या पुतळ्याला माल्यार्पण करून अभिवादन केले.

ही आरक्षण बचाव जनसंवाद यात्रा आंबेडकर नगरातील विविध चौकात भ्रमण करीत अमरावती महामागार्ने आदर्श नगर, टेकडी वाडी, दत्तवाडी, नवनीत नगर, आठवा मैल, दवलामेटी, वानाडोंगरी, हिंगणा, बुटीबोरी इत्यादी परिसरात जनसंवाद यात्रेतून अनुसूचित जाती, जमाती, इतर मागासवर्गीय व भटके विमुक्तांचे आरक्षण वाचवण्या सह त्यांची स्कॉलरशिप दुप्पट व्हावी इत्यादी विषयावर जनजागृती करण्यात आली.

यावेळी कार्यकर्त्यांनी वंचित बहुजन आघाडीचा विजय असो, 'आरक्षण आमच्या हक्काचं नाही कुणाच्या बापाचं' अशा घोषणांनी परिसर दणाणून टाकला.तर भाजप प्रणित महायुती व काँग्रेस प्रणित महाविकास आघाडी यांचा आरक्षणा संदर्भात पदार्फाश करण्यासाठी ही आरक्षण बचाव जनजागृती यात्रा असल्याचे माजी जि.प.सदस्य दिनेश बन्सोड यांनी सांगितले व या अभियानात सहभागी होण्याचे आवाहन केले.

या जनसंवाद यात्रेत जिल्हा पदाधिकारी विश्रांती रामटेके, अजय सहारे, पंकज शेलारे, अतुल शेंडे, अनिल पुंड, ईश्वर उके, कंठीराम तागडे, सोनिया वानखेडे, गिताबाई उके, साधना नितनवरे, महानंदा राऊत, नागेश बोरकर, प्रकाश मेश्राम, रोहित राऊत, श्रीकांत रामटेके, राजेश वानखेडे, स्वप्निल चारभे, राहुल लामसोंगे, भीमराव पाटील, विश्वनाथ कुकसे, सतीश जंगले, दिलीप भोरगडे, नितीन वाघमोडे, प्रवीण तायडे, जितेंद्र पानतावणे, भगवान मेश्राम, नाना मेश्राम, राजू रंगारी, बाबुराव वासनिक, गजानन वासनिक, मिलिंद कांबळे, वैशाली भालाधरे, प्रीती वाकडे, प्रीती गणवीर आदी सह मोठ्या संख्येने पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी झाले होते.

# द्रुगधामना ग्रा.पं. मध्ये महात्मा गांधी व लालबहादुर शास्त्री यांची जयंती साजरी

■ महासागर प्रतिनिधी, वाडी, दि. २ :

येथील ग्रामपंचायत कार्यालयात भारतरत्न महात्मा गांधी व माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांची जयंती साजरी करण्यात आली. स्वच्छता हि सेवा कचरामुक्त भारत अंतर्गत एक तास श्रमदान करण्यात आले.

सर्वप्रथम उपस्थित मान्यवरांनी महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेला हारार्पण केले. यावेळी सरपंच मंगला रागीट, उपसरंपच बंडू ( शंकर ) गजभिये , ग्रामसचिव शिल्पा धांडे ( काळे ) ,ग्रा.पं. सदस्य सीमा बोरकर, संगीता गवई, कोमल नासरे, वैशाली गजभिये, उखंडराव मोहोड, लक्ष्मण ईटकर, अनिकला उईके, आनंद हुंडीवाले, ग्रा.पं. लिपीक नरेश गजभिये, योगेश रागीट , आरोग्य कर्मचारी व ग्रा.पं. कर्मचारी उपस्थित होते.

# हजरत बाबा सय्यद साहिब यांचा वार्षिक उर्स सुरू

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. २ :

वंजारी नगर येथील राजाबाग येथील ऐतिहासिक दर्गाहमध्ये हजरत बाबा सय्यद साहेब रहमतुल्ला अलैह यांचा वार्षिक उर्स सुरू झाला आहे.



25 सप्टेंबर ते 1 ऑक्टोबर या कालावधीत चालणाऱ्या या पवित्र सोहळ्यासाठी देश भरातून भाविकांची गर्दी होत आहे. यावेळी सिराज शेख व शेख परिवारातर्फे झैरीनचे वाटप करण्यात आले, ज्याचा हजारो भाविकांनी आनंद लुटला तसेच सर्व लोकांसाठी नेत्र तपासणी शिबिराचेही आयोजन करण्यात आले होते.

दर्गाह पंच कमिटीचे अध्यक्ष श्री.सिराज शेख रमजान शेख यांच्या हस्ते कुशाईच्या विधीने उर्सची सुरुवात झाली. मंगळवारी पंच कमिटीच्या सामाजिक उपक्रमातून सार्थक बहुउद्देशीय संस्थेच्या सहकार्याने दर्गा प्रांगणात मोफत नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते, उर्स दरम्यान दररोज सायंकाळी ७ वाजता मेहफिल-ए-कव्वालीचे आयोजन करण्यात आले होते, ज्यामध्ये सुफी कव्वाल आपले कलाम सादर करतील. मंगळवारी कुल शरीफ की फातेहाने या उर्सची सांगता झाली असून, यासोहळ्यात सर्व भाविकांनी सहभागी व्हावे, असे आवाहनही पंच कमिटीने केले आहे बाबांच्या आध्यात्मिक आशीवार्दाचा लाभ होईल.

# नगरपंचायत निलडोहची स्वच्छता मॅरेथॉन स्पर्धा

■ महासागर प्रतिनिधी,
हिंगणा, दि. २ :

'स्वच्छता ही सेवा २०२४' उपक्रमा अंतर्गत निलडोह नगर पंचायततर्फे खुल्या स्वच्छता मॅराथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. यात सर्वच वयोगटातील २०० पेक्षा जास्त स्पर्धकांनी सहभाग नोंदवला. व्हीआयपी गेट ते झोन चौक या १६०० मीटरच्या स्पर्धेला मुख्याधिकारी योगिता डांगरे यांनी हिरवी झेंडी दाखवून शुभारंभ केला. यानंतर टाकाऊ पासून टिकाऊ वस्तू तयार करण्याची स्पर्धा घेण्यात आली. तसेच स्वच्छतेशी संबंधित अनेक उपक्रम राबविण्यात आले.



सर्व स्पर्धांचे बक्षीस व सहभागीता प्रमाणपत्राचे वितरण बुधवारला ०२.१०.२०२४ ला महात्मा गांधी जयंती दिनी करण्यात येईल असे मुख्याधिकारी योगिता डांगरे यांनी सांगितले. आयोजनाकरिता शहर समन्वयक प्रेमदास मैंद, कराटे प्रशिक्षक शबीर शाह तसेच इतर कर्मचारी वसंत कावळे, टोनी गायकवाड, कमलेश ठाकरे, आमीर पठाण, शशिकांत दुरुगकर, शशिकांत वाघे, शशिकांत राउत, विनोद बाराहाते, परिसरातील शाळांमधील शिक्षक व सर्व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. ही स्पर्धा बघण्यासाठी निलडोह येथील नागरिकांनी गर्दी केली होती.

# मुसळगाव येथे महात्मा गांधी जयंती उत्सवात संपन्न



■ कुही, दि. २ :

तालुक्यातील गट ग्रामपंचायत मुसळगाव येथे महात्मा गांधी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. त्याप्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्ष दमयंती अडीकणे सरपंच, ग्रा.पं.सदस्य बंडु बेंबारे, रंजना झाडे, वंदना मेश्राम, माजी सरपंच डॉ. चिंतामण भुजाडे, रामकृष्ण भुजाडे,पोलीस पाटील वर्षा खडसे, शोभा भुजाडे, ज्येष्ठ नागरिक रामा झाडे, मुख्याध्यापक संजय पेशने, ग्रामसेवक रवी इंगळे आदी मान्यवर उपस्थित होते. ग्रामवासीयांना ग्रामस्वच्छताचे महत्व व झाडे लावा-झाडे जगवा अशा अनेक विषयावर मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमाचे आयोजन मानसी सांस्कृतिक कला मंडळ, मुसळगाव व ऑरेंज सिटी बहु.संस्था, विहीरगाव नागपूर यांच्या सहकार्याने कार्यक्रम उत्साहात पार पडला.

# स्वच्छता ही सेवा अभियानांतर्गत स्वच्छता पंधरवाड्याचे आयोजन

■ महासागर प्रतिनिधी, कन्हान, दि. २ :

स्वच्छता ही सेवा २०२४ अभियानांतर्नगत नगर पंचायत कांद्री (कन्हान) मार्फत कांद्री(कन्हान) नगर पंचायतीचे मुख्याधिकारी सचिन गाढवे यांच्या मार्गदर्शनाखाली १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोंबर २०२४ दरम्यान स्वच्छता पंधरवाडा मुहीम सुरु आहे. या दरम्यान विविध उपक्रम कांद्री शहरात घेण्यात आले त्याचप्रमाणे कांद्री क्षेत्रातील शाळेमध्ये मंगळवारी विकास प्राथमिक शाळा कांद्री (कन्हान) येथे स्वच्छता विषयावर शाळेच्या विद्यार्थ्यांना कडून चित्रकला स्पर्धा, निबंध स्पर्धा, टाकाऊ वस्तू पासून टिकाऊ, घोषवाक्य, पथनाट्य व विविध कार्यक्रम राबविण्यात आले व उत्कृष्ठ कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यास बक्षीस देण्यात आले त्याचप्रमाणे सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.



या कार्यक्रमात उपस्थित असलेले विकास प्राथमिक शाळाचे मुख्याधापक राजेंद्र खंडाईत सर यांनी स्वच्छता विषयावर शाळेय विद्यार्थ्यांना मार्गदर्शन दिले तसेच म्हणाले कि, आपल्या जीवनात स्वच्छतेला फार महत्त्व आहे. यावेळी नगर पंचायत कांद्री (कन्हान)चे मुख्याधिकारी सचिन गाढवे, स्वच्छता अभियंता वीरेंद्र ढोके, शहर समन्वयक कूमारी चंदा वैद्य, शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक कर्मचारी, न.पं. कार्येक्रम सहकारी रितिक कनोजे, मोईन शेख, स्मिता भुसारी उपस्थित होते.

# रब्बानी शाळेतील विद्यार्थ्यांना गांधी जयंतीनिमित्त पुरस्कार

■ महासागर प्रतिनिधी, कामठी, दि. २ :

कामठी येथे राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंती निमित्य हिंदू मुस्लिम व सर्वधर्म एकता मंच संस्थे तर्फे महात्मा गांधी यांच्या जीवनावर आधारित भव्य पदर्शनीच्या कार्यक्रमाला शिवसेना जिल्हाप्रमुख देवेंद्र गोडबोले प्रामुख्याने उपस्थित होते. यावेळी एम.एम.रब्बानी शाळेतील उत्कृष्ट मुलांना बक्षीशे देण्यात आली. यावेळी आयोजक माजी उपनगराध्यक्ष कामठी एहफाज अहमदजी, शिवसेना कामठी तालुकाप्रमुख रवींद्र निकाळजे, शहरप्रमुख मुकेश यादव, उपतालुकाप्रमुख श्रीराम हटवार, तालुकाप्रमुख मनशा पटेल, रब्बानी शाळेतील सर्व शिक्षक वर्ग व विद्यार्थी उपस्थित होते.

# शिक्षक पदाधिकारी व कार्यकर्ता प्रशिक्षण शिबीर संपन्न

■ महासागर प्रतिनिधी,
वाडी, दि. २ :

महाराष्ट्र माध्यमिक शिक्षक महासंघातर्फे संघटनेचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांसाठी दोन दिवसीय प्रशिक्षण शिबीराचे आयोजन ग्रीनलँड रिसार्ट रामटेक येथे करण्यात आले. शिबीराचे उद्घाटन संघटनेचे राज्य कोषाध्यक्ष शबाहात हुसेन यांच्या हस्ते व यशवंत जनबंधू यांचे अध्यक्षतेखाली, पुरुषोत्तम पंचभाई,राज्य महासचिव बाळा आगलावे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये संपन्न झाले.




या शिबिरामध्ये शिक्षक व शिक्षणाशी संबंधित विविध महत्त्वाच्या विषयांवर उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करण्यात आले. त्यात प्रामुख्याने शिक्षक कार्यकर्त्यांची संघटनेतील भूमिका, जबाबदारी व कर्तव्य, मुख्याध्यापक उपमुख्याध्यापक पर्यवेक्षक व शिक्षक यांची कर्तव्य व अध्यापनाचे नियोजन या दोन विषयांवर संघटनेचे पुरुषोत्तम पंचभाई यांनी मार्गदर्शन केले. सेवाशर्ती नियमावली व शिक्षणाचा अधिकार अधिनियम या विषयावर बाळा आगलावे यांनी आणि नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण या विषयावर रामटेक पंचायत समितीचे केंद्रप्रमुख विकास गणवीर यांनी उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. याप्रसंगी संघटनेच्या वेबसाईटचे उद्घाटन सुद्धा करण्यात आले.

समारोपप्रसंगी संघटनेच्या सेवानिवृत्त पदाधिकाऱ्यांचा शाल, श्रीफळ व स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. शिबिर आयोजन समितीचे प्रमुख श्री प्रकाश वाकडे व सल्लागार बंडू भैसारे यांच्या नेतृत्वात जयप्रकाश तवले व उल्हास पुरकाम यांनी उत्कृष्ट नियोजन करून ही कार्यशाळा यशस्वीरित्या पार पाडण्यात मोलाची भूमिका बजावली. शिबिराच्या यशस्वीतेसाठी संघटनेचे शहराध्यक्ष सुनील चौधरी, सचिव अब्दुल कौसर, ग्रामीण अध्यक्ष भोजलाल वरठी, सचिव प्रवीण रेवतकर व अन्य पदाधिकाऱ्यांनी प्रयत्न केले. शिबिराचे उद्घाटन सत्र व समारोप सत्राचे संचालन शिक्षक आनंद महाले तर आभार प्रदर्शन विवेक डोंगरे यांनी केले. यावेळी अझहर हुसैन, जयवंत इंगोले, मेहंदी हसन, संजय लांजेवार, रमेश राऊत, अनिल हिंगणकर, धनपाल सोनकुसरे, प्रविण राऊत, सुदर्शन गोस्वामी, जगन्नाथ सावरकर, प्रदिप केथे, रमेश लोहकरे, श्लोमेश बुधे, नंदकिशोर शेटे व इतर पदाधिकारी व सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नागपूर विभागीय रेल्वे रुग्णालयात पहिली यशस्वी संपूर्ण गुडघा बदलण्याची शस्त्रक्रिया

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर दि. २ :

विभागीय रेल्वे व्यवस्थापक (डीआरएम) श्री मनीष अग्रवाल आणि मुख्य वैद्यकीय अधीक्षक (सीएमएस) डॉ. जी.एस. मंजुनाथ यांच्या दूरदर्शी नेतृत्वाखाली, विभागीय रेल्वे रुग्णालय (ऊह्ल) नागपूरने 23 सप्टेंबर 2024 रोजी पहिली एकूण गुडघा बदलण्याची (ळङफ) शस्त्रक्रिया यशस्वीपणे करून एक महत्त्वपूर्ण वैद्यकीय टप्पा गाठला.



ही शस्त्रक्रिया 64 वर्षीय पुरुष रुग्णावर करण्यात आली होती, जो वॅल्गस विकृतीसह उजव्या गुडघ्याच्या ग्रेड 4 ऑस्टियोआर्थराइटिसने ग्रस्त होता. एकूण गुडघा बदलण्याची (टीकेआर) शस्त्रक्रिया डॉ. रवी चंद्र वरमुरू, विभागीय वैद्यकीय अधिकारी (डीएमओ) आणि जॉइंट रिप्लेसमेंट सर्जन, डॉ. धना किशोर पी., डीएमओ (ऑर्थोपेडिक) आणि डॉ. प्रशांत बी सहाय्यक मुख्य वैद्यकीय अधीक्षक (अनेस्थेसियोलॉजिस्ट) यांच्यासमवेत हॉस्पिटलच्या समर्पित ओटी टीमच्या बहुमोल सहकार्याने करण्यात आली. शस्त्रक्रियेनंतर, रुग्णाने ऑपरेशननंतर फक्त एक दिवसानंतर तत्काळ वेदना आराम आणि सुधारित गतिशीलता सह उल्लेखनीय सुधारणा दर्शविली. हे यश डीआरएच नागपूरसाठी एक नवीन अध्याय चिन्हांकित करते, कारण सीएमएस डॉ जीएस मंजुनाथ यांनी पुष्टी केली की सांधे बदलण्याच्या शस्त्रक्रिया आता रुग्णालयात नियमितपणे केल्या जातील, ज्यामुळे रेल्वेच्या लाभार्थ्यांना फायदा होईल. हे यश उच्च दर्जाच्या आरोग्य सेवा आणि रेल्वे कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबीयांना प्रगत वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्याची रुग्णालयाची वचनबद्धता अधोरेखित करते.

# कचऱ्याच्या वापरातून होऊ शकते रोजगार निर्मिती : नितीन गडकरी

## स्वच्छता ही सेवा अभियानाचा समारोप




■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. २ :

कुठलाही कचरा टाकाऊ नसतो, असे माझे मत आहे. कचऱ्याचा वापर, त्याचे रिसायकलिंग करून आपण अनेक कामांमध्ये वापरू शकतो. दिल्लीतील २० लाख टन कचरा आम्ही रस्त्यांच्या निर्मितीसाठी वापरला. कचऱ्यामधून मोठ्या प्रमाणात प्लास्टिक वेगळे काढता येते. त्याचा वापर रस्तेबांधणीत करता येतो. त्यामुळे टाकाऊ वस्तूंमधून अर्थाजन आणि त्यातून महिलांचे सक्षमीकरण ही महानगरपालिकेची संकल्पना आदर्श ठरेल. कारण कचऱ्याचा योग्य वापर केल्यास त्यातून रोजगार निर्मिती होऊ शकते, असे मत केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी आज (बुधवार) व्यक्त केले.

केंद्र शासनाच्या निदेर्शानुसार नागपूर शहरात १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या कालावधीत राबविण्यात आलेल्या स्वच्छता ही सेवा अभियानाचा केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या प्रमुख उपस्थितीत समारोप झाला. स्वच्छता ही सेवा अभियानाच्या माध्यमातून राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंती निमित्त बुधवारी २ ऑक्टोबर रोजी नागपूर महानगरपालिकेद्वारे शहरातील विविध वारसास्थळांची सफाई अभियान राबविण्यात आले. या अंतर्गत कस्तुरचंद पार्क येथील स्वच्छता अभियान कार्यक्रमात आयोजित श्रमदान कार्यक्रमात ना. गडकरी बोलत होते. यावेळी मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी, अतिरिक्त आयुक्त आंचल गोयल, केंद्रीय राखीव पोलीस दलाचे डीआयजी प्रशांत जांभुळकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

कचऱ्याच्या समस्येपासून सुटका मिळविण्यासाठी आता कचऱ्यातून इंधन निर्मितीच्या दिशेने काम सुरू आहे. प्लास्टिकपासून टाईल्सची निर्मिती करून नागपूर महानगरपालिकेने त्याचा वापर सुरू करावा, अशी सूचनाही गडकरी यांनी केली. स्वच्छता हा जीवनाचा अविभाज्य भाग आहे. अस्वच्छतेमुळे प्रदूषण वाढते आणि प्रदूषणामुळे माणसाचे आयुष्यमान कमी होते.

त्यामुळे जीवनात सदैव स्वच्छतेचे अनुकरण करण्याची प्रतिज्ञा घेऊया, असे आवाहनही त्यांनी केले. नितीन गडकरी यांच्या हस्ते मनपाच्या नवनिर्मित तीन स्मार्ट पब्लिक टॉयलेट आणि आरआरआर सेंटरचे लोकार्पण झाले. मनपा आयुक्त डॉ. अभिजित चौधरी यांनी प्रास्ताविक केले. तर संचालन मनीष सोनी यांनी केले.

# उडान खेल प्रोत्साहन योजनेकरिता अर्ज करण्याची अंतिम तारीख ५ ऑक्टोबर

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. २ :

नागपूर शहरातील प्रतिभावंत खेळाडूंना प्रोत्साहन मिळावा या हेतूने नागपूर महानगरपालिकेद्वारे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धेत पदक प्राप्त खेळाडूंकरिता उडान खेल प्रोत्साहन योजना ही विशेष योजना सुरू करण्यात आली आहे. या योजनेकरिता अर्ज करण्याची अंतिम तारीख ५ ऑक्टोबर असून जास्तीत जास्त पात्र खेळाडूंनी योजनेसाठी अर्ज सादर करावे, असे आवाहन मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांनी केले आहे.

मनपा आयुक्तांच्या पुढाकारातून सुरू झालेल्या 'उडान खेल प्रोत्साहन योजनेच्या माध्यमातून मनपाद्वारे खेळाडूंना आर्थिक सहाय्य मिळणार आहे. या योजनेमुळे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील पदकप्राप्त खेळाडूंना ५० हजार ते दोन लाख रुपयांपर्यंत आर्थिक सहाय्य मिळणार आहे. या योजनेचा जास्तीत जास्त खेळाडूंना लाभ मिळावा याकरिता मनपाद्वारे शहरातील सर्व क्रीडा संघटनांच्या प्रतिनिधींची बैठक देखील बोलविण्यात आली होती. त्यानुसार मनपाकडे अर्ज दाखल केले जात आहेत. जास्तीत जास्त पात्र खेळाडूंना या योजनेचा लाभ मिळावा यासाठी मनपाद्वारे प्रयत्न सुरू आहेत.

उडान खेल प्रोत्साहन योजनेचे अर्ज करण्यासाठी ऑनलाईन किंवा ऑफलाईन दोन्ही माध्यमातून सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे. मनपाच्या ऑनलाईन अर्ज करण्याची सुविधा आहे. ऑफलाईन माध्यमातून अर्ज भरण्यासाठी तिसरा माळा, क्रीडा व सांस्कृतिक विभाग, छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय इमारत, नागपूर महानगरपालिका, सिव्हिल लाईन्स, नागपूर येथे संपर्क साधावा, असे आवाहन क्रीडा अधिकारी डॉ. पीयूष आंबुलकर यांनी केले आहे.

### उडान खेल प्रोत्साहन योजनेतील लाभ

आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धा जसे, राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा, वर्ल्ड कप दर दोन वर्षांनी आयोजित आशियाई क्रीडा स्पर्धा / एशियन चॅम्पियनशिप या स्पर्धांमधील पदक विजेत्या खेळाडूंना २,००,००० रुपये आर्थिक सहाय्य दिले जाणार आहे. ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धा, आशियाई क्रीडा स्पर्धा, राष्ट्रकुल स्पर्धा या स्पर्धांमध्ये सहभाग नोंदविणाऱ्या खेळाडूंना १,००,००० रुपये तसेच राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेमध्ये पदक प्राप्त करणाऱ्या खेळाडूंना १,००,००० रुपये आर्थिक सहाय्य दिले जाणार आहे. राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेमध्ये सहभाग नोंदविणाऱ्या खेळाडूंना २१ हजार रुपये आर्थिक सहाय्य मिळणार आहे. याशिवाय वरिष्ठ राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धा व कनिष्ठ गट राष्ट्रीय स्पर्धा तसेच केंद्रीय क्रीडा व युवक कल्याण विभागाद्वारे मान्यता प्राप्त क्रीडा प्रकार जसे, ऑलिम्पिक क्रीडा प्रकार/आशियाई क्रीडा प्रकार/राष्ट्रकुल क्रीडा प्रकार या स्पर्धेतील पदक विजेत्या खेळाडूंना ५०,००० रुपये आर्थिक सहाय्य दिले जाईल.

### या स्पर्धांचा समावेश

ऑलिम्पिक स्पर्धा, राष्ट्रकुल युवा स्पर्धा, शालेय आशियाई/जागतिक स्पर्धा, विश्व अजिंक्यपद स्पर्धा, एशियन चॅम्पियनशिप, पॅरा ऑलिम्पिक स्पर्धा, एशियन गेम्स, युथ ऑलिम्पिक, पॅरा एशियन स्पर्धा, राष्ट्रकुल स्पर्धा, ज्युनिअर विश्व अजिंक्यपद स्पर्धा, ज्युनिअर एशियन चॅम्पियनशिप, एशियन कप, वर्ल्ड कप, राष्ट्रीय स्पर्धा (नॅशनल गेम्स), ऑलिम्पिक क्रीडा प्रकारातील राष्ट्रीय वरिष्ठ व कनिष्ठ स्पर्धा

### असे करा ऑनलाईन अर्ज

उडान खेल प्रोत्साहन योजनेकरिता ऑनलाईन आणि ऑफलाईन दोन्हीपैकी कोणत्याही माध्यमातून अर्ज करण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. दोन्ही अजार्चे नमूने मनपाच्या । संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले आहेत. संकेतस्थळावर उडान खेल प्रोत्साहन योजना 2024-25 यावर क्लिक करून ऑफलाईन अर्ज डाउनलोड करावा किंवा ऑनलाईन माध्यमातून अर्ज भरता येईल. ऑनलाईन अर्जामध्ये अर्जदाराचा पासपोर्ट आकाराचा फोटो, जन्म प्रमाणपत्र, आधार कार्ड, बँक खात्याचा रद्द केल्याची खूण असलेला धनादेश, खेळाडूच्या गत तीन वषार्तील कामगिरीचा तपशील, खेळाडूचे हमीपत्र हे अपलोड करणे अनिवार्य आहे.

# गोव्यात हिमोफिलिया रुग्णांसाठी आरोग्य शिबिर संपन्न




■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. २ :

दिनांक 22 सप्टेंबरला संजय स्कूल ऑफ स्पेशल एज्युकेशन, पोर्विरिम, गोवा येथे इंटास फाउंडेशन आणि हीमोफिलिया सोसायटी पणजी चॅप्टर यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच हीमोफीलिया सोसायटी पणजी चॅप्टरचे अध्यक्ष प्रसाद आरोलकर यांच्या नेतृत्वाखाली हिमोफिलिया पेशंट असिस्टंट प्रोग्राम- फॅक्टर डिस्ट्रीब्यूशन, सेल्फ इंफ्लुजन व फिजिओथेरपी कॅम्प घेण्यात आला.

या अनोख्या कार्यक्रमास इंटास फाऊंडेशन नागपूरचे प्रकल्प समन्वयक निखिल वैद्य तसेच कौन्सिलर कालिदास वाडमे, फिजओथेरपिस्ट डॉ. गोपाल गावखर, वरिष्ठ परीचालिका हेमा बेटेकर व सर्व हिमोफीलिया रुग्ण उपस्थित होते.

गोवा मध्ये फॅक्टर्स उपलब्ध नसतात त्यामुळे रूग्णांना गरजेच्या वेळी पुणे, मुंबई येथे जावे लागते. याचा विचार करून इंटास फाऊंडेशनने 36 रुग्णांना 500 आय यू. चे 2 फॅक्टर चे निःशुल्क वाटप केले व फिजिओथेरपी सेशनमध्ये आरोग्याचे महत्व पटवून दिले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व सांगता प्रसाद आरोलकर यांनी केली.

## श्री महिला गृह उद्योग लिज्जत पापडच्या पदाधिकाऱ्यांची नेमणूक



■ नागपूर : श्री महिला गृह उद्योग लिज्जत पापड संस्थेच्या व्यवस्थापन समितीच्या झालेल्या सभेत वर्ष 2024-25 वषासाठी कार्यकारिणी समिती गठीत करण्यात आली. यामध्ये अध्यक्षपदी स्वाती पराडकर, उपाध्यक्षपदी प्रतिभा सावंत, सचिव पदी प्रियंका रेडकर व वसुधा सारंग खजिनदारपदी साक्षी पालव व लक्ष्मी सुवर्णा यांची नेमणूक करण्यात आली.

# पोलिसांनी मिळवून दिले प्राध्यापकाला २८ लाख

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. २ :

ऑनलाईन गुंतवणूक केल्यास भरघोस लाभ देण्याचे आमिष दाखवून सायबर गुन्हेगार सामान्यांची फसवणूक करतात. एकदा गुन्हेगाराच्या खात्यात गेलेली रक्कम पुन्हा परत मिळत नाही. मात्र, गिट्टीखदान पोलिसांनी संबधित बँकांशी पत्रव्यवहार करून आरोपीचे बँक खाते गोठविले आणि गुंतवणुकीची रक्कम सुरक्षित केली. न्यायालयाच्या आदेशाने फियार्दीला त्याची संपूर्ण रक्कम परत केली.

दाभा येथील रहिवासी फियार्दी एका महाविद्यालयात प्राध्यापक आहेत. त्यांनी शेअर गुंतवणूक संदर्भात प्रशिक्षणही घेतले आहे. त्यामुळे शेअर खरेदी संदर्भात त्यांना माहिती आहे. जून महिन्यात त्यांच्या व्हॉट्सअॅपवर आरोपीने संदेश पाठविला. ऑनलाईन शेअरमध्ये गुंतवणूक केल्यास भरघोस लाभ देण्याचे आमिष दाखविले. आरोपीच्या आमिषाला बळी पडत फियार्दीने ऑनलाईन रक्कम गुंतविली. सुरुवातीला त्यांना लाभही झाला. त्यामुळे त्यांनी गुंतवणुकीची रक्कम वाढविली.

आरोपीने पुन्हा आमिष दिले, मात्र यावेळी त्यांच्याकडे रक्कम नव्हती. त्यांनी भूखंड विकून गुंतवणूक केली. एकूण 28 लाख 10 हजार रुपयांची गुंतवणूक केल्यावर त्यांनी लाभाची रक्कम विड्राल करण्याचा प्रयत्न केला. विड्रालचे ऑप्शनच नसल्याने रक्कम निघाली नाही. त्यांनी बरेच प्रयत्न केले, मात्र आरोपींकडून कुठलाच प्रतिसाद मिळाला नाही. अखेर फसवणूक झाल्याचे त्यांच्या लक्षात आले. गिट्टीखदान पोलिसांना तक्रार मिळताच वरिष्ठ पोलिस निरीक्षक कैलाश देशमाने यांनी हे प्रकरण पोलिस उपनिरीक्षक सुप्रीया पुंडगे यांच्याकडे सोपविले. पुंडगे यांना पोलिस अंमलदार ज्योती सहारे यांनी सहकार्य केले. त्यांनी लगेच बँकांकडे पत्रव्यवहार करून आरोपीचे खाते गोठविण्याची विनंती केली. त्यामुळे आरोपीला रक्कम काढता आली नाही.

## विहिरीत पडून युवकाचा मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी,
कळमेश्वर, दि. २ :

कळमेश्वर शहरातील वार्ड क्रमांक पाच मधील एका युवकाचा विहिरीत पडून मृत्यू झाल्याची घटना आज २ऑक्टो ला दुपारी दीड वाजता दरम्यान घडली. रोहन संजय भस्मे वय २० वर्षे रा बाजार चौक वार्ड क्रमांक पाच कळमेश्वर मृतक युवकाचे नाव असून याची कळमेश्वर नागपूर रोडवरील दहेगाव शिवारात शेती आहे आज २ ऑक्टोंबर ला दुपारी दीड वाजता दरम्यान शेतातील शेत पिकावर फवारणी करण्याकरिता विहिरीतून बालटीने पाणी काढण्याकरिता गेला असता तोल गेल्याने.

विहिरीत पडला व पाण्यात बुडून मरण पावला कळमेश्वर पोलिसांनी याप्रकरणी आकस्मिक मृत्यूची नोंद केली असून कळमेश्वर ग्रामीण रुग्णालयात उतरणीय तपासणीनंतर मृतदेह नातेवाईकांच्या स्वाधीन करण्यात आला अधिक तपास कळमेश्वर पोलीस करीत आहेत.

# सर्व्हाईकल व्हॅक्सिन कॅम्पचे आयोजन



■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. २ :

दरवर्षी गांधी जयंती पासून सुरू होणाऱ्या लॉयन्स क्लबच्या सेवा सप्ताहाला यंदाही नागपुरात शांतता रॅलीने प्रारंभ झाला. लॉयन्स क्लब ऑफ नागपूरच्या वतीने तयार करण्यात आलेले ई-वेस्ट वाहन हे या रॅलीचे मुख्य आकर्षण ठरले.

नागपूर येथील मुंजे चौकातून विविध घोषणा देत, गांधीजींच्या विचारांचा आणि सामाजिक विचारांचा प्रचार करणारे फलक हातात घेऊन लॉयन्स क्लबचे पदाधिकारी रॅलीत सहभागी झाले होते.

क्लबचे अध्यक्ष सचिन अग्रवाल, सचिव विनोद गुप्ता, उमेश महतो, नितीन वर्मा, रवी किशनपुरिया, सुनील कुहीकर, किशोर कुंजेकर, सागर शिवहरे, विघ्नेश बिलसे, डॉ. शिरीष चांडक, रीतू गुप्ता, कोमल शिवहरे, खुशी चांडक आदी यावेळी उपस्थित होते.

या रॅलीचा समारोप बडीर्तील महात्मा गांधी यांच्या पुतळ्याजवळ पुतळ्याला माल्यार्पण आणि अभिवादन करून झाला. तर याच सप्ताहाचा एक भाग म्हणून दुपारी अग्रसेन भवनात सर्व्हाईकल व्हॅक्सिन कॅम्पचेही आयोजन करण्यात आले होते. यात शंभराहून अधिक नागरिकांना तपासणी करून लस देण्यात आली.

लॉयन्स क्लब चे डिस्ट्रिक्ट अॅक्टिव्हिटीचे अरमन विलास बुटले, पीजीडी बलबीरसिंह वीझ, अध्यक्ष सचिनजी अग्रवाल, सचिव विनोदजी गुप्ता, कोषाध्यक्ष किशोर भैया, लायन रवि किशनपुरिया, भूतपूर्व अध्यक्ष लायन विजय फरकसे एवम भूतपूर्व अध्यक्षलायन संतोष जेजनी, डॉक्टर शिरीष चांडक,सागर शिवहरे, गुरसिमरन कौर शिवहरे आदी यावेळी उपस्थित होते.

## डॉ. धवनकर २१ महिन्याने पुन्हा रुजू

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. २ :

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातील सात प्राध्यापकांची आर्थिक फसवणूक प्रकरणातील आरोपी जनसंवाद विभागाचे प्राध्यापक डॉ. धर्मेश धवनकर तब्बल एकवीस महिन्यांच्या सक्तीच्या रजेनंतर मंगळवारी मूळ पदावर रुजू झाले आहेत. डॉ. धवनकर यांची चौकशी सुरू राहणार असून चौकशी समितीच्या निर्णयाच्या अधीन राहून त्यांची सक्तीची रजा तूर्तास रद्द करण्यात आली आहे.

### लैंगिक छळाची भीती

लैंगिक छळाच्या बनावट तक्रारीची भीती दाखवून लाखो रुपयांची खंडणी वसूल केल्याचा आरोप असलेल्या डॉ. धवनकर यांच्या पराक्रमाने संपूर्ण शैक्षणिक क्षेत्राला हादरवून सोडले होते. डॉ. धवनकर प्रकरणाच्या प्राथमिक चौकशीसाठी नेमण्यात आलेल्या निवृत्त न्यायाधीश अजय चिंतामण चाफले यांच्या समितीने आपला अहवाल दिवंगत कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांना सोपवला होता. प्राथमिक चौकशी समितीने धवनकर यांची विभागीय चौकशी करावी, अशी शिफारसही केली. त्यामुळे निवृत्त जिल्हा न्यायाधीश समीर दास यांच्या समितीने धवनकर प्रकरणाची चौकशी केली. मात्र, ज्या चार प्राध्यापकांची फसवणूक होऊन त्यांनी पैसे दिल्याची तक्रार केली होती त्यांनीच दोन्ही पक्षांमध्ये सहमतीने माघार घेत असल्याचे कबूल केले. असेच आता कुठलेही आर्थिक देणे-घेणे नाही असेही लिहून दिले. त्यामुळे या प्रकरणाला नवे वळण आले होते. एकवीस महिन्यांपासून या प्रकरणावर ठोस कारवाई न झाल्याने आश्चर्य व्यक्त केले जात होते. अखेर विद्यापीठाने धवनकर यांची सक्तिची रजा संपुष्टात आणत पदावर रूजू होण्याचे आदेश दिले.

# दुर्गा माता मंदिर पिपरी येथे नवरात्र उत्सवाचा शुभारंभ



■ महासागर प्रतिनिधी,
कन्हान, दि. २ :

सार्वजनिक नवदुर्गा उत्सव मंडळा व्दारे दुर्गा माता मंदीर पिपरी येथील प्रसिद्ध जागृत दुर्गा माता मंदिरात कन्हान नदी पात्रातील पावन जलाची भव्य कावड शोभायात्रा, अभिषेक पुजनासह घटस्थापना करून नवरात्रौत्सवाचा शुभारंभ करण्यात येईल.

गुरूवार (दि.३) ऑक्टोंबर २०२४ ला सकाळी ८ वाजता सार्वजनिक नवदुर्गा उत्सव मंडळ पिपरी-कन्हान व्दारे दुर्गा माता मंदिर चौक पिपरी-कन्हान ता. पार शिवनी जि. नागपुर येथुन नवकन्या, महिला, भाविक. कन्हान नदी पात्रात पूजा अर्चना करून ९५ नवकन्या आणि २६ कावडधारी पुरुष अशा १२१ कलशासह भव्य कावड यात्रा काढण्यात येईल.

घोड्यावर राजमाता जिजाऊ, झाशीची राणी, अवंतीबाई लोधीच्या वेश भूषेत शिस्तबद्ध नवदुर्गेच्या नवरथासह भजनाचा गजर, शिवकालीन मदार्नी आखाडा खेळत भाविक दुर्गा मातेचा ध्वज उंच लहरवित, डिजेच्या तालात दुर्गा मातेच्या जयघोष करीत कावड यात्रा कन्हान नगरीतुन पिपरी मंदिरात पोहचुन दुर्गे मातेचे पंचामृताने व कलशातील जलाने अभिषेक करून घटस्थापना, विधि वत पूजा अर्चना, आरती करून नवरात्रौत्सवाचा थाटा त शुभारंभ करण्यात येईल. नऊ दिवस भजन, जस गायन, जागरण, गरबासह विविध धार्मिक कार्यक्रमाची रेलचेल असणार आहे.

तसेच गुरूवार (दि.१०) ऑक्टोंबरला अष्टमी महायज्ञ २१ हवन कुंड पुजन. शुक्रवार (दि.११) ला सायंकाळी ६ वाजता पासुन महाप्रसाद वितरण करण्यात येईल. शनिवार(दि.१२) ला सकाळी ९ वाजता घटविसर्जन आणि सायंकाळी रावण दहनाने नवरात्र महोत्सवाची सांगता करण्यात येईल. नवरात्रौत्सवाच्या यशस्वितेकरिता सार्वजनिक नवदुर्गा उत्सव मंडळ, दुर्गा माता मंदीर चौक पिपरी-कन्हान व्यवस्थापक अध्यक्ष माजी खासदार प्रकाशभाऊ जाधव, मार्गदर्शक नानकराम मोटवाणी, राधेश्याम भोयर, अजय भोस्कर, वासुसेठ झमतानी, शालिकराम ठाकरे, अशोक मेश्राम, मंडळ अध्यक्ष देवा चतुर, उपाध्यक्ष अमोल सुटे, शितल भिमणवार, सचिव मनोज कुरडकर, प्रशांत मसार, कोषाध्यक्ष प्रमोद मोटवानी, बाला खंगारे, दुर्गेश फुलझेले, सहकोषाध्यक्ष फजित खंगारे, कैलास पवार, विजय खडसे सह समस्त ग्रामस्थ भाविक मंडळी परिश्रम करित आहे.

## म. गांधी व लाल बहादूर शास्त्री जयंतीनिमित्त श्रमदान



■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. २ :

आज 2 ऑक्टोबर रोजी महात्मा गांधीजी आणि लाल बहादूर शास्त्रीजी यांच्या जयंती निमित्त विभागीय रेल्वे व्यवस्थापक - नमिता त्रिपाठी, अतिरिक्त विभागीय रेल्वे व्यवस्थापक - एस.पी. चंद्रिकापुरे आणि जी.व्ही. जगताप, मुख्य प्रकल्प व्यवस्थापक - ए.के. सूर्यवंशी व विभागीय विभागीय अधिकारी व कर्मचाऱ्यांनी महात्मा गांधीजी व लालबहादूर शास्त्रीजी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहिली.

नमिता त्रिपाठी- विभागीय रेल्वे व्यवस्थापक यांच्या नेतृत्वाखाली विभागीय अधिकारी आणि रेल्वे कर्मचाऱ्यांनी एकजुटीने श्रमदान केले आणि पोस्टर्स/बॅनर्सच्या माध्यमातून जनतेला स्वच्छतेची जाणीव करून दिली. विभागीय कार्यालय परिसर आणि प्रमुख रेल्वे स्थानकांवर सेल्फी पॉइंट्स/ स्वच्छता पोस्टर्सद्वारे प्रवाशांना आणि अभ्यागतांना स्वच्छतेसाठी प्रोत्साहित करण्यात आले. तसेच, एकत्र येऊन रेल्वे वसाहती, स्थानके आणि रेल्वे परिसरात स्वच्छता मोहीम राबवून, विविध कार्यक्रम, पोस्टर/बॅनर, पथनाट्य, घोषणा इत्यादींद्वारे प्रवासी आणि अभ्यागतांना स्वच्छतेबद्दल जागरूक केले गेले. 17-09-2024 ते 02-10-2024 या कालावधीत दक्षिण पूर्व मध्य रेल्वेने विभागीय रेल्वे व्यवस्थापक श्रीमती नमिता त्रिपाठी यांच्या नेतृत्वाखाली स्वच्छता ही सेवा अभियान साजरे केले आणि स्वच्छता मोहीम 01-01 पासून सुरू राहणार आहे. 15 ऑक्टोबर 2024 पर्यंत स्वच्छता पंधरवड्याचे आयोजन करण्यात आले आहे. 01 ते 15 ऑक्टोबर 2024 या कालावधीत आयोजित या स्वच्छता पखवाड्यामध्ये मेरी सीट मेरा डब्बा अभियानांतर्गत रेल्वे प्रवाशांना प्रवासादरम्यान स्वच्छता आणि स्वच्छता राखण्याचे विशेष आवाहन करण्यात येणार आहे. या स्वच्छता पखवाड्यात दक्षिण पूर्व मध्य रेल्वेच्या सर्व स्थानकांवर आणि गाड्यांमध्ये प्रत्येक दिवसाच्या थीमनुसार विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे.